
## शंभू गणपुले



# कितीतुज समजावू सांग

# किती तुज समजावू सांग

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# किती तुज समजावू सांग

## (स्वतःच्या मनाची समजूत घालण्याची धडपड)

**लेखक - शंभू गणपुले**

ई साहित्य प्रतिष्ठान

# किती तुज समजावू सांग

लेखक : शंभू गणपुले

"योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

संपर्क : जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038   020-25384472, 9822439492

jayant.karandikar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.
www. esahitybooks

**प्रकाशन : १२ मार्च २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

लेखकाचा परिचय

लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी.ए. , एल.एल.बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड, सध्या लेखन,

प्रकाशित लेखन: " ताओ उपनिषद" , कथा-कविता संग्रह -२

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळया संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास: "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

©सर्व हक्क श्री. जयंत करंदिकर यांचे स्वाधीन.

जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,
Pune 411038 020-25384472, 9822439492

या पुस्तकातील सर्व मते ही लेखकाची चिंतने असून त्यांच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. या लेखनाचा हेतू स्वतःचे विचार लिखित स्वरुपात सुस्पष्ट करणे असून त्यातून कोणालाही दुखावण्याचा वा टीका करण्याचा हेतू नाही याची नोंद घ्यावी.

# अर्पण पत्रिका

’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा   -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.

-- शंभू गणपुले

# किती तुज समजावू सांग

**प्रस्तावना -** प्रत्येक माणसाच्या आयुष्यात असे अनेक क्षण किंवा प्रसंग येतात ज्यावेळी आपणच आपल्या मनाची समजूत काढून, गढूळलेलं मन शांत करावं लागतं. हे पुस्तक म्हणजे मीच माझ्या मनाची वेळोवेळी समजून काढून पुढल्या काळात मी कोणता मार्ग किंवा मनोभूमिका स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे त्याचं संकलन आहे. मनाची समजूत काढण्यासाठी मी कधी आतून आलेल्या आवाजाचा तर कधी धर्मग्रथांचा किंवा अन्य पुस्तकांत, वर्तमानपत्रात किंवा मासिकांत वाचलेल्या विचारांचा तर कधी प्रत्यक्ष अनुभवलेल्या प्रसंगांचा आधार घेतला आहे.

मनाला समजावण्यासाठी समर्थ रामदास स्वामींनी मनाचे श्लोक रचले. जगद्‌गुरु तुकाराम महाराजांनी सुद्धा 'मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण।' असा दिलासा सामान्य माणसाला दिला होता. पण त्यांच्या काळाचे संदर्भ वेगळे होते. आजचे संदर्भ वेगळे आहेत. आजच्या काळातल्या माणसांच्या मनावर इतक्या ठिकाणाहून, इतक्या प्रकारे आघात होत आहेत की, सामान्य माणूस भ्रमिष्टासारखा वागू लागला आहे. माझ्या बाबतीत तसं होऊ नये म्हणून अनेक विचारांच्या मंथनातून मला जेंव्हा जेंव्हा मार्ग सापडला तोच मी वाचकांसमोर मांडण्याचं धाडस केलं आहे.

लाओ त्सेनं 'ताओ ते चिंग' या पुस्तकांतल्या एका अध्यायात म्हटलं की 'जेव्हा सर्व जग, सौंदर्याला सौंदर्य म्हणून मान्यता देतं, तेंव्हा कुरुपता अस्तित्वात असते.' त्याच न्यायानं जेव्हा एकादं मन मांडलं जातं त्यावेळी विरोधी मत मांडलंच जातं. म्हणूनच वरच्या परिच्छेदात 'मला जो मार्ग सापडला तो वाचकासमोर मांडण्याचं धाडस केलं आहे' असं वाक्य लिहीलं आहे. हेतू हा की विरोधी मत कुणी मांडलं तरी मी ते आनंदानं स्वीकारीन !

परंपरा, श्रद्धा-अंधःश्रद्धा, बुद्धिवाद, निसर्ग विरुद्ध मानवजात, उत्क्रांतीची पुढली पायरी, पैसा आणि समाधान, प च राज्यक्रांती, संगणक विरुद्ध आजोबा, नटराजाची मूर्ती आणि परमाणूचं नृत्य, अणूविरोधी

अणू, संस्कारामागचा मानसशास्त्रीय हेतू, विज्ञानाचे बरे-वाईट परिणाम, वैज्ञानिकांची जबाबदारी, फझी लॉजिक, कलियुगाची लक्षणे असे अनक विषय या पुस्तकात हाताळले आहेत.

आत्तापर्यंत छापली गेलेली, अनेक विषयावरची अनेक पुस्तकं वाचणं एका व्यक्तीच्या आवाक्या बाहेरची गोष्ट आहे. त्यामुळं सगळ्या विषयांचं सगळं ज्ञान मला आहे असा माझा दावा नाही. एकादं पुस्तक हातात पडलं की ते वाचून काढायचं, त्यात मांडलेले विचार आणि त्यावर माझं मत यांच्या नोंदी करून ठेवायच्या अशी पद्धत मी अवलंबिली होती. वेळोवेळी करून ठेवलेल्या त्या नोंदीतूनच हे पुस्तक तयार झालं आहे.

काही वाचकांची अशी समजूत होण्याची शक्यता आहे की, मी ठार परंपरावादी आहे. म्हणूनच माझा विज्ञानाला आणि बुद्धीवादाला विरोध आहे. पण खरी गोष्ट अशी आहे की मी उत्क्रांतीचा पुरस्कर्ता आहे. माणसाचं शरीर आणि मन उत्क्रांत अवस्थेला जाण्यासाठी नैसर्गिक वातावरण, परंपरा, कौटुंबिक संस्कार, सामाजिक आणि राजकीय स्वास्थ आणि मानसिक शांती हे घटक कारणीभूत होतात असं म्हटलं जातं. मन शांत ठेवणं हा घटक सोडला तर इतर कुठल्याही घटकावर माणसाचं नियंत्रण नसतं. म्हणूनच सारासार विचार करून मनाची समजूत काढण्याचा प्रयत्न मी या पुस्तकात केला आहे. मानवजातीची शारीरिक उत्क्रांती पूर्ण झाली आहे. आणि मानवाला आता मानसिक उत्क्रांतीचा पुढला टप्पा गाठायचा आहे. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीनं कुठल्याही वादात न फसतां उत्क्रांतीच्या चळवळीत स्वखुशीनं सामील व्हावं अशी माझी भूमिका आहे.

पुस्तकाच्या स्वरूपाबद्दल थोडंसं सांगावसं वाटतंय्. प्रत्येक परिच्छेदात एकाच विषयावरचे उलट सुलट विचार मांडले आहेत. तसं करतांना एकाद्या विषयासंबंधीचा विचार, त्या विषयासंबंधात मला आलेला अनुभव, या दोहोच्या ओढाताणीत निर्माण झालेली मानसिक अस्वस्थता आणि अस्वस्थ मनाची मी काढलेली समजूत असं साधारणपणे प्रत्येक परिच्छेदाचं स्वरूप आहे. प्रत्येक परिच्छेदाला क्रमांक दिला

आहे त्याचप्रमाणं प्रत्येक परिच्छेदाची सुरुवात स्वतंत्र पानावर केली आहे. या रचनेची वाचकांनाही सोय सुविधा होईल. वेळ मिळेल तेंव्हा पुस्तक उघडून कोणत्याही परिच्छेदापासून वाचायला सुरुवात करता येईल. आणखी एक गोष्ट, काही विषयांची पुनरूक्ति झाल्यासारखं वाटेल. पण पर्ण परिच्छेद वाचल्यावर त्या विषयाचे संदर्भ वेगळे आहेत हे लक्षात यायला वाचकाला वेळ लागणार नाही.

पुस्तकाचं हस्तलिखित डॉ.चंद्रशेखर देसाई आणि श्री.नितीन देसाई आणि श्री.नितीन कोतापल्ली या चाणाक्ष तज्ञांनी नजरेखाली घालून ज्या बहुमोल सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा ऋणो आहे. त्या सूचनांमुळंच पुस्तक वाचनीय झालंय् यात संशय नाही.

## किती तुज समजावू सांग

## लेखकाचे मनोगत

१. माझा जन्म १९३९ सालचा. त्या वर्षी दुसऱ्या महायुद्धाच्या ठिणग्या पडायला सुरवात झाली होती. त्या नंतरची चार-पांच वर्षं युद्धाच्या रणधुमाळीतच गेली. त्याच काळात राजकारण, अर्थकारण, समाजकारण, युद्धशास्त्र वगैरे बाबतीतल्या सगळ्या संकल्पना मोडीत निघाल्या होत्या. कुटुंब संस्थाही डगमगत्या पायावर उभी होती. माणसाच्या अस्तित्वाबद्दलच जेव्हा प्रश्न चिन्ह उभं राहतं त्यावेळी इतर कुठलीही संकल्पना तिच्या मूळ स्वरूपात तग धरूच शकत नाही. भारताचा युद्धाशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. तरीही युद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचे चार ओरखाडे भारतीय समाजावर उमटलेच !

२. आमचं घराणं जमिनदारी, सावकारी करणारं होतं. कुळाकडून वसूल केलेल्या धान्याच्या थप्प्या आमच्या चौसोपी वाड्यात लागलेल्या असायच्या. शिवाय पैशाच्या रूपात केलेली वसुली हजारोच्या घरात व्हायची. माझ्या आईच्या घराण्यात मात्र आजोबांना मिळणाऱ्या सरकारी पगारातच खर्चाची तोंड मिळवणी करावी लागयची. पण आजोबांकडे विद्वत्तेची आणि विचारांची प्रचंड सुबत्ता होती. दोन्ही कुटुंबं एकाच गावात रहात असल्यामुळं आम्हा भावंडांच्या प्राथमिक तसंच आध्यात्मिक, संस्कृत आणि इंग्रजी शिक्षणाची जबाबदारी आईच्या वडिलांकडं जाणं अगदी स्वाभाविक होतं. आजोबांच्या (श्री.कृ.के. कोल्हटकर) अनेक विषयांच्या गाढ्या अभ्यासाची परिणती 'पातंजल योग दर्शन अथवा सार्थ आणि सविवरण भारतीय मानसशास्त्र' या बाराशे पानी प्रचंड ग्रंथाच्या निर्मितीत झाली. अनेकांप्रमाणे मीही त्या घटनेला साक्षीदार होतो हे सांगताना मला खूप अभिमान वाटत आहे.

३. दोन घराण्यातला आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक फरक मला त्यावेळी कळला नव्हता तरी त्या फरकाचा माझ्या अंतर्मनावर खोलवर परिणाम झाला असावा. माझ्या मनात सुरु झालेल्या वैचारिक संघर्षाचं ते मूळ कारण असावं.

४. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातली एकूण परिस्थिती झपाट्यानं बदलत गेली. सावकारी-जमिनदारीचं नामोनिशाण राहिलं नाही. कॉलेजचं पहिलं वर्ष पूर्ण करता करता मला जाणवलं की आता स्वतःच्या पायावर उभं राहण्याशिवाय गत्यंतर नाही. थोरल्या बंधूंच्या मार्गदर्शनाखाली नोकरीचा शोध सुरू झाला. सुरुवातीची दोन वर्षे कोल्हापुरात इलेक्ट्रीसिटी बोर्डात काढली. पण नंतर १९६० साली हैद्राबादला रिझर्व बँकेत नोकरी मिळाली. आणि मी आई-वडिलांसह हैद्राबादमधे स्थिरावलो. दोन-तीन वर्षानं लग्नही झालं. त्याचबरोबर अर्धवट राहिलेलं शिक्षण पूर्ण करून बी.ए.एल्.एल्.बी. या दोन पदव्या पदरात पाडून घेतल्या. याच काळांत माझी कामगार चळवळीशी ओळख झाली. त्यातूनच नव्या वैचारिक संघर्षाचा जन्म झाला. कामगार चळवळीचं नेतृत्व कामगारांमधूनच निर्माण व्हावं को ती चळवळ नेतृत्वासाठी आणि ध्येयधोरणांसाठी राजकीय पक्षाशी जखडलेली असावी? वैचारिक संघर्षाचं हे दुसरं कारण असावं!

५. बारा वर्षं हैद्राबादला काढल्यावर आयुष्याला पुन्हा कलाटणी मिळाली. व्यवस्थापनानं अधिकारी वर्गात निवड करून माझी कलकत्त्याला पाठवणी केली. अर्थात त्या पदासाठी मी अर्ज केलाच होता. पण त्यानंतर बढती, बदली आणि कामानिमित्त खेडेगांव पातळीपर्यंत प्रवास हे चक्रच माझ्या पायाला लागलं. प्रथम हैद्राबाद नंतर कोलकत्ता, नागपूर, भुवनेश्वर इत्यादी ठिकाणी मिळून तेवीस वर्षं मी परप्रांतात काढली. प्रत्येक बढतीनंतर बदलीचं नवं गांव, नवी जागा, नवं वातावरण, नवे मित्र आणि नोकरीतल्या नव्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यात एक प्रकारचं 'थ्रिल' असतं हे खरं! तरीपण असुरक्षिततेची जाणीव, नव्यानं संसार उभा करण्यासाठी करावे लागणारे कष्ट, पूर्वीच्या गावी

जुळलेली मैत्रीची नाती तोडतांना होणाऱ्या यातना हे घटक फार दुःखदायक असतात. सुदैवानं (की दुर्दैवानं?) मला मूल-बाळ नसल्यामुळे मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत होणाऱ्या ससेहोलपटीला तोंड द्यावं लागलं नाही तो भाग निराळा. या तेवीस वर्षांत एक प्रश्न मला नेहमी डाचत राहिला. 'अधिकारी वर्गात प्रवेश करून मी काय मिळवलं?' मनांतला संघर्ष तीव्र होण्याचं ते तिसरं कारण होतं.

६. बढती, बदली आणि त्यानंतरच मिळणाऱ्या सुखसोई यातच मन रमवणं मला आणि माझ्या पत्नीला कठीण जात होतं. एकाच गावात राहून एकाद्या कलेचा, छंदाचा किंवा अभ्यास्य विषयाचा पाठपुरावा करणं सोपं आणि सहज शक्य असतं. आमच्या बाबतीत ते कधीच जमलं नाही. कलकत्त्याला गेल्यावर, हैद्राबादमधे मागं लावून घेतलेले व्याप थंडावले होते. त्यामुळं एक प्रकारची पोकळी आणि मानसिक अस्वस्थता जाणवू लागली. अशा परिस्थितीत मन सैर-भैर होऊ नये म्हणून आम्ही-विशेषतः मी-काही व्यसनं जवळ केली आणि महाराष्ट्र मंडळाच्या सगळ्या कार्यक्रमात भाग घ्यायला सुरुवात केली. १९७२ च्या गणेशोत्सवात मंडळाच्या रंगभूमीवर आम्ही पहिलं पाऊल ठेवलं. त्यानंतर नाटकांनी माझी पाठ सोडली नाही.

७. नाटक म्हणजे काही व्यक्तींनी, काळी काळ, वेगळ्या भूमिकेत जाऊन एकत्र जगण्याचा प्रयोग केलेला असतो (An experiment in collective living) असा माझा समज झाला होता. पण कलकत्त्याच्या चार आणि नंतर नागपूर मधल्या साडेचार वर्षांच्या काळात तिथली रंगभूमी, तिथले रंगकर्मी, त्यांचं आपापसातलं राजकारण, नाट्य-स्पर्धात होणारे घाणेरडे प्रकार, संस्थाचालकांची बांधिलकी यांचा जवळून अनुभव घेतला. एकत्रित जगण्याच्या प्रयोगाबद्दल माझा जो समज होता त्याच्या चिंध्या-चिंध्या झाल्या. कलकत्त्याला असतांना मी बंगाली वाचायला

आणि बोलायला शिकलो होतो. २/३ बंगाली नाटकांचं मराठीत रूपांतर ही केलं होतं. बंगाली नाटकंही बघितली होती. त्यामुळं नाट्य विषयाचा अभ्यास करावा अशी प्रबळ इच्छा मनांत उभी राहिली. अभ्यास सुरुं केल्यावर जाणवलं की या क्षेत्रातही मतामतांचा भरपूर बुजबुजाट आहे. भरत मुनी एक मत मांडतो तर स्टानिस्लाव्हास्की दुसरंच मत मांडतो, न-नाट्यवाले तिसऱ्याच मताचा पाठपुरावा करतात. आपल्याकडले रंगकर्मा मात्र आपली परंपरा सोडून दुसऱ्यांचं मत खरं मानून त्यावर वाद-विवाद करत बसले. मतामतांतराचा प्रभाव माणसामाणसांतल्या संबंधावर पडला आहे, पडतो आहे ही जाणीव फारच अस्वस्थ करणारी होती. वैचारिक खळबळ तीव्र होण्याचं ते चौथं कारण असावं!

८. एकोणीसशे त्र्यायंशी साली मुंबईत दाखल झालो. कार्यालयीन जबाबदाऱ्या वाढल्या होत्या. इतर क्षेत्रांशी असलेले संबंध तुटत चालले होते. नव्या ओळखी, जाणिवा होत होत्या. जुने परिचय, विचार विस्मृतीच्या कप्प्यात दडून बसत होते.

९. लेखकाच्या मनोगतात लेखनाचा विषय, त्या विषयाची प्रेरणा, लेखनाची प्रक्रिया, लेखनाचा हेतू, लेखन शैली, कुणाकुणाचं सहाय्य झालं वगैरे मुद्यांची चर्चा करण्याऐवजी लेखक त्याच्या आयुष्यातल्या टप्प्यांचं वर्णन कां करतोय असा प्रश्न वाचकांच्या मनात उभा राहण्याची शक्यता आहे. त्याचं कारण असं की छपाई माध्यमातून माझं कोणत्याही प्रकारचं लेखन आजपर्यंत वाचकांसमोर आलेलं नाही. त्यामुळं 'किती तुज समजावू सांग' या सारखं वेगवेगळ्या विषयांवरच्या नोंदी करणारं, वेगळ्या प्रकारचं पुस्तक वाचतांना लेखक कसाकसा घडत गेला त्याची आवश्यक तेवढी माहिती वाचकांना झाली तर लेखक आणि वाचकांमधे संवाद साधला जाण्याची शक्यता वाढते. दुसरं कारण म्हणजे व्यक्ति त्याच्या भोवतालच्या परिस्थितीमुळं घडत असते. माझ्या भोवतालच्या परिस्थितीचे, अस्थिरता, असुरक्षितता, पुढल्या टप्प्यात कोणत्या प्रकारचं आयुष्य

समोर येणार आहे त्याची चिंता हे प्रभावी घटक होते. या परिस्थितीमुळं माझ्या मनातलं द्वंद्व प्रत्येक टप्प्यात कसं आणि कां तीव्र होत गेलं तेच प क्त वाचकांनी लक्षात ठेवावं अशी अपेक्षा आहे.

१०. एकोणीसशे एक्यांण्णव साली आजारी पडून माझी आई माझ्याकडं राहायला आली. पुढची तीन साडेतीन वर्षं ती अंथरूणावर पडून होती. त्या काळांत नोकरी टिकवून ठेवणं आणि आईच्या खोलीत जागरणाला बसलो असतांना जमेल तेवढं वाचन करणं ही दोनच कामं मी करूं शकत होतो. संदर्भ सूचीतल्या ग्रंथापैकी नव्वद टक्के ग्रंथ मी ह्याच काळात वाचलं होते.

११. वेगवेगळ्या पुस्तकांचं, मासिकांचं, वृत्तपत्रांचं वाचन चालू असतांना परस्पर विरोधी विचार वाचनात यऊ लागले. एकमेकाला छेद देणारे विचार समाजात पसरत गेले तर सामान्य माणसाच्या मनातला गोंधळ किती वाढेल त्याची कल्पनाच करवेना. वैचारिक गोंधळ सामाजिक उलथापालथीला जन्म देतो. आपल्या पुरती तरी ती उलथापालथ थांबवावी म्हणून परस्पर विरोधी विचार आणि या बाबतचं माझं मत अशी टिपणं काढायला सुरुवात केली.

१२. मध्यंतरीच्या काळात ह्यू प्रॅथर (Hugh Prather) या अमेरिकन लेखाकाचं स्वतःसाठी नोंदी करणारं (Notes to Myself) पुस्तक वाचनात आलं होतं. त्या पुस्तकाच्या शिर्षकावरून प्रेरणा घेऊन ‘किती तुज समजावू सांग’ या पुस्तकाची निर्मिती झाली आहे असं म्हटल्यास वावगं होणार नाही.

१३. मी केलेल्या नोंदी आणि त्यावरची माझी टीका-टिप्पणी एकत्र केल्यामुळं पुस्तकातल्या प्रत्येक परिच्छेदात वेगळ्या विषयावर चर्चा केली आहे. काही परिच्छेदात तोच विषय पुन्हा आल्यासारखां भास होईल. पण ज्या संदर्भात त्या विषयाची चर्चा झाली आहे तो संदर्भ लक्षात घेतला तर विषयाची पुनरुक्ती झाली आहे असं वाटणार नाही. परिच्छेदात्मक रचनेचा आणखी एक प ायदा

होणार आहे. वाचक वाटेल त्या परिच्छेदापासून वाचन सुरु करूं शकेल किंवा मनात येईल तिथं थांबू शकेल. पुस्तकाला जोडलेली विषय-सूची त्या बाबतीत वाचकाला मदत करेल.

१४. मी विज्ञानाचा, अध्यात्म शास्त्राचा किंवा समाज शास्त्राचा विद्यार्थी नाही. त्यामुळे त्यातल्या कोणत्याच विषयांचा मी सखोल अभ्यास केलेला नाही. मी बुद्धिवादी, विचारवंत नाही. पण त्याचा अर्थ मी सनातनी, प्रतिगामी आहे असाही होत नाही. सामान्य माणसाला त्याच्यासाठी चांगलं काय अन् वाईट काय आहे ते ठरवण्या एवढी बुद्धी निसर्गानं दिलेली असते, आणि चांगल्या वाईटाची निवड करण्याचं स्वातंत्र्यही प्रत्येकाला असतं. पण माझी अशी धारणा आहे की, माझ्या जाणिवेच्या कक्षात जे जे येईल ते सगळं माझं आहे. अनुभव घेतल्यावर जे चांगलं आहे ते टिकेल. जे वाईट आहे ते आपोआप नष्ट होईल. या पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या संदर्भ ग्रंथांचे वेगळे संदर्भ घेऊन या पुस्तकातलं एकादं किंवा सगळी विधानं खोडून काढण्याचा प्रयत्न होईल. ती टीका मला स्वीकारावीच लागेल. कारण विश्वात ज्ञानाचं एवढं भांडार आहे की, त्यातलं प्रत्येक पान अन् पान प्रत्येकानं वाचलं असणं शक्य नाही. म्हणून काय चांगलं अन् काय वाईट ते ठरवणं काळाच्या हातात देऊन, काय टिकतंय अन् काय गळून पडतंय त्याची वाट बघत बसणं एवढंच माझ्या हातात आहे.

१५. माझंच एक मन दुसऱ्या मनाला समजावत आह अशा शैलीत हे पुस्तक लिहीलं आहे. अर्थातच प्रत्येक मुद्दा वाचकाला पटवून देण्याचा माझा प्रयत्न नाही पण माझ्याप्रमाणं परस्पर विरोधी विचारांच्या दलदलीत आपण अडकलो आहोत आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी एकाद्या पारंबीच्या आधाराची गरज आहे असं एकाद्या वाचकाला वाटलं आणि या पुस्तकाचा उपयोग झाला तरी माझ्या श्रमांचं चीज झालं एवढं समाधान मला मिळेल!

१६. आजचा आपला समाज तीन गटात विभागला गेला आहे. पहिला गट विज्ञान, तंत्रज्ञान आणि बुद्धिवादाचं समर्थन करणारा आहे. तर दुसरा गट परंपरांचं जतन करणारा, ईशतत्वापुढं नतमस्तक होणारा आणि साधुसंतांच्या वचनावर विश्वास ठेवणारा आहे. तिसरा गट अजून कुंपणावर बसून आहे. सोईचं वाटेल त्यावेळी अल्याड किंवा पल्याड उडी मारुन आपल्यामुळं समाजात स्थैर्य नांदत आहे अशी भ्रामक कल्पना तिसऱ्या गटानं करून घेतली आहे. पहिल्या गटातल्या लोकांची संख्या खूप कमी असली तरी तो गट आक्रमक आहे कारण त्यांची पाठराखण करायला प्रसिद्धी माध्यमं उभी आहेत. अशा परिस्थितीत बुद्धिवादी, वैज्ञानिक सत्यापुढं परंपरा आणि श्रद्धा किती काळ टिकाव धरू शकतील असा वाद उभा राहिला तर त्या वादाला तोंड देण्यासाठी कुणी या पुस्तकातल्या माहितीचा उपयोग केला तर त्याला माझी हरकत नाही.

१७. दोन मनातला संवाद या स्वरूपात हे पुस्तक लिहायला सुरुवात केली होती. तरीही प्रत्येक परिच्छेद संवादाच्या रूपात लिहीला गेलेला नाही याची मला जाणीव आहे. एकाद्या वैज्ञानिकानं/विचारवंतानं मांडलेल्या मताचं स्पष्टीकरण करतांना किवा त्यावर मल्लिनाथी करतांना निवेदनात्मक /विश्लेषणात्मक शैली वापरली गेली आहे. काही परिच्छेदात उपरोधात्मक भाषेचाही वापर केला गेला आहे. पण लेखन शैलीतली ही भिन्नता पुस्तकाच्या एकत्रित परिणामावर दुष्परिणाम करणार नाही अशी खात्री आहे. लेखनाच्या ओघात, एकाद्या परिच्छदात माझ्याकडून मर्यादा उल्लंघन झालं असेल तर वाचक मला उदार मनानं क्षमा करतील अशी खात्री वाटते.

१८. १९९१ ते १९९४ या काळात टिपणं काढण्याचं काम चालू होतं त्या काळात कार्यालयातल्या माझ्या काही सहकाऱ्यांना मी खूप त्रास दिला आहे. या सहकाऱ्यात सर्वश्री घाडगे, रर्णादवे, दास, बोरसे आणि सहस्रबुद्धे हे सहकारी मुख्य होते. या सहकाऱ्यापैकी जो कोणी जिथं कुठं भेटेल तिथं त्याला पकडून, आदल्या रात्री वाचलेल्या पुस्तकातल्या एकाद्या मुद्यावर चर्चा करण्याचा धडाकाच

मी लावला होता. चर्चेच्या ओघात आणखी एकाद्या पुस्तकाचा संदर्भ आला तर ते पुस्तक मिळवून देण्याचं काम श्री.रणदिवे आणि श्री.बोरसे यांनी आनंदानं केलं. या सगळ्या मित्रांनी मला वेळोवेळी जी मदत केली त्या ऋणातून मी मुक्त होऊ शकेन असं वाटत नाही. तरीपण सुसंकृत व्यवहार म्हणून मी त्यांचे आभार मानतो. त्याचप्रमाणं ज्या ज्या ग्रंथातलं ज्ञान मला दिशा दाखवणारं ठरलं त्या ग्रंथकारांचा पण मी अत्यंत आभारी आहे.

१९. खरं तर हे पुस्तक मी माझ्या दिवंगत आई-वडिलांना किंवा ज्यांनी माझा वैचारिक पिंड घडवला त्या माझ्या आजोबांना (कै.श्री.कृ.के. कोल्हटकरांना) अर्पण करायला पाहिजे होतं. पण मी कांहीही केलं तरी त्या तिघांच्या पितृ-ऋणातून मला मुक्तता मिळणार नाही. शिवाय माझी अशी भूमिका आहे की माझे आई-वडील-आजोबा यांनी त्यांच्या काळात त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीशी समर्थपणे संघर्ष केला होता आणि ते आता चिरंतन शांतीचा अनुभव घेत आहेत. मग त्यांना माझ्या किंवा नतरच्या पिढीच्या संघर्षात कशाला ओढायचं? म्हणून हे पुस्तक माझ्या नातवंडांना-पूर्वा वडगांवकर, पुणे आणि शार्दुल जोशी, ठाणे यांना प्रेमपूर्वक भेट देत आहे. पूर्वा आजमितीला १५ वर्षाची आहे तर शार्दुल सात वर्षाचा. आम्ही त्या दोघांचे मानलेले आजोबा-आजी. पण पूर्वानं जन्मल्यापासून आणि शार्दुलनं वयाच्या सातव्या महिन्यापासून आमच्या एकाकी जीवनात गहिरे रंग भरले, अजून भरत आहेत. त्या दोघांचं पुढलं जीवन कसा आकार घेईल ते आज सांगता येणार नाही. पण त्यांच्या जीवनात उभा राहिलेला किंवा राहणारा वैचारिक संघर्ष मिटवण्यासाठी त्यांनी माझ्या सारखा प्रयत्न करावा एवढीच इच्छा आहे. तसं करताना त्यांनी माझ्या भूमिकेचा आधार घेतला किंवा त्यांच्या विरोधात उभे राहिले तरी मला आनंदच होईल.

२०. या पुस्तकाची कॉम्प्युटर प्रिंट तयार झाल्यावर त्याच्या चार-पांच झेरॉक्स प्रती मी माझे नातेवाईक, मित्र, अभ्यासक आणि विचारवंत यांच्याकडं अभिप्रायासाठी पाठवल्या होत्या. ज्यांनी ज्यांनी मत

प्रदर्शित केलं ते तसंच्या तसं पुस्तकाच्या परिशिष्टात समाविष्ट केलं आहे. त्या सर्व नातेवाईकांचा, मित्रांचा, अभ्यासकांचा आणि विचारवंतांचा मी अत्यंत आभारी आहे.

## किती समजावू सांग

## विषय सूची


| परिच्छेद क्रमांक | विषय |
|---|---|
| १. | विरोधी विचारांचं जंगल. |
| २. | बा मनाची जात. |
| ३. | नव निर्मितीचे मार्ग |
| ४. | ब्रह्म सत्य जगत् मिथ्या. |
| ५. | शांत बसून रहा. |
| ६. | नामस्मरण |
| ७. | वाचाल तरच वाचाल. |
| ८. | जगण्यापुरता उपभोग हाच आध्यात्मिक भौनिकवाद. |
| ९. | वस्तू आणि समाधान. |
| १०. | उत्तरं शोधण्याची घाई नको. |
| ११. | कार्य-कारण विरूद्ध अस्थानिक संबंध. |
| १२. | ‘मी’ -‘तू’ ची लढाई. |
| १३. | जन्म-मरणाच्या सुखदुःखाशी व्यक्तीचा काय संबंध? |
| १४. | विज्ञान आणि अंतिम सत्य. |
| १५. | जेनेटिक मेमरी विरूद्ध मौन. |
| १६. | उत्क्रांतीला संघर्षाची नाही, समन्वयाची गरज. |
| १७. | विचार आणि आचार. |
| १८. | देवा ऐवजी मनाला रिटायर करा. |
| १९. | कर्म-प ळांच्या साली आणि शेजाऱ्याचं घर. |
| २०. | निसर्ग-भिती आणि माणसाची वर्तणूक. |

२१. अणू विरोधी अणू.
२२. एक कारण मीमांसा.
२३. इच्छा, वासनावर मर्यादा हीच उत्क्रांती.
२४. विज्ञानाचा तोकडेपणा.
२५. बुद्धिवाद्यांच्या कोलांट्या उड्या.
२६. चंगळवादच चंगळवादाला जन्म देतो.
२७. पैसा आणि समाधान.
२८. भेटीची ठिकाणं.
२९. जीव घेणारं प्रेम?
३०. आयुष्याचा ताळेबंद.
३१. नैसर्गिक प्रवृत्ती आणि बाह्य निसर्गावरला विजय.
३२. चळवळीतून परिवर्तन?
३३. समन्वयामुळेच उत्क्रांती शक्य.
३४. भांडवलदारांनी रचलेला जागतिक कट.
३५. वासनेला आवर-उत्क्रांतीचा पुढला टप्पा.
३६. करमणुकीच्या माध्यमातून जीवन विरोधी प्रचार.
३७. भिन्न विचार-धारांचं मीलन.
३८. विचार पद्धतीतला फरक.
३९. घरातल्या घरांत वानप्रस्थाश्रम.
४०. भारतीय जीवन विज्ञान-एक चिरंतर लाट.
४१. आध्यात्म हीच भारताची खरी शक्ति.
४२. दृश्य अविष्कार आणि शक्तीचं स्थिर रूप.
४३. पंच राज्य क्रांती-वृत्तपत्रांची चलाखी.

४४. प च राज्य क्रांती-अत्याचार.

४५. प च राज्य क्रांती-प ायदे.

४६. भदंत नागसेन आणि मिलँडर यांच्यातला संवाद.

४७. माणूस, मूल्य वर्धित वस्तू!

४८. स्वर्ग-नरक-पुर्नजन्म- या कल्पनांची प्रेरक शक्ति.

४९. व्यक्ति स्वातंत्र्य आणि समाजवाद.

५०. यज्ञ विरुद्ध भूक.

५१. निसर्ग आणि आजची समाज रचना.

५२. शंभाला-वाळवंटातला झरा.

५३. ध्वनि आणि प्रकाश लहरी मरत नाहीत.

५४. आकाश-पृथ्वीचं/निसर्गाचं मन.

५५. मेंदूचं मानवीकरण.

५६. कुणाचं ऐकावं? संगणकाचं का आजोबांचं?

५७. भौतिक अणूवर विश्वास ही सुद्धा अंधःश्रद्धा.

५८. जगाच्या चालकाला रिटायर कोण करणार?

५९. ऊर्जेची साधनं आणि नवी सभ्यता.

६०. विज्ञान विरुद्ध परिणाम.

६१. दृश्य अदृश्य विश्वाचं सहअस्तित्व.

६२. नटराज आणि परमाणंचं नृत्य.

६३. खरा बुद्धिवाद कोणता?

६४. अहंकार आणि सावली.

६५. पैसा उधळा-डब्लू.टी.ओ.चं. बोधवाक्य!

६६. जनुकात बदल?

६७. प झी थिंकिंग-विज्ञानाला बधीर करणारं द्रव्य.

६८. प झी थिंकिंग-विज्ञानाला बधीर करणारं द्रव्य.

६९. कलियुग-मानवी संस्कृतीचा संहार करणारा काळ.

७०. श्रद्धा की अंधःश्रद्धा?

७१. कलियुगात नाम हाच देवाचा अवतार.

७२. संस्कारांचा मानसशास्त्रीय अर्थ!

७३. व्हॅलेंटाइन डे आणि देशप्रेम.

७४. गुरुकुल आणि पब्लिक स्कूल.

७५. दोन मनांचा समेट -ॐ शांतिः शांतिः शांतिः

## किती समजावू सांग.

१.	ए बामण्या, मला आत घे पटकन!

का रे? इतका घाबरला का आहेस?

अरे मला कुणी तरी हाक मारत होतं. सगळीकडं शोधलं. पण कुणी हाक मारली, का मारली? उलगडा होईना. तो आवाजही ओळखीचा वाटेना. त्यामुळं मी जास्तच गोंधळून गेलो.

ते दिसतंच आहे. पण घाम फुटायला काय झालं?

काय झालं म्हणजे काय? कोण, कां, कुठून हाक मारतंय ते कळलं नाही तर माणूस घाबरून घामाघूम होणार नाही?

बा मना, घाबरू नकोस. मीच ती हाक मारली होती तुला.

तू? यस्, यस्! तूच हाक मारलीस? आठवलं! बामणा अशी शिवीच दिलीस मला! भिंती आडून हाक मारताना तुला थोडी तरी ही... वाटायला पाहिजे होती.

बामणा नाही,'बा मना' अशी हाक मारली होती मी. त्या हाकेला प्रतिसाद दे!

प्रतिसाद देऊ? शिट्! धर्म-कर्म, जात-पात, स्पृश्य-अस्पृश्य काहीच न मानणारा मी, तुझ्या हाकेला प्रतिसाद देऊन काय करू?

का? तू मला नेहमी बामण्या अशी हाक मारतोस. मला सांग, बामण्या आणि बा मना या दोन शब्दात किती फरक आहे? अगदी थोडा. पण मी तुला नेहमीच प्रतिसाद देतो की नाही. अरे तू आणि मी एकाच व्यक्तिमत्वाची दोन रूपं आहोत. बामण्या म्हण किंवा बा मना म्हण.

नाही! तू सनातनी आहेस. बुरसटलेला, प्रतिगामी आहेस. बुद्धिवादाचं, विज्ञानाचं वावडं आहे तुला.

बा मना, तसं नाही रे? तुला आता कसं समजावू? तुला ठाऊकच आहे की, माणसाला दोन मनं असतात. त्या दोघांत संघर्ष चालू असतो.  अमूक चूक, तमूक बरोबर, असं त्या संघर्षाचं स्वरूप असतं. दोन मनातल्या संघर्षाचे खटले तू अनेक वेळा चालवलेस. बुद्धीची साक्ष काढून माझ्या-म्हणजे बुरसटलेल्या प्रतिगामी मनाच्या हातात बेड्या ठोकल्यास, हद्दपार केलंस. पण ते योग्य होतं का? मनाची ही अवस्था दूर नको का करायला? आधुनिक माणसाच्या मनात परस्पर विरोधी विचारांच एवढं जंगल माजलेलं असतं, की त्यातून मार्ग काढण्यासाठी दुसऱ्या मनाला साद घालणं आवश्यकच आहे. बा मना, आपल्या दोघात चर्चा तरी होऊ दे.

२. अनेक वैचित्र्यानं नटलेल्या आपल्या देशात माणसांची एक विचित्र जात होती किंवा आहे म्हटलंस तरी चालेल. ही माणसं भोवतालच्या दृश्य जगाकडं बघत बसण्यापेक्षा आपल्या आत काय खळबळ चालू आहे, ते बघण्यात गुंग असत. भोवती काय घडतय, त्याकडं त्यांनी लक्ष दिलं नाही, असं नाही. उलट सगळ्या विश्वातून चांगले चांगले विचार आमच्यापर्यंत येवोत, अशीच इच्छा वैदिक काळात माणसानं बाळगली होती. विचारांचं जागतिकीकरण करण्याचा तो पहिलाच प्रयोग असावा. पण दुसरीकडून आलेले विचार आपल्या आत घेऊन, घुसळून, नंतर योग्य अयोग्य ठरवण्याचा, योग्य विचार स्विकारण्याचा, अयोग्य विचार टाकून देण्याचा अधिकार मात्र त्यांनी स्वतःकडं ठेवला होता.

डोळे मिटून घेऊन स्वतःच्या आत डोकावून बघण्याचा छंद जडलेल्या या माणसांची समाजानं टिंगल केली, हेटाळणी केली! कधी कधी छळ सुद्धा केला. 'बा मना' म्हणणाऱ्या लोकांना वेगळं काढून, त्यांची एक नवीन जात निर्माण करून, त्या बामनांचं काही ऐकू नका, त्यांच्या मागं जाऊ नका, असा इशाराही सामान्य लोकांना दिला गेला.

खरं तर बा मना म्हणणाऱ्या लोकांचं, जन्मानं जात ठरवणाऱ्या लोकांशी वैर असण्याचं कारण नाही. कारण आपल्याच आत डोकावून बघायचं, अंतर्मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करायचा आणि 'बा मनाच्या'

जातीत सामील व्हायचं इतका साधा, सोपा, सरळ व्यवहार होता तो. भारतातल्या अनेक संत महात्म्यांचा समावेश होता त्या बा मनाच्या जातीत. पण जातीय हेवेदावे आणि स्वार्थ जपून राजकारण खेळण्याची सवय लागलेल्या समाजाला बा मनाच्या जातीची विशालता आणि कुणालाही सामावून घेण्याची सहिष्णुता कशी सहन व्हावी? बा मना वाल्यांची सदैव टिंगल टवाळीच झाली.

पण अशा टवाळीनं नाउमेद व्हायचं कारण नाही. स्वतःच्या आत डोकावून बघण्याची तयारी असेल, भोवतालच्या जगात, विचारविश्वात काय उलथापालथी चालल्या आहेत त्याचा मागोवा घेऊन आपण कोणत्या मार्गानं जायचं हे ठरवायचं असेल, तर बा मनाच्या जातीत शिरावं, हे उत्तम! तिथं खूप जागा शिल्लक आहेत! शिवाय तिथं स्त्रियांसाठी, मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचीही भानगड नाही.

३. ए.. आपण कुठं चाललोय?

जिथं, गोंगाट किंवा मागण्या मान्य करून घेण्यासाठी संघर्ष चालू नाही, अशा शांत जागी जाऊ या. कारण विचारांना चालना देण्यासारखं किंवा आपली दृष्टी विशाल करील, असं तिथं काही घडणार नाही. गर्दी, गोंगाट, कोलाहलातून (लहरी) कलावंतानं प्रेरणा घेतली पाहिजे, असं ज्ञानामृत पाजणारे पुरोगामी बुवा (किंवा नेते म्हण वाटलं तर) तिथं भेटतील. कलावंतांना, कामगारांना, सरकारी नोकरांना, शेतमजुरांना आणि इतर अनेक बेकारांना त्या कोलाहलाच्या यज्ञात गुंतवून ठेवून ते पुरोगामी बुवा धर्म पंडिताच्या थाटात निघून जातील पंचतारांकित मठीत विसावतील. कुणाच्याच हाताला काही लागणार नाही. आपलं अनुभव विश्व समृद्ध करण्यासाठी त्याचा काहीही उपयोग होणार नाही. तू तन, मन, धन खर्च करशील. पण त्याचं श्रेय नेत्यांच्या सुटकेसमध्ये पडेल. तुझ्या निर्मितीवर बुवांचा शिक्का असेल. श्रेयानं भरलेली नेत्यांची सुटकेस मात्र फुगत जाईल.

अरे वेड्या, एकांत आणि बेहोशी हा नवनिर्मितीचा एकमेव मार्ग सोडून उड्या मारत सुटशील तर दात पाडून घेशील. आपले दात आपणच पाडून घेण्याचे दिवस संपलेत रे राजा!

४.	काय झालं रे?

बामण्या अरे, डोळ्यापुढचं दृश्य गोल गोल फिरलं. बसल्या जागी पृथ्वीचा फरफटका केल्यासारखं वाटलं.

काय दिसलं?

उंच पर्वत शिखरं, दऱ्या खोरी आणि समुद्राची अथांग खोली. म्हणजे शास्त्रज्ञ सांगतात की पृथ्वी गोल आहे ते खोटच आहे ? भ्रमच आहे तो ?

बा मना, कोणत्याही आकाराची वस्तू प्रचंड वेगानं फिरवली की ती वस्तू गोल आहे, असा भास होतो. लेथ मशिनवर लावलेला लाकडाचा किंवा लोखंडाचा तुकडा गरगरायला लागला की तो पण वाटोळा, गोल दिसू लागतो. दृष्टी भ्रम! दुसरं काय?

तसाच प्रकार पृथ्वीच्या बाबतीत नाही ना? एका शास्त्रज्ञानं सांगितलं की दुरुन पाण्यावर तरंगत येणाऱ्या जहाजाचा किंवा होडीचा झेंडा प्रथम दिसतो. त्यावरुन पृथ्वी गोल आहे हे सिद्ध होतं. पण गरगरणाऱ्या लोखंडाच्या तुकड्याचं उदाहरण इथ लागू केलं तर पृथ्वी गोल नाही, असंच म्हणावं लागेल की नाही?

पृथ्वीचा खरा आकार जाणून घ्यायचा असेल, तर पृथ्वीची गती थांबवून निरीक्षण केलं पाहिजे. पण पृथ्वीची गती थांबेल त्या क्षणाला कण अन् कण विघटीत होऊन अवकाशात फेकला जाईल. पृथ्वी आणि आपणही नष्ट होऊन जाऊ. मग तपासणार काय! शास्त्रज्ञांनी भ्रमाकडे नेणारे असेच अनेक भ्रम निर्माण करून ठेवलेत.

पृथ्वीबरोबर फिरत राहणाऱ्या सजीव-निर्जीव गोष्टींचं अस्तित्वही भ्रामक आहे, ती माया (ळश्रश्रीीळेप) आहे असं आपल्या तत्ववेत्यांनी सांगितलं ते खरं का मग? अरेच्या, हे भलतंच लचांड होउन बसलंय. शास्त्रज्ञांनी निर्माण केलेले भ्रम तेवढे शास्त्रीय सिद्धांत. पण आपल्या तत्ववेत्यांनी मांडलेल्या

कल्पना मात्र भ्रामक कल्पना? शास्त्रज्ञांनी जोपासलेला भ्रम खरा आणि साधुसंतांनी अनुभवलेलं सत्य हा भ्रम असं समीकरण मांडणाऱ्या हल्लीच्या विचारवंतांना काय म्हणावं?

भ्रमाकडून भ्रमाकडं नेणाऱ्या कल्पनांचा पाठपुरावा करणं आपण सोडून देऊ या. आणि जग मिथ्या आहे, पण जगाचा निर्माता सत्य आहे, या भ्रमाचा पाठपुरावा करून बघू या. कुणी सांगावं एखाद्या दिवशी त्या भ्रमाचा भोपळा फ़ुटून अंतिम सत्य आपल्या हाती लागेल.

५. स्वतःच्या कृतीनं स्वतःचंच अस्तित्व धोक्यात आणणं म्हणजे अज्ञान.

- एकादी व्यक्ती किंवा वस्तू आपल्या उपभोगासाठीच आहे असं समजून त्या व्यक्तीचं, वस्तूचं स्वतंत्र अस्तित्व नाकारणं म्हणजे अहंकार.

- आपला अहंकार कुरवाळला गेला नाही म्हणून एखाद्या व्यक्तीचं अथवा वस्तूचं अस्तित्व नष्ट करणं म्हणजे अत्याचार.

- संघटित अहंकारापोटी एका मानवी गटानं दुसऱ्या गटाला उद्ध्वस्त करायला तयार होणं म्हणजे दहशतवाद.

-दहशतवाद निपटून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केलेला दहशतवाद म्हणजे युद्ध.

- युद्ध म्हणजे मानवी संस्कृतीचा नाश. यालाच परागती म्हणायचं.

अज्ञान, अहंकार, अत्याचार, दहशतवाद आणि युद्ध या पायऱ्या क्रमाक्रमानं उतरत माणूस-(मानवी संस्कृती) परागतीचं सर्वात खालचं टोक गाठणार आहे. माणसाची जात त्या परागतीकडं जीव घेऊन धावत सुटलीय. याचं मूळ अज्ञानात आहे ही गोष्ट मोठमोठ्या विद्वानांच्याही लक्षात येत नाही.

आपण शांत बसून राहू या. आपल्याच पावलांनी विनाशाकडं धावत सुटण्यापेक्षा स्वस्थ बसून राहण्याचा पळपुटेपणा परवडला.

६.	बा मना, मी कोण? कुठून आलोय? मला कुठं जायचंय? या तीन प्रश्नांच्या उत्तरात माणसाच्या अस्तित्वाचं सार साठवलेलं आहे. वयाची साठी उलटली तरी स्वतःच स्वतःला हे प्रश्न विचरावत, असं वाटत नाही तुला? बरोबर आहे. तसं नाहीच वाटणार. कारण या तीनही प्रश्नांची कुणी तरी देऊन ठेवलेली चुकीची उत्तरं तुझ्या रक्तात पुरती भिनली आहेत. आणि उत्तरं माहीत असल्यावर प्रश्न कशाला उपस्थित करायचे?

बामण्या, मी कोण? हॅ.... हा काय प्रश्न झाला. मी म्हणजे मो. मी माणूस. या संपूर्ण विश्वाचा मालक.

मी कुठून आलो? मला काय देणं घेणं आहे त्या प्रश्नाशी. 'मी या जगात आलोय. जगण्यावर माझं प्रेम आहे.' 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे गाणं मी रोज शंभर वेळा गुणगुणतो. तू तिसरा प्रश्न विचाराच्या आधीच त्याचं उत्तर देऊन ठेवतो. या जीवनाचा परीघ सोडून मला कुठंही जायचं नाहीये! मला सुखानं जगयचंय, त्यासाठी सुखसाधनं जमवायची आहेत. आणि काहीही करून ती साधनं मी जमवणारच! मेल्यानंतर कोण कुठं जातो, कुणी पाहिलंय? मग मी त्याचा विचार का करावा?

तू हे सगळं बोलतोयस, ठाम मतं मांडतोयस, याचा अर्थ तुला जीवनाचीच नशा चढली आहे. ती नशा उतरवण्याचा एक नामी उपाय आपल्या साधूसंतांनी सांगून ठेवलाय- नामस्मरण! थांब, थांब. मला माहित आहे की, जीवनाची नशा चढलेली माणसं 'मी' शिवाय कुणावरच विश्वास ठेवत नाहीत.  जे काही आहे, ते मीच. मी या विश्वाचा मालक असं समजल्यावर इतर व्यक्तींना किंवा देव या कल्पनेला जागाच उरत नाही. ठीक आहे. देवाचं नाव घेऊ नकोस. स्वतःच्या नावाचंच स्मरण कर. काय नाव आहे तुझं! शंभू? महादेव? गोविंद? अंगद? रावण? संजय?तानाजी? - अरे...अरे, असा रागवू नकोस. तुझ्या स्वतःच्या नावाचं स्मरण कर. म्हणजे स्वतःलाच शरण गेल्यासारखं होईल. आणि जीवनाची नशा हळूहळू कमी होऊन तुझे पाय जमिनीला लागतील. हा प्रयोग करून बघच.

७. ए बामण्या, मी पुस्तक वाचतोय ते दिसत नाही? मग शुक् शुक् करून मला डिस्टर्ब का करतोयस्?

अरे? आपलं काय ठरलं होतं? मी बामण्या. म्हणजे सनातनी, अनेक जुन्या गोष्टीचं समर्थन करणारा, विज्ञानाची टर उडवणारा! उलट तू विज्ञानवादी, बुद्धिवादी, पुरोगामी वगैरे वगैरे. खरं ना? असं असलं तरी आपण दोघांनी आपल्या टोकाच्या भूमिका सोडून विचारांची देवाणघेवाण करायची, असं ठरलं होतं ना? अर्थात तुझी भुमिका सोडायला तुला थोडा तरी वेळ दिला पाहिजे? ठीक आहे. वाच, वाच! हातात पडेल तो मजकूर वाचून काढ. शाळा कॉलेजची क्रमिक पुस्तकं, वर्तमानपत्रं, नियतकालिकं, कविता, कथा कादंबऱ्या, टीकासंग्रह, प्रवासवर्णनं, चरीत्रं किंवा आत्मचरीत्रं, वैज्ञानिक कथासंग्रह, हातोहात विकली जाणारी पुस्तकं, सगळं वाचून टाक. धार्मिक आणि शास्त्रीय ग्रंथ वाचायलाही विसरू नकोस.

इतकं सगळं वाचल्यावर तुझ्या मनात छानपैकी गोंधळ निर्माण होईल. अशा गोंधळातून वाट दाखवणारं एकादंच पुस्तक हाती पडलं आणि त्याच्यातला एकादा विचार जरी तुला पटला, तर तू खरंच वाचशील. सुदैवानं तो ग्रंथ श्रीमद् भगवत गीता, तुकाराम महाराजांची गाथा, ज्ञानेश्वरी किंवा दासबोध असेल, तर तू नक्की वाचशील. म्हणजे वाचून वाचशील.

८. बामण्या, तुला सांगून ठेवतोय. भलत्या सलत्या गोष्टी सांगून मला बिथरवू नकोस. उद्या काय होणार आहे, ते तू सांगू शकशील? नाही! मग आत्ताचा सुखाचा क्षण मी वाया का घालवू? मी हा क्षण रसरसून जगणार आहे, उपभोगणार आहे.

अरे वेड्या, तुला उपभोग आणि भोग यातला फरक कळलाय कुठं? तुला कळलाय फक्त दांभिक भौतिकवाद्यांनी दिलेला कानमंत्र. 'ऋण कृत्वा घृतं पिबेत!' 'ऋण काढून सण साजरा कर. जे सुख तुला हवंहवंसं वाटतंय, ते आज, आत्ता, इथे मिळवण्यासाठी वाटेल ते कर, तो तुझा हक्क आहे. अधिकार आहे.' हाच तो कानमंत्र ना?

बा मना, तुला आता कसं समजावून सांगू? आपल्या पारंपारिक विचारसरणीप्रमाणं भौतिक सृष्टीचं संरक्षण आणि संवर्धन हा भारतीय भौतिकवादाचा पाया होता. अजूनही आहे. त्यामुळं जुन्या काळी निसर्गानं किंवा माणसानं निर्माण केलेल्या गोष्टी खाऊन पिऊन किंवा अन्य मार्गानं भोगून संपवून टाकण्याची पद्धत नव्हती. पृथ्वी(जमीन), आप(पाणी), तेज (प्रकाश), वायु (हवा) आणि आकाश (पोकळी) या पाच भौतिक घटकांचं मूळ स्वरूप न बदलता-(किंवा न बिघडवता)- जेवढा उपभोग घेता येईल तेवढाच घेण्याचा अधिकार तुला आहे. हे तुझ्या लक्षात येतंय का? मग मनात आलं म्हणून आज, आता, इथं या भावनेनं सजीव-निर्जीव सृष्टीवर बलात्कार करून त्यांचा उपभोग घेण्याचा तुला काहीही अधिकार नाही.

भारतीय भौतिकवादाच्या मूळ तत्त्वावर श्रद्धा ठेवून आपल्या पूर्वीच्या पिढ्यांनी हजारो वर्षे आपल्या भोवतीच्या निसर्गाचं संरक्षण केलं. वेळ प्रसंगी स्वतःच्या सुखोपभोगाचाही त्याग केला. कशासाठी? अर्थात तुझ्या सुखासाठी. पण दांभिक भौतिकवाद्यांनी म्हणजेच इहवादाच्या बुरख्यात लपलेल्या चंगळवाद्यांनी भौतिक सृष्टीचं मातेरं-पोतेरं करून टाकलंय. आज काय शुद्ध उरलयं? माती किडली आहे, पाणी दूषित झालंय, तेज झाकोळलंय, वायू मंडळाला भगदाडं पडलीयत. आकाशात पाठवलेल्या कृत्रिम उपग्रहांनी ग्रहताऱ्यांशी स्पर्धा सुरु केली आहे.

अशी किडलेली, नासलेली, बुजबुजलेली आणि उद्‌ध्वस्त झालेली भौतिक सृष्टी पुढल्या पिढीच्या हातात टाकताना आपल्याला शरमेनं मान खाली घालून उभं रहावं लागेल. पुढच्या पिढ्या आपल्या नावानं दोन्ही हातानं बोंबा मारतील. अरे एवढंच नाही, तर आपल्या तोंडी अण् भट्टीच्या राखेचे तोबरे देऊन जिवंतपणीच आपलं श्राद्ध करतील.

म्हणून म्हणतो, मानवजातीच्या नाशाला कारणीभूत होणारा चंगळवाद सोडून दे. पाश्चिमात्य राष्ट्रांनी रचलेला तो एक जागतिक कट आहे. तो आपल्यापुरता तरी उधळून लावू या. आणि ‘जगण्यापुरता उपभोग’ हा आध्यात्मिव भौतिकवाद उराशी कवटाळून धरू या.

९.	बामण्या, लेका विज्ञानानं लावलेल्या सगळ्या शोधांचा हेतू माहित आहे का तुला?

हो....! माणसाचं जीवन सुखसोयींनी पूर्ण असावं, याशिवाय दुसरा कोणता हेतू असणार. पण बा मना, या बाबतीत तुझाच काही तरी गैरसमज झालेला दिसतोय. म्हणजे काय होतंय बघू या हं.

नव्या नव्या शोधांचं पेटंट घेऊन वस्तू निर्माण करणारा उद्योजक, वितरक, किरकोळ विक्रेते आणि ग्राहक, सगळेच तृप्त, समाधानी दिसले पाहिजेत. पण प्रत्यक्षात तसं दिसत नाही. प्रत्येकजण दुसऱ्याविरुद्ध तक्रार करताना आढळतो. ग्राहक विक्रेत्याविरुद्ध, विक्रेता उत्पादकाविरुद्ध, उत्पादक सरकारविरुद्ध, तक्रारींची रांगच रांग लागलेली दिसते. याचा अर्थ काय? उत्पादकांची नैतिकता घसरली? पुरवठादारांना जास्त लोभ सुटला? का ग्राहकांना उगीचच तक्रारी करत सुटण्याची सवय लागलीय? का सुखसोयी कमी पडतायत? वाढत्या लोकसंख्येबरोबर मागण्याही प्रचंड वाढत आहेत. स्मार्ट यंत्रं पण चुकारपणा करायला लागली आहेत? कारण काहीही असो. माणूस सुखी समाधानी नाही, हे मात्र खरं.

एकीकडे वस्तूंचा आणि सेवांचा घसरत जाणारा दर्जा, दुसरीकडे वस्तूंची वाढत जाणारी किंमत किंवा सेवाशुल्क, तर तिसरीकडे ग्राहकांची आकाशाला भिडणारी अपेक्षा, या त्रिकोणी चढाओढीत कुणालाच खरं सुख समाधान मिळत नाहीये.

बा मना, गोंदवलेकर महाराज म्हणतात तेच खरं. 'समाधान ही मनाची अवस्था आहे. तुमच्या घरात किती आणि कोणत्या वस्तू आहेत, यावर ती अवस्था अवलंबून नाही.' संत तुकाराम महाराज या मनोवैज्ञानिकांनीही हेच सत्य सांगून ठेवलं आहे.'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण । मोक्ष अथवा बंधन । सुखसमाधान तया ते ।।'

तुझ्यासारख्या सुज्ञास वस्तू आणि समाधान यांचं नातं अधिक स्पष्ट करून सांगण्याची गरज नाही.

१०.	बामण्या, मला एक प्रश्न सारखा सतावतोय. खूप विचार केला तरी....

कळलं ! नुसता प्रश्न उपस्थित करून किंवा त्या प्रश्नाची चिरफाड (अपरश्रूीळी) करूनही तुला उत्तर सापडत नाहीये. खरं ना? आणि समजा उत्तर सापडलं, तरी ते एकांगी किंवा साचेबंद असण्याची शक्यता जास्त. कारण एखाद्या प्रश्नाचा सर्वांगिण (केश्रळीींळल) विचार करणं माणसानं केव्हाच सोडून दिलंय. आजच्या धकाधकीच्या जीवनात एखाद्या प्रश्नाचा विचार करायला लागणारं ज्ञान किंवा तेवढा वेळ कुणापाशीच नाही. त्यामुळं काय होतंय ठाऊक आहे ? समोर उभ्या ठाकलेल्या प्रश्नाचं शोधलेलं उत्तरच प्रश्नचिन्ह बनून आपल्यासमोर उभं राहतं. आज एक प्रश्न आणि त्याचं उत्तरं! उद्या तेच उत्तर प्रश्न बनून समोर येतं. त्याचं उत्तर परवा प्रश्न बनतं. चौथं उत्तर पाचवा प्रश्न बनतं. कधी थांबणार आहे हे दुष्ट चक्र?

हे चक्र थांबूच नये अशी राज्यकर्त्यांची, बुद्धिवाद्यांची, विचारवंतांची इच्छा असते. कारण उत्तर शोधण्याच्या धंद्यावर त्यांची पोटं भरत असतात. लाखो लोक या धंद्यात उतरले आहेत. आपलं आणि आपल्या कुटुंबाचं पोट भरत आहेत. विश्लेषक, बुद्धिवंत, विचारवंत म्हणून सामाजिक प्रतिष्ठा मिळवत आहेत.

काळं पुढं गेला की परिस्थिती बदलते आणि बदललेली परिस्थिती सत्तर ते ऐंशी टक्के प्रश्न खाऊन टाकते. म्हणूनच साईबाबांनी सबुरीचा उपदेश केला असावा. उत्तर शोधण्याच्या कामावर नेमलेलं नोकरशहा, बुद्धिवंत, विचारवंत साईबाबांचे भक्त बनलेत. आणि सबुरीनं काम करत आहेत. एखाद्या प्रश्नाचं घोंगडं वर्षानुवर्ष भिजत ठेवलं की, त्या प्रश्नाचा एकेक धागा कुजून गळून पडतो. प्रश्नच अस्तित्वात राहात नाही. मग उत्तर कशाचं शोधायचं?

बा मना, आपल्याला भेडसावणाऱ्या प्रश्नांच्या बाबतीत सबुरीची शिकवण आपणच आचरणात आणू या. त्यामुळं उत्तरं शोधण्याच्या कामावर नेमलेल्या लोकांवरचा ताण एक शंभर कोट्यांशानं तरी कमी होईल. आपलं समाधान मात्र शंभर पटीनं वाढेल.

११. साली एक गोष्ट मनासारखी होत नाहीये.

बा मना, सगळ्या गोष्टी तुझ्या मनासारख्या घडतील किंवा तू घडवशील असा तुझा समज असेल, तर तुला बौद्धिक दिवाळखोरीनं ग्रासून टाकलंय असं समज. अरे सगळ्या सुखदुखाच्या चाव्या तुझ्या हातात असत्या, तर‘मी घडवलं’ असं गर्वानं म्हणायला तू मोकळा होतास. पण ते शक्य नाही. अगदी तुझ्या जन्मापासून तुझं आयुष्य तपासून बघ म्हणजे मी काय म्हणतोय, त्याचं मर्म तुझ्या लक्षात येईल.

कोणत्या कुळात, कोणत्या आईबापांच्या पोटी जन्म मिळणार, बालपण कसं जाणार, जाणतेपणा येईपर्यंत शिक्षण कसं होणार याबाबतीत तू सर्वस्वी आईवडिलांवर अवलंबून होतास. तारुण्यात पाय टाकल्यानंतर चांगली नोकरी मिळणं आणि ती टिकून राहणं हे तुझ्या साहेबांच्या लहरीवर अवलंबून होतं. त्याचप्रमाणं सुस्वभावी बायको मिळणं, मुलं चांगली निपजणं, म्हातारपणी निरोगी आयुष्य लाभणं या गोष्टीही तुझ्या स्वतःच्या कर्तृत्वावर अवलंबून नव्हत्या.

ए बामण्या, गप्प बस हं. म्हणजे मी काहीच केलं नाही, असं म्हणायचंय तुला?

तू असा चिडू नकोस. मला एवढंच म्हणायचंय की, कार्यकारण सिद्धांताचा आधार घेऊन तुझ्या आयुष्यात घडलेल्या अनेक घटनांचं श्रेय तू स्वतःकडं घेतोयस.  पण ते योग्य नाही. अलिकडल्या काही शास्त्रज्ञांनी कार्यकारण भाव सुद्धा नाकारलाय. आणि ‘अज्ञात कारणांचा’ (णपज्ञपेप ठशरीपी) किंवा ‘वैश्विक संबंधांचा’ (खपींशी ीशश्रींशपवपशींी) सिद्धांत मांडलाय.

या अज्ञात कारणांना ‘देव’ आणि वैश्विक संबंधांना ‘ईश्वरी इच्छा’ अशी नावं आपल्या पूर्वजांनी दिली नसतील कशावरून? तर सांगण्याचा मुद्दा एवढाच की, ‘मी मी’ च्या आणि ‘कार्यकारण भावाच्या’ जोखडाखालून स्वतःची लवकर सुटका करून घे.

१२.   बा मना, या विश्वाच्या अवाढव्य पसाऱ्यात ‘मी’.  किंवा ‘तू’ याला किती महत्त्व आहे? शून्य ! आपण असलो काय, किंवा नसलो काय. विश्वात घडणाऱ्या उलथापालथीवर आपल्या नसण्यामुळं काहीही परीणाम होणार नाहीय. मग मी, तू च्या जंजाळातून बाहेर का पडत नाहीस? टाकून दे तो मी चा अहंकार

आणि तू चा द्वेष. तू आणि मी एक होऊया.  तसं झालं तरच आपल्या भोवतालच्या सजीव-निर्जीव सृष्टीशी आपल्याला संबंध जोडता येईल. आज उगवलेला दिवस आनंदानं जगता येईल.  सामान्य माणसाला गाठता येईल असं ते एकच शिखर आहे.

१३. बामण्या, तू माझ्या उत्साहावर पाणी टाकू नकोस हं, सांगून ठेवतो.

तुझ्यात आज इतका उत्साह का संचारलाय पण ? अरे हो. विसरलोच होतो. आज तुझा वाढदिवस आहे ना? म्हणजे तू आणखी एका वर्षानं मृत्यूच्या जवळ गेलास....! थांब, थांब. असा चिडू नकोस.  एक गोष्ट लक्षात घे. माणूस आपले आणि आपल्या नातेवाईकांचे जन्मदिवस साजरे करतो, किंवा स्मृतिदिनाच्या दिवशी दुःख व्यक्त करतो. काय कारण असेल त्याचं? आप्त इष्ट मित्रांसाठी आपण काही तरी केलं हे दाखवण्यासाठी? दुसरा काय हेतू असणार?

बा मना, प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जन्म-मृत्यूच्या क्षणाची जाणीवही नसते. तुला ती जाणीव आहे? नाही! मग जन्म-मृत्यूच्या सुख-दुःखाशी तुझा काय संबंध? दुसऱ्याला झालेल्या सुख-दुःखावरून तू तुझ्या सुख-दुःखाच्या कल्पना ठरवू नकोस. तसं करशील, तर सुखात वाहात जाशील. नाही तर दुःखात बुडून मरशील.

१४. 'त्याचं चिंतन करावं, त्याच विषयी बोलावं, तेच दुसऱ्याला पटवून द्यावं.'

ए पुरे रे !! तुला माहित आहे. माझा देवावर विश्वास नाही. मग कशाला नसती बडबड करतोस?

अरे पण मी देवाचं नाव तरी काढलं होतं का? मी अंतिम सत्याबद्दल बोलतोय. व्यक्तीला जाणवलेल्या अंतिम सत्याबद्दल. तुला जाणवलेलं अंतिम सत्य काय आहे? तुला विज्ञानानं जे सांगितलं, तुझ्याभोवती जे घडलं, तुझ्या जाणिवेच्या परिघात जेवढं आलं, तेच तुझ्या बाबतीतलं सत्य आहे. पण ते अंतिम सत्य नाही. खरं की नाही?

विज्ञानाला अंतिम सत्यापर्यंत पोहोचायला खूप वेळ लागणार आहे, खूप प्रयोग करावे लागणार आहेत. आणि हजारो कोटी रूपये खर्च पडणार आहेत. आता हेच बघ ना. गोलाकार चमकणारी वीज (Ball Lightning) या नैसर्गिक चमत्कारामागचं सत्य शोधून काढण्यासाठी अनेक शास्त्रज्ञ गेली शे-दीडशे वर्षे धडपडतायत. पण अजून त्या चमत्काराची नक्की उकल झालेली नाही. चार वैज्ञानिकांनी चार प्रकारे त्या चमत्काराबद्दल स्पष्टीकरण दिलंय. म्हणजे शास्त्रज्ञांनी दिलेलं स्पष्टीकरण अंतिम सत्य नाही एवढं तरी खरं की नाही?

अंतिम सत्य शोधण्याचे प्रयत्न चालूच राहणार आहेत. त्या प्रयत्नांचे पुरावे पुढे येणार आहेत. पण वैज्ञानिक दृष्टिकोनाची पताका खांद्यावर घेतलेले आपल्याकडचे बुद्धिवादी 'आम्हाला सापडलं तेच अंतिम सत्य, पारंपारिक ज्ञान खोटं' अशी डिंग मारत नाचत आहेत. तू मात्र त्या डिंगऱ्यांच्या बरोबर नाचू नकोस.

विज्ञानाला अंतिम सत्य सापडत नाही, तोपर्यंत पारंपारिक सत्याच्या चिंतनात राहा. अर्थात, त्याचं चिंतन करावं, त्याचविषयी बोलावं, तेच दुसऱ्या पटवून द्यावं.

१५. पृथ्वीवर भटकणाऱ्या सजीव सृष्टीमधे माणूस नावाचा एकच जीवगट असा आहे ज्याला जन्मल्यापासून प्रत्येक गोष्ट शिकवावी लागते. माणसाचे पिल्लू जन्माला आल्याबरोबर रडलं नाही, तर त्याच्या पाठीवर चापट्या मारुन रडवावं लागतं. त्या क्षणापासून ते मरणाच्या क्षणापर्यंत 'आता सगळ्या इच्छा-आकांक्षा सोडून, सगळे पाश तोडून सुखानं देह ठेव' असं समजवावं लागतं.

इतर प्राण्यांत मात्र शिकवणं, समजावणं हा प्रकार नसतो. जन्मल्यापासून काही मिनिटातच गाईचं वासरू आपल्या आईची आचळं शोधून काढतं आणि दूध पिऊ लागतं; वारूळ बांधण्याचं तंत्रज्ञान मुंग्यांना शिकवावं लागत नाही; चिमण्या-कावळ्यांनी आपल्या मुलांना घरटी बांधण्याच्या क्लासमध्ये घातलेलं ऐकिवात नाही. एवढंच काय पण वयात आलेल्या नरमाद्यांना लैंगिक शिक्षणही द्यावं लागत नाही. आई

वडिलांच्याकडून मिळालेल्या स्मृतीच्या आधारानं (यालाच आपण जेनेटिक मेमरी किंवा अंतःप्रेरणा म्हणू या वाटलं तर.) पशुपक्षी वागत असतात. त्यांचं कुठलंही काम अडत नाही. जिन्समधून येणाऱ्या संवेदनाप्रमाणे किंवा आज्ञेप्रमाणे काम करीत राहण्याच्या ज्ञानापासून निसर्गानं माणसालाच दूर ठेवून माणूस जातीवर सूड उगवलाय, असं नाही वाटत तुला?

पण माणसाला शिकवावं लागतं या गोष्टीचा एक फायदा झालाय तो लक्षात घे. आई-बाप, आजोबा-आजी, मास्तर-मास्तरणी, प्रवचनकार-विचारवंत, बुद्धिवादी-गुरू या लोकांची सोय झालीय. दुसऱ्याला शिकवणाऱ्या लोकांची फौजच निर्माण झालीय! दुसऱ्या व्यक्तीला शिकवता शिकवता त्या शिकवणी प्रमाणं आचरण करण्याचं भानच कुणाला राहिलेलं नाही. कारण शिकवणाऱ्यांना तेवढा वेळच नाही. ठीक आहे, चालू द्या.

पण यामुळं मानवी जीवगट किती बेशिस्त आणि विस्कळीत होतोय त्याचा विचार कर. आतून येणाऱ्या संवेदना कळत नसतील, तर निदान 'बोले तैसा चाले' या संतांच्या शिकवणीचं भान तरी ठेव. आणि तसं भान ठेवता येत नसेल, तर दुसऱ्याला शिकवू नकोस. मौन धारण कर.

१६. बा मना, सबंध जीव सृष्टीमध्ये उत्क्रांतीचा खेळ एकाच वेळी एकाच दिशेने चालू होता का रे ?

काही शास्त्रज्ञ तसं म्हणतात खरं.

पण तसं मानून वेगवेगळ्या देशातील मानवजातीच्या उत्क्रांतीबद्दल सरळसोट विधानं करीत राहणं, याला शास्त्रीय हेकटपणाच म्हटलं पाहिजे. समजा, तो शास्त्रीय सिद्धांत खरा मानला, तर कोड्यात टाकणारे अनेक प्रश्न उभे राहतात. माणसांच्या मनाची एकाच प्रकारे, एकाच दिशेने, एकाच वेळी उत्क्रांती का झाली नाही? वेगवेगळ्या देशात राहणाऱ्या मानवी गटांच्या उत्क्रांतीच्या स्तरात फरक का जाणवतो? भारतात ज्यावेळी वेद, सहा शास्त्रं, उपनिषदं आणि रामायण, महाभारतासारखी ऐतिहासिक महाकाव्यं लिहिली जात होती, त्याच काळात काही मानवी गट अज्ञानयुगात का चाचपडत होते? उत्थानपर्वाची

(Renaissance) इसवी सनानंतर चौदाव्या शतकापर्यंत त्यांना वाट पाहावी लागली? या प्रश्नांची उत्तरं शोधू लागलं तर उत्क्रांतीचा चालक, देश-प्रदेशानुसार वेगवेगळा असावा, असं म्हणावं लागतं. देशोदेशातल्या मानवाच्या उत्क्रांतीच्या आलेखात तो सर्वज्ञ चालक असा अन्याय्य फरक करेल?

ए बामण्या, तू नको ते प्रश्न उपस्थित करू नकोस.

अरे या प्रश्नांची उत्तरं मिळाल्याशिवाय आपल्याला पुढं जाताच येणार नाही. ठीक आहे. आपण दुसऱ्याच प्रश्नांचा विचार करू या.

उत्थान पर्वानंतर पाश्चात्य मानवी गटांनी मानव जातीला कोणती देणगी दिली? अगदी बरोबर. एकेका वस्तूची, गोष्टीची चिरफाड करून (analysis) त्या गोष्टीचं संपूर्ण ज्ञान मिळवण्यासाठी पृथःकरण पद्धती आणि त्या पद्धतीला पूरक ठरेल अशी विचारांची विश्लेषण पद्धती. या दोन्ही हत्यारांचा वापर करून त्या मानवीगटांनी माणसाला दिल्या विज्ञान व शास्त्राच्या अनेक शाखा आणि उपशाखा. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, भूगर्भ आणि खगोलशास्त्र, शरीरविज्ञान, वैद्यकशास्त्र, मानसशास्त्र, बाप पे! किती या शाखा, उपशाखा? ज्ञान विज्ञानाची इतकी दालनं उघडली आणि त्यांचा जगभर इतका प्रचार केला गेला, की मानवजात नुसती भांबावून गेली असं नाही तर भ्रमिष्ट व्हायची वेळ आली. एक शास्त्रज्ञ एका दालनातून बाहेर येई, त्याचवेळी दुसरा शास्त्रज्ञ तिसऱ्याच दालनात शिरलेला असायचा. अशी धावपळ प्रत्येक विज्ञान शाखेत सुरु झाली. अर्थात एकमेकांची भेट, किंवा एकमेकात एकवाक्यता सापडणं कठीणच होतं. कारण प्रत्येक वैज्ञानिकाला जाणवलेलं वास्तव (Reality) वेगळं होतं. वास्तवाची वेगवेगळी वर्णनं पुढे आल्यामुळे समाज आणि वैज्ञानिकही गोंधळून गेले.

मतामतांचा गलबला कमी करण्यासाठी समन्वय समित्या स्थापन झाल्या. शास्त्रज्ञ एकत्र आले. पण त्यांची मतं आणि मनं एकत्र कशी येणार? काही काळ ओढाताण चालूच राहिली. पण नंतर असा एक

विचार पुढे आला की, संबंध विश्वाचा एकत्रित विचार केल्याशिवाय तरणोपाय नाही. (Wholistic world view)

बा मना, असा एकत्रित विचार करणं मानवजातीला अजूनही पचलेलं नाही. कारण मला जाणवलेलं वास्तव हेच अंतिम सत्य या विचाराच्या आहारी गेलेल्या लोकांनी आपापल्या विचारांचं एक संस्थान निर्माण करून त्यावर राज्य करायला सुरुवात केली आहे.

भारतीयांनी सगळ्या ज्ञान-विज्ञानामध्ये समन्वय घडवून आणणारं एक परम तत्व शोधून काढलं. त्या तत्वाचं नाव होतं, 'ब्रह्म'. हे ब्रह्मच जगात वेगवेगळ्या रूपात प्रकट होतं आणि काही काळानंतर प्रकट रूप नाहीसं होऊन परत ब्रह्मात विलीन होतं.

या ब्रह्म किंवा जगाच्या आदिकारणाचं नाव काढलं की, किंचाळण्याची सवय लागलेल्या आपल्या शिक्षितांना ब्रह्म तत्वाची समन्वयशक्ती आणि व्यापकता कळायला आणखी हजार-पंधराशे वर्ष वाट पहावी लागेल. पण आपण तोपर्यंत वाट बघत का थांबायचं? हे परमतत्व आपल्या अस्तित्वाच्या वेगवेगळ्या पैलूत नक्कीच समन्वय घडवून आणील असा विश्वास बाळग.  बा मना, उत्क्रांतीला संघर्षाची नाही, तर समन्वयाची फ ार गरज असते.

१७. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी डेस्कार्टिस नावाचा एक तत्ववेत्ता कम शास्त्रज्ञ होऊन गेला. (त्यालाच कुणी देकार्त किंवा दिश्कार्दिश या नावाने ओळखत असावेत.) त्या शास्त्रज्ञानं एक सिद्धांत मांडला होता. 'मी विचार करतो, म्हणून माझं अस्तित्वं आहे.' इंग्रजीत सांगायचं झाले तर I think, therefore I exist त्याच्या भाषेत Cogito ergo sum. या सिद्धांताचा आपल्याकडील बुद्धिवाद्यांनी सोयस्कर अर्थ काढला. तो असा की, स्वतःचं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी विचार केलाच पाहिजे आणि तो विचार लोकांपर्यंत पोहोचवलाच पाहिजे. मनातला हेतू पक्का झाला, की तो साध्य करण्याचे मार्ग आणि त्या मार्गावरील व्यूहरचना आपोआप डोळ्यासमोर येते. त्यामुळंच प्रत्येक बुद्धिवादी वर्तमानपत्रं किंवा दूरदर्शन या सारख्या

प्रसारमाध्यमांकडे धाव घेऊ लागला. काही वेळा व्याख्याने, प्रवचने आणि चर्चा या माध्यमांची पण कास धरली गेली. विचार केला, तो दुसऱ्यापर्यंत पोहोचवून आपलं अस्तित्व सिद्ध केलं की बस्! विचाराप्रमाणं आचरण करण्याची जबाबदारी आपली नाही. ती जबाबदारी वाचकांची किंवा श्रोत्यांची!! बुद्धिमान विचारवंतांच्या असल्या वागण्यामुळे सामान्य माणूसही विचाराप्रमाणे वागण्याची गरज नाही असं मानू लागला.

त्यामुळं काय होतं की, लोकशाही मूल्यांचा आग्रह धरणारा खाजगी व्यवहारात हुकूमशाही गाजवू शकतो, निरीश्वरवादी अंधारात बसून जपमाळ ओढायला लाजत नाही, मानवतावादाचा हिरिरीने पुरस्कार करणारी कवयित्री, घरात कामावर ठेवलेल्या छोट्या मुलीच्या कंबरेत लाथ घालून तिला साखर झोपेतून उठवू शकते. शिवाय मानवतावादी कवयित्री म्हणून वेगवेगळ्या स्तरावरचे पुरस्कारपण स्वीकारू शकते. कामगार पुढारी पंचतारांकित सुखात लोळू शकतो. भ्रष्टाचाराविरुद्ध भाषण ठोकणारा नेता मित्राने दिलेल्या सुटकेसचा शालीनपणे स्वीकारही करतो. बा मना, शेवटी विचार महत्त्वाचा. आचरण गेलं चुलीत!

आचार-विचारातला फरक भारतीय जीवन पद्धतीला अजिबात मान्य नाही. विचाराप्रमाणे आचरण जमत नसेल, तर विचार करणे सोडून दे. पण बुद्धिवादाच्या आडोशाने आचरणाने नियम धाब्यावर बसवशील, तर तुझ्या नशिबी ‘तहलका’ अटळ आहे.

१८. मनाला सहावं इंद्रिय मानलंय. पण ते नेमके कुठे असते?

ए बामण्या, नाक, कान, डोळे यासारखं दिसणारं इंद्रिय नाही ते. अदृश्य ज्ञानेंद्रिय आहे. मन, बुद्धी, अहंकार या त्रयीपैकी एक. म्हणूनच श्रीकृष्णांनी छातीठोकपणे सांगितलं की, इंद्रियांमध्ये मन मी आहे.

बा मना, ईश्वर दिसत नाही, इंद्रियांना जाणवत नाही, म्हणजे तो नाहीच असं मानणारे विचारवंत, बुद्धिवादी मनाचं मात्र इतकं स्तोम का माजवतात? नवरा-बायकोच्या भांडणात (विशेषतः दोघंही बुद्धिवादी

असतील तर) 'माझ्या मनाचा काही विचार करशील की नाही?' असा प्रश्न हमखास विचारला जातो. पण त्याला उत्तर देण्याची कुणालाच गरज भासत नाही.

मनाच्या बाबतीत मात्र बुद्धिवाद्यांच्या मनात, ईश्वराबद्दल उभे राहतात तसे प्रश्न उभे रहात नाहीत. देव कुठं आहे, त्याचं अस्तित्व सिद्ध करून दाखवता का, देव अस्तित्वातच नाही मग त्याला रिटायर का करीत नाही? असेच प्रश्न मनाच्या बाबतीतही विचारा ना? मन कुठे असते, त्याचं कार्य कसे चालते, त्याला शक्ती कुठून मिळते, ते दहा ठिकाणी का धावते, वासना किंवा इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी ते सारखी धडपड का करीत असते कठीण गोष्टी सतत करणे त्याला का आवडत नाही, संत-महात्म्यांना सुद्धा ते चंचल आणि नाठाळ का वाटते?

मानस शास्त्रज्ञांनी यापैकी काही प्रश्नांची उत्तरं दिलीही असतील. पण ती उत्तरे शोधून वाचण्याची खटपट कोण करणार? मनाला रिटायर करण्याची हिंमत तर कोणीच करणार नाही.

बा मना,  नाठाळ मनाला आपण मात्र काही बाबतीत रिटायर करून बघू या. कारण मनाला निवृत्त केलं की जगण्याची धडपड थोडी तरी शांत होईल.

पण तू मात्र मनाला रिटायर करून बघ.  मन थोडं तरी शांत होईल. राग लोभासाठी काम करत राहणं बंद होईल. श्रीकृष्णाच्या वचनाचा अनुभव घेता येईल!!

१९. कुणीतरी, कांहीतरी सांगितले, शिकवले, आपल्या मतांचा, पंथाचा प्रचार केला म्हणून माणसांच्या जीवनात अमुक घटना, दुर्घटना, बदल घडून आले असे ठामपणे सांगणे कठीण आहे. कारण एका मताला विरोध करणारे दुसरे मत त्याच वेळी हजर असते! कधी कधी तर मतांमतांच्या गलबल्यातून वेगळाच परिणाम पुढे येतो. मग तो बदल घडवून आणणारे कोण असते? तो परिणाम घडवून आणल्यायचे श्रेय किंवा जबाबदारी कुणाची?

एकोणीसशे एकुणचाळीस ते बेचाळीसच्या दरम्यान लिहिलेल्या लेखात अल्बर्ट आईनस्टाईननं हाच प्रश्न विचारला होता, आणि उत्तरादाखल उलट प्रश्न विचारला होता. 'जर ईश्वरच सगळं काही करवतो, तर माणूस जी कामं करतो त्याची जबाबदारी माणसावर कशी येऊन पडते?'

अरेच्चा? कोण म्हणते की माणूस त्याच्या कर्मांना जबाबदार असतो? तशी जबाबदारी माणूस आपणहून कधीच स्वीकारत नाही!

अल्बर्ट साहेबांनी जबाबदारी झटकण्यासाठी तर हा प्रश्न उपस्थित केला नसेल? तसाच प्रकार असावा. कारण गेल्या पंचावन्नन छपन्न वर्षात गंगेतून खूप पाणी वाहून गेलंय. त्याच बरोबर वाहून गेलीय जबाबदारीची जाणीव. अणु बॉंब निर्माण करणारा शास्त्रज्ञ विध्वंसाची जबाबदारी कां स्वीकारेल? ती जबाबदारी अणुबॉम्बचा वापर करणाऱ्यांची!! आज मानवजातीला भेडसावणारे अनेक प्रश्न निर्माण झालेत. पर्यावरणाचा असमतोल, हवा पाण्याचं प्रदूषण, पृथ्वीचं वाढणारं तापमान, अन्न भेसळ, भ्रष्टाचार, दहशतवाद, नैतिक ऱ्हास! या प्रश्नांची जबाबदारी शास्त्रज्ञ, संशोधक, उदारमतवादी, विचारवंत, शासक स्विकारणार आहेत कां? छे, ईश्वरवादी सुद्धा हेच करतात. कर्म-अकर्म, यश-अपयश, सुख-दुःख या सगळ्याचे ओझे देवाच्या खांद्याला लटकावून मोकळे होतात!!

आईनस्टाईनवादी आणि ईश्वरवादी यांच्यातला मोठा फरक लक्षात घेण्यासारखा आहे. ईश्वरवादी केलेल्या कर्माची जबाबदारी किंवा फळे कशाचाच स्वीकार करत नाहीत. उलट आईनस्टाईनवादी केलेल्या कामाची फळफळावळ (सन्मान, ॲवॉर्डस्, मानपत्रं, वगैरे) लाटण्यासाठी गळेकापू स्पर्धा करायलाही मागे पुढे पहात नाहीत. पण जबाबदारी स्वीकारायची वेळ आली की फळाच्या साली शेजाऱ्याच्या अंगणात फेकून मोकळे होतात!

तू मात्र जबाबदारी झटकून फळं लाटाण्याच्या मोहाला बळी पडू नकोस.  सजीव निर्जीव सृष्टीला हानी पोचणार नाही अशा पद्धतीने कर्म करत रहा. त्या कर्माची बरीवाईट फळे पदरात पडली तरी त्याच्या साली शेजारच्या अंगणात फेकून जबाबदारी टाळू नकोस!!

२०.  बा मना, तू स्वतःला विचार करणारा प्राणी समजतोस ना? माणसाने सगळी कामे विचारपूर्वक केली पाहिजेत असा तुझा आग्रह असतो. पण विचार न करणाऱ्या इतर प्राण्यांचे सगळे व्यवहार निसर्गानं घालून दिलेल्या नियमाप्रमाणे चालूच असतात हे तुला मान्यच असेल. मग मला सांग, माणूसच निसर्गाचे नियम झुगारुन कां वागतो?

ए, बामण्या, तुला काय विचारायचंय् त स्पष्ट विचार. उगीच गोल गोल घुमवू नकोस मला!

ठीक आहे. पुढच्या पिढ्यांसाठी धान्याची कोठारं किंवा पैशा-अडक्याच्या तिजोऱ्या भरून ठेवणारे चिमण्या कावळे बघितलेय् तू?.... पोट भरल्यानंतरही आपल्या शिकारीवर बसून राहणारा चित्ता दिसलाय कुणाला?... गम्मत किंवा टाईमपास करण्यासाठी एकमेकाला मिठीत घेऊन लोळत पडलेले वाघ-वाघीण, सिंह-सिंहीण बघितलेत कुणी? दोन लांडग्यांनी समलिंगी संभोग केल्याचं ऐकिवात ही नसेल कुणाच्या!

तुला वेड लागलयं बहुतेक! म्हणून असले प्रश्न उपस्थित करतोयस. अरे, आदिमानवापासून माणसाची बुद्धी हळूंहळूं विकसित होत गेली, मेंदू प्रगल्भ होत गेला. त्याला निसर्गाचे नियम जाचक वाटायला लागले. निसर्गांचे नियम झुगारुन माणसाने अनेक उत्तुंग शिखरे जिंकलीयत हे विसरलास तू?

तू म्हणतोयस ते बरोबर आहे. आपलं ज्ञान वाढवून एक एक शिखर माणसाने जिंकले हे खरे आहे. पण दुसरीकडे, वासना, इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यासाठी तो लोभाच्या खोल दरीत घसरत चालला आहे त्याचे काय? आणि ज्या निसर्ग नियमामुळं सजीव-निर्जीव सृष्टीत संतुलन राखले जात होते, ते नियम माणसाने आपणहून पाळायचे कां धुडकावून लावायचे? निसर्ग नियम धुडकावून लावणे म्हणजेच बुद्धिवाद का? का जाणीवपूर्वक त्या नियमांचे पालन करायचे हा बुद्धिवाद? निसर्गाचे संतुलन राखणारे नियम

पाळण्याचा सराव करायचा का त्याची टिंगल टवाळी करायची? आज हजारो बुद्धिवादी, विचारवंत हयात असून माणूस जातीची नैतिक घसरण थांबवता येईल असा एकही उपाय का शाधता येत नाही?

याचे एकच कारण दिसतय्. माणसाचे मन विचारापेक्षा विकाराकडे आणि विवेकापेक्षा अमर्याद उपभोगाकडे धाव घेतंय! आणि त्यालाच बुद्धिवाद असे मानले जात आहे. अशा बुद्धिवादाला प्रतिष्ठा पण मिळतीय! तू त्या बुद्धिवादाच्या मागे धावू नकोस. निसर्गनितीचे (Natural Morality) नियम जाणून घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न कर!!

२१. जिनिव्हा मधल्या एका प्रयोगशाळेने भौतिक अणूच्या विरोधी असा एक अणू तयार करण्यात यश मिळवलंय! या अणू विरोधी अणूचं (Anti-matter particle) वैशिष्ट्य असे की तो सामान्य अणूच्या संपर्कात आला की, सामान्य अण्चा क्षणात विलय होतो आणि त्यातून उर्जेचे प्रचंड भांडारच प्‍टते! शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे, की मानव जातीला भेडसावणारा, संपत आलेल्या उर्जा-स्त्रोताचा (Source of Energy) प्रश्न, या शोधामुळे सुटणार आहे.

बामण्या, आता तरी खात्री पटली ना माणसाची विकसित बुद्धी कोणते शिखर गाठू शकते!

अरे होऽ! पण या शोधानंतर भौतिक शास्त्रज्ञ आणि भौतिकवाद्यांच्या मनात प्रचंड खळबळ माजलीय. ते लोक तसं दाखवणार नाहीत, मान्यही करणार करणार नाहीत. पण भौतिकवादी गडबडून गेलेत हे खरं. कारण त्यांच्या मूळ सिद्धांतालाच धक्का बसलाय. पारंपारीक पदार्थ विज्ञान सांगते की 'भौतिक सृष्टीची रचना मूलभूत कणापासून झालीय. (Basic Building Blocks).' भौतिकशास्त्रज्ञ आणि भौतिकवादाचे भाट बिथरले असणे स्वाभाविक आहे. कारण 'सृष्टीच्या रचनेच्या मुळाशी हे मूलभूत भौतिक कणच असतात, त्याचा रचनाकार कुणीच नसतो, अशी त्याची श्रद्धा असते. म्हणून ईश्वर आणि त्याची शक्ती या कल्पना धादांत खोट्या आहेत' असा प्रचार करणे आता कठीणच होणार आहे. भौतिक कण

विलय पावले आणि उरली फक्त उर्जा शक्ती, आता काय करायचे? पण भारतीय परंपरेने भौतिक सृष्टीच्या मुळाशी असणाऱ्या या उर्जा शक्तीला मान्यता दिली होती. 'या देवी सर्व भूतेषु शक्तिरूपेण संस्थिता!'

आपला भौतिक पसारा गुंडाळून जप-तप करत बसवलेल्या ऋषी-मुनी-संत महात्म्यांनी या शक्तीचा अनुभव घेतल्यानंतर काय होते त्याचे वर्णन करून ठेवलंय. भौतिक शरिराचा विसर पडून उर्जेची प्रचंड लाट निर्माण झाल्याचे त्याना जाणवले! पण शास्त्रीय शोध आणि अनुभवातून मिळवलेले ज्ञान यांची तुलना करणे किंवा त्या दोन्हीतली समानता स्पष्ट करणं म्हणजे दांभिकपणा आहे असे बुद्धिवाद्यांचे मत आहे. नुसते मत नाही. आणखीही एक हेतू आहे. बुद्धिवाद्यांना वैचारिक विश्वाच्या वाटण्या करायच्या आहेत. जुने ते तुमचे, नवे ते आमचे! जिनिव्हाचा शोध हा भौतिकवाद्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न झाला आहे.

जगू दे बिचाऱ्या भौतिकवाद्यांना काही काळ! तुला 'अणू विरोधी अणूच्या शोधाचं महत्व पटले असेल तर तुझ्या भौतिक शरिरातल्या आत्मा नावाच्या 'अणू विरोधी अणूचा' विकास कर आणि स्वतःसाठी ऊर्जेचा वेगळा स्त्रोत निर्माण करून ठेव'!

२२. एकोणीसशे पंचाण्णवसाली एक दिवस गणपती महाराज दूध प्यायले! ज्याने कुणी चमचा, वाटी, भांडे पुढे आणले, त्याचा मान राखून, अग्रपूजेचा मान असलेल्या देवानी दूध पिऊन टाकले! देश, धर्म, जातपात, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, मंत्री-सेवक कुठलाच भेदभाव न करता सगळ्या भक्तांच्या हातून प्रसाद भक्षण केला. एवढंच नाही तर एका चर्मकाराच्या हत्याराजवळ दुधाचा चमचा नेल्याबरोबर चमच्यातले दूध गायब झाल्याचे दृश्य प्रत्यक्ष दूरदर्शनवर दाखवले गेले! गणपतीनं माझ्या हातून दूध घेतले यातच समाधान मानून समस्त भक्त मंडळी आपापल्या कामाला लागली.

पण संशयवादी, चिकित्साखोर, बुद्धिवाद्यांचा मात्र जळफळाट झाला. केव्हढी ही अंधश्रद्धा!! भारतासारख्या पुरोगामी देशातून ही अंधश्रद्धा हद्दपार केलीच पाहिजे या विचाराने दूध पिण्याच्या घटनेची चिरफाड सुरु झाली. कुणी म्हणालं 'पृष्ठीय तणावामुळे ती घटना घडली'. (देवाच्या पृष्ठभागावर तणाव?)

कुणी सांगितले 'केशाकर्षणाच्या नियमानुसार ती घटना घडली.' (गणपतीची सोंड केशमय असते हा धडा शंभरवेळा घोक) आणखी एकाने छातीठोकपणे सांगितलं की 'सामूहिक संमोहनाचा प्रकार असावा.' (या संमोहनवाद्याला सीमेवर पाठवले पाहिजे. सगळे उग्रवादी संमोहित होऊन शस्त्रे खाली ठेवायला तयार होतील!) अबब! एकाच घटनेची केवढी ही कारण मिमांसा!!

विज्ञानवाद्यांना, बुद्धिवाद्यांना 'एक कारण मीमांसा'(Single cause Rationality) पटत नाही. पृथ्वीवर घडणाऱ्या सगळ्या बारिकसारिक घटनांचे कारण एकच-ईश्वरी शक्ति! झाडाचे पान हलवण्यापासून ते पृथ्वीच्या पोटातली खळबळ भूकंपाच्या रूपात बाहेर पडण्यापर्यंतच्या सर्व घटनांचे कारण एकच- 'ईश्वरी इच्छा'! ही 'एक कारणमीमांसा' पटवून घेऊन कसे चालेल? बुद्धिवाद्यांच्या कारणे शोधण्याच्या धंद्याला मंदी नाही का येणार? सध्याच्या काळात मंदी येण्यासारखे महासंकट नाही.

आपण मात्र एक कारण मीमांसेचा स्वीकार करू या. बारिक सारिक घटनांच्या मागची कारणं शोधण्यात वेळ, पैसा आणि शक्ती वाया कां घालवायची? बुद्धिवाद्यांनी विणलेल्या कारणांच्या जाळ्यात ते स्वतःच अडकतात. पण श्रद्धाळू जीव मात्र सहीसलामत उडून जातात!

२३. डार्विननं मांडलेला उत्क्रांतीचा सिद्धांत, किंवा त्यानंतरच्या शास्त्रज्ञांनी त्या सिद्धांतात घातलेली भर हे सगळे खरे आहे असे गृहित धरू या. पण त्याच बरोबर लकॉम्ते द नॉय या जीव शास्त्रज्ञानं त्याच्या 'Human Destiny' (मानवाचे भवितव्य) या पुस्तकात उत्क्राती संबंधात मांडलेले विचार पण लक्षात घेऊ या.

'पूर्वीच्या अवस्थांतून माणूस प्राणी प्रगत होत असतांना पूर्वीच्या अवस्थांतल्या अवशेषात्मक खुणा तशाच राहिलेल्या दिसून येतात.' '----' फक्त शारीरिक खुणाच मागे राहतात असं नाही तर पूर्वीच्या अवस्थातील सहज प्रवृत्तीच्या स्मृतीही अशाच रेंगाळत असल्या पाहिजेत. '----' या अनुवंशात्मक चालत आलेल्या स्मृती माणसाने आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी सोडून देणे आवश्यक आहे. '---' खरे म्हणजे

आता सुद्धा उत्क्रांतीचा प्रवाह चालूच आहे. '---' मानवा पुढे दोन मार्ग खुले आहेत. एक, स्वतःच्या पाशवी वासनांना बळी पडून पर्वीच्या प्राणी-सृष्टीला जाऊन मिळायचे- म्हणजे उत्क्रांतीला विरोध करून मागे तरी जायचं किंवा वासनांवर विजय मिळवून स्वतःचा उत्कर्ष करून घ्यायचा.'

वरील काही अवतरणांवरून तुझ्या लक्षात आलेच असेल की हिंदू आणि बौद्ध धर्माचा मुख्य गाभा वासना मर्यादित करणं किंवा त्यावर विजय मिळवणे हाच आहे. या दोन्ही धर्मांनी सांगितलेले आचार-विचार माणसाला उत्क्रांतीच्या चळवळीत स्वखुषीने, बुद्धिपुरस्सर सामिल होण्याचे आवाहन करतात!! आहे हिम्मत तुझी ते आव्हान स्वीकारण्याची?

२४. लकॉम्ते द नॉय आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतो-'माणसाच्या आयुष्याला काही अर्थ आहे, त्याच्या कर्तृत्वाला उद्दीष्ट असून त्याला भौतिक विश्वापलिकडचे कांही ध्येय गाठायचे आहे ही जी धर्मांची शिकवण आहे तिचा, तुटपुंज्या विज्ञानाचे नांव घेत नाश करणाऱ्या बुद्धीने, माणसाच्या जीवनाचा अर्थच नाहीसा करून टाकला आहे. आधुनिक माणसाची अस्वस्थता ही या निरर्थकतेच्या पोल कल्पनेतूनच निर्माण झाली आहे.'

लकॉम्ते द नॉय सारखा जीव शास्त्रज्ञच विज्ञानाच्या तोकडेपणा बद्दल बोलतो तेव्हा आपण त्यावर मल्लीनाथी ती काय करायची? आपण एवढेच म्हणू शकतो की, 'नॉयच्या नावानं चांग भलं!!'

२५. तुटपुंज्या विज्ञानाचे नाव घेत आणि तर्कशुद्धतेचा आव आणत काही बुद्धिवादी गेल्या काही वर्षात देवाला रिटायर करायला निघालेत. त्यांचे इतर क्षेत्रातले काम आदरणीय असेल. पण त्या आदरापोटी तू त्यांच्या विचारसरणीत वाहवत जाऊ नयेस म्हणून, आणि देवाबद्दलच्या त्यांच्या तोंडाळपणाला वेसण बसावी म्हणून त्यांच्याच काही विधानातला भोंगळपणा स्पष्ट करणं भाग आहे.

✽ नामस्मरण करावे. त्या मागे मनाला शांती मिळावी हा हेतू असतो.

हे लोक देवाचे नामस्मरण करावे असे स्पष्ट सांगत कां नाहीत? कारण देवाला-ईश्वराला-रिटायर करा असा संदेश त्यांनी आधीच दिलाय. मग कुणाचे नामस्मरण करायचे? अन्य कुणाच्या (स्वतःचं नाव सोडून) नामस्मरणाने मनःशांती मिळेल काय? देवाच्या नावाशी त्याचे रूप आणि गुण जोडलेले असतात. एकाद्या पुरुषानं 'माधुरी' किंवा स्त्रीनं 'अमिताभ' या नामाचे अखंड स्मरण केले तर त्यांना मनःशांती मिळेल का?

✻ परमेश्वर नावाच्या शक्तीचा कसलाही पुरावा गेल्या पांच हजार वर्षांत माणसाला देता आला नाही.

देवाच्या नामस्मरणाने मनाला शांती मिळते हा परमेश्वरी शक्तीचा पुरेसा पुरावा नाही कां?

✻ मला साक्षात्कार झाला नाही याचा अर्थ मी पापी माणूस आहे.

नाही! त्याचा अर्थ साक्षात्कार व्हावा एवढो क्षमता तुम्ही अजून कमावलेली नाही. तो प्रयत्नही तुम्ही केलेला नाही. तेरा कोटी रामनामाचा जप करण्याचा प्रयोग एखाद्याने हाती घ्यावा. त्याला रामाला साक्षात्कार होईल. पण मग विज्ञान, साहित्य, नाट्य इत्यादी क्षेत्रातली पारितोषिके मिळणार नाहीत! इथं पाप पुण्यापेक्षा काळ-काम-वेगाचा सिद्धांत लागू पडतो! साक्षात्कार करून घ्यायचा कां पारितोषिके मिळवायची That is your choice!! रामाचा साक्षात्कार होण्यासाठी रोज बाराबारा तास बारा वर्षे रामनामाचा जप करत बसण्याची आहे तयारी ?

✻ धर्म ग्रंथांमध्ये सगळ्या प्रश्नांची उत्तरं आहेत असं सांगितलं जातं. असा उद्धटपणा विज्ञानाकडं नाही.

हिंदूचे धर्म ग्रंथ म्हणजे चार वेद आणि त्यांचा अर्थ सांगणारी उपनिषदे आणि गीता, ज्ञानेश्वरीसारखी पुस्तके. त्या काळांत आधुनिक विज्ञानाचा मागमूसही नव्हता. इतर धर्मही अस्तित्वात नव्हते. मग उद्धटपणा कुणाशी करायचा? दुसरी गोष्ट अशी की विज्ञानाने सांगितलेलं ज्ञान त्याच शब्दात वेदांमधे कसे सापडेल? त्याच प्रमाणे वेदान्तातले सिद्धांत विज्ञानाच्या पुस्तकात त्याच शब्दांत स्पष्ट केलेले नसणारच! विज्ञानाच्या

उदयानंतर ‘आमचे खरे की तुमचे खरे’ हा वाद निर्माण झाला. म्हणजे हा प्रश्न उद्धटपणाचा नसून ज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या ‘अहंकाराचा’ आहे! मी म्हणतो तेच खरं या हट्टीपणाचा आहे!! असल्या हट्टीपणात वेदांन्ती आणि वैज्ञानिक एकाच पातळीवर उभे असतात!

बा मना, या हट्टीपणाशी आपल्याला काही देणं घेणं नाही. ज्या ज्ञानामुळे आपले पाऊल पुढे पडेल त्याचा स्वीकार करू या आणि पुढे जात राहू या!

✼ तुमचं म्हणणे जर आहे की परमेश्वर नावाची गोष्ट आहे तर ती सिद्ध करण्याची जबाबदारी तुमची नाही कां?

हे बुद्धीवादी दुसऱ्याला कचाट्यात, खोट्या वादात अडकविण्यात फार पटाईत असतात. हा प्रश्न त्याच प्रयत्नाचा भाग आहे. सगळ्या धर्मशास्त्रांनी परमेश्वर किंवा त्याचा प्रेषित या संकल्पना शेकडो-हजारो वर्षांपासून मान्य केल्या आहेत. त्या संकल्पना मानणारे करोडो-अरबों लोक पृथ्वीच्या पाठीवर आज एकविसाव्या शतकातही वावरत आहेत. आधुनिक माणसाच्या आधीपासून चालत आलेल्या आणि लोकमान्यता मिळालेल्या संकल्पना रूढी, आचार-विचार सिद्ध करण्याची गरज नसते. आणखी एक मुद्‌दा. कोर्ट कचेरीच्या भाषेत सांगायचं तर One who asserts a claim, has to prove it ! निरीश्वरवाद आणि त्यांचा पंथ वाढावा अशी इच्छा असेल तर परमेश्वर नाही, त्याला रिटायर करा असे म्हणणाऱ्यांनीच ते विधान सिद्ध करायला पाहिजे!! भौतिक विज्ञानातला एकादा सिद्धांत पुढे करून आध्यात्मिक संकल्पना खोटी ठरवता येणार नाही.

वर सांगितलेले प्रश्न, मुद्‌दे, मते खोडसाळ आहेतच पण आजच्या, भोळ्याभाबड्या तथाकथित सुशिक्षितांना आपल्याकडे खेचून घेण्याचे हे सटरफटर प्रयत्न आहेत. तू त्या जाळ्यात अडकू नकोस!

✼ एकाद्याला साक्षात्कार झाला. (असं मान्य करू.) साक्षात्कारी माणूस इतरांना तो साक्षात्कार घडवू शकला कां? मी तसा साक्षात्कार हिप्नॉटिझम पद्धतीनं घडवू शकतो.

बापरेऽ! केवढा हा आत्मविश्वास!! पण खरी गोष्ट अशी आहे की शास्त्रीय प्रयोग पद्धती, प्रक्रिया आणि परिणाम यांच्या नियमावर साक्षात्काराची पद्धत, प्रक्रिया आणि परिणाम धुडकावून लावण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे हा!!

असं म्हणतात की, साक्षात्कारी स्त्री-पुरुषांना इतर कुठल्याही माध्यमाशिवाय परमेश्वराचे दर्शन मिळते! त्यासाठी जप, तप, ध्यान, धारणा वगैरे सारखे प्रयोग आयुष्यभर करावे लागतात. त्यानंतर साक्षात्कारी माणसाचे आयुष्य आतून बाहेरुन पार बदलून जाते! ते बदल कायम स्वरूपाचे असतात. या उलट हिप्नॉटिझम मधे हिप्नॉटिस्ट हे माध्यम असते. तो काय करतोय् त्याची जाणीव ज्याच्यावर प्रयोग केला जातो त्याला अजिबात नसते. परिणामाविषयी तर बोलायलाच नको! संमोहन अवस्थेतून बाहेर आल्यावर ती व्यक्ति वास्तवात खुरडायला लागते. साक्षात्कारी व्यक्ति आणि पोटभरू जादूगार यांची तूलना करून हे बुद्धिवादी काय सिद्ध करू पाहतायत ते त्यांचे त्यांनाच ठाऊक!!

क्षणभर संमोहन अवस्थेत जाऊन क्षणभरच तथाकथित साक्षात्कार करून घेण्याच्या फदात तू पडूं नकोस. ती शुद्ध फसवणुक आहे. वैज्ञानिक अंधःश्रद्धाच म्हणावी लागेल त्याला. ईश्वर न मानणाऱ्या बुद्धिवाद्यांनी कितीही कोलांट्या उड्या मारल्या तरी परमेश्वर रिटायर होणार नाही. सामान्य माणसाची चार घटका करमणूक होईल फार तर!!

२६. मानवी जीवनातल्या दुःखाचं मूळ कारण वासना हेच आहे. महात्मा गौतम बुद्धाने निर्माण केलेल्या तत्वज्ञानाचे साररूप सूत्र हेच आहे. बरनॉल्ड शॉनं मानवी जीवनातल्या दोन शोकांतिकांचे वर्णन केले आहे. पहिली शोकांतिका म्हणजे तुमच्या मनातल्या इच्छा, आकांक्षा पूर्ण न होणे आणि दुसरी शांकांतिका म्हणजे सगळ्या इच्छा पूर्ण हाणे!!

बा मना, तुला अर्धवट जळलेली मनुस्मृतीची पोथी सापडली होती ना? त्यातल्या दुसऱ्या अध्यायातल्या तेराव्या श्लोकाची एकच ओळ शिल्लक होती. 'अर्थ, कामेषु असक्ताना धर्म ज्ञानं विधीयते'.

म्हणजे 'पैसा आणि वासना यात गुरफटलेल्या लोकांसाठीच धर्मज्ञान सांगितलेलं आहे'. त्याच प्रमाणं पंचदशी या ग्रंथातल्या, तृप्तिदीप प्रकरणातल्या १४७ व्या श्लोकात म्हटले आहे की 'वासनेतून निर्माण झालेली कामे केल्यामुळे (म्हणजे उपभोग घेतल्यामुळे) वासना आणखीनच भडकतात.!!'

या चारही उदाहरणांवरून एकच गोष्ट स्पष्ट होते. चंगळवाद चंगळवादालाच जन्म देतो. म्हणून वासनांचा घोडा काबूत ठेवण्यासाठी परमेश्वराचे नामस्मरण करा असे सगळेच संत सांगत आले आहेत!! तो उपदेश पटला असेल तर निष्ठेने नामस्मरण करत रहा!

उपभोगासाठी एका व्यक्ती समोर एकादी वस्तू किंवा दुसरी व्यक्ती असावी लागते. उपभोगाची साधने गोळा करण्यासाठो पैसा कमावण्याचा त्रास सोसावा लागतो. शिवाय पैसा खर्च करून अपेक्षित समाधान मिळेलच अशी खात्रीही नसते. म्हणूनच एका संस्कृत पंडिताने उपभोगाची साधने खरेदी करून देणाऱ्या पैशाचा धिःकार केला आहे.

अर्थानां अर्जने क्लेश,, तथैव परिपालने ।
नाशे दुःखं, व्यये दुःखं, धिव् अर्थान् क्लेश कारिणः ।।

म्हणजे 'पैसा कमवायला फार कष्ट पडतात. त्याच प्रमाणं पैसा राखून ठेवण्यासाठी सुद्धा तितकाच त्रास, यातना सहन कराव्या लागतात. त्रास आणि यातना देणाऱ्या पैशाचा धिःकार असो!!'

एकेकाळी धिःकारला गेलेला पैसा आज देव होऊन बसलाय! श्रीमंत-गरीब, राज-रंक, सगळे या नव्या देवाची पूजा करत सुटलेत. पण कुणाच्याही मागचा यातनांचा ससेमिरा चुकलेला नाही.

म्हणूनच गोंदवलेकर महाराजांनी एका प्रवचनात सांगितलय की, 'पैशानं सोय होते. पण खरे सुख-समाधान मिळत नाही।' यातून तू बोध घे. प्रामाणिकपणे कमावता येईल तेवढाच पैसा कमाव. उरलेला वेळ नामस्मरणात खर्च कर. त्यातूनच तुला खरे सुख-समाधान मिळेल. निदान पैशापासून होणाऱ्या यातनातून तरी तुझी सुटका होईल!

२८.   ए बामण्या, अरे मित्र-मैत्रिणी, आप्तेष्ट-नातेवाईक, यांच्याकडे जाणे येणे ठेव. घरी बसून काय करतोयस? अशाने तुझा काबडा होऊन जाईल!

तू म्हणतोयस ते थोडं फार खर आहे. पण काय करू रे! हल्ली कुणाकडं गेलं की 'मी यव् केलं, अन त्यव् केलं. दुसऱ्यानं मात्र काहीच केलं नाही.' अशाच गप्पा ऐकायला मिळतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर 'मी बरोबर, तू चूक' असचं या गप्पांचं स्वरुप असतं! मग गप्पांचे विषय काहीही असोत. म्हणजे घरगुती गोष्टीपासून ते राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, धर्म-नीति! विषय वेगळे पण भूमिका तीच! जाहीर पंचनामा करून दुसऱ्याला मोडीत काढणे!! शेवटी 'मी-मी, तू-तू' चा कडवटपणा, गुटक्यासारखा जिभेवर चघळत घरी परतावे लागते. तुझा तोच अनुभव आहे ना? मग मला मित्र, नातेवाईक, यांच्याकडे जाण्याचा सल्ला कशाला देतोस? त्यापेक्षा तू माझा सल्ला ऐक. जिथून आनंद किंवा चांगला विचार मिळण्याची खात्री वाटेल अशाच ठिकाणी जा. नाहीतर जाऊ नकोस. तुझ्यावर शिष्ठ, गर्विष्ठ, माणूसघाणा असे आरोप होतील. पण घाबरू नकोस. स्वतः बरोबर दुसऱ्यालाही फालतू गप्पा गोष्टीत गुंतवून ठेवायचं आणि टाईमपास करायचा हा माणसाच्या मनाचा दोष फार जुना आहे! आणि 'बा-मनाच्या' जातीत शिरायचं असेल तर टीकेला घाबरून कसे चालेल?

२९.   बामण्या, प्रेम केलं आहेस कुणावर? भावा-बहिणीवर? बायको-मुलावर? कुत्र्या-मांजरावर? झाडाझुडपांवर? फुलं-फुलपाखरांवर? स्वतःवर तरी? किमान पक्षी सगळं जग सध्या ज्याच्यावर प्रेम करतंय् त्या पैशावर तरी प्रेम केलंस कां?

नाही!!

बामण्या, काय म्हणायचं तुझ्या स्वभावाला?

काय म्हणायचं ते म्हण! पण इतर सजीव-निर्जीव सृष्टीशी तुमचा काय सबंध आहे त्याचा शोध संपल्यावरच कुणाशी तरी, कशाशीतरी मन जुळवता येतं. मन हे ईश्वराचं रूप आहे. आणि त्याची कृपा

झाल्याशिवाय प्रेम करताच येत नाही. आजची तरूण पिढी ज्या भावनेला 'प्रेम प्रेम' म्हणून डोक्यावर घेऊन नाचत आहे ते प्रेम नसून वासनेचेच एक रूप आहे. म्हणूनच प्रेमाला 'रिस्पॉन्स' मिळाला नाही की प्रेमिकात भांडणं सुरु होतात. कुत्री मांजर सुद्धा मालकाचे चावे घेतात, पैसाही धोका देतो, किंवा प्रियकर प्रेयसीचा खून करायला मागे पुढे पहात नाही! असं जीव घेणं प्रेम काय कामाचं? 'प्रेम कुणावरही करावे' असला कविमनाचा पाल्हाळिकपणा आपल्या काय कामाचा ?

३०. बा मना, तू कधी आयुष्याचा ताळेबंद तयार केलायस?

बामण्या, वयाची बासष्ट वर्ष उलटली. आता या वयात ताळेबंद कसला तयार करतोयस? मस्तीत जगलोय. ताळेबंद तयार करून बुजलेल्या जखमा पुन्हा चिघळवायच्या नाहीत मला!

एकीकडे 'मस्तीत जगलो' म्हणतोयस. दुसरीकडे बुजलेल्या जखमावरच्या खपल्या काढायलाही घाबरतोयस्? पण मी तुला सांगतो, तुझ्या ताळेबंदात 'माणूस जातीत जन्माला आलास आणि उतार वयात सद्‌गुरुंच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला' या दोनच गोष्टी जमेच्या बाजूला आहेत, बाकी सगळा खर्चच खर्च! बुद्धी, शक्ति, युक्ति, पैसा सगळं मिळवलंस आणि खर्ची टाकलंस! माणसं जोडलीस पण कालांतरानं त्यांना विसरून गेलास!! काही काळ सरळ रस्त्यावर धावलास. पण आता एका वर्तुळातच फिरत राहिलायस.

बा मना, नव्याण्णव टक्के लोकांचा आयुष्याचा ताळेबंद असाच असतो. फक्त एक टक्का लोकांच्या बाबतीत जमेच्या बाजूला माणूसकीची जाणीव आणि सद्‌गुरुंचे आशिर्वाद असतात. तू त्या एक टक्यात आहेस यातच समाधान मान आणि सद्‌गुरुंनी दाखवलेल्या मार्गावर चालत रहा!!

३१. माणसाचा पूर्वज माकड होता असे काही उत्क्रांतीवादी सांगतात. म्हणूनच माकडाचे काही गुणदोष माणसात उतरले असावेत. उदा.अधाशीपणा, आपल्या कपाळावर सत्ता गाजवण्याची हाव, अनेक माद्यांशी संबंध, नर पिल्लांना मारुन टाकून स्पर्धा कमी करण्याचा धूर्तपणा, निसर्गाचा विध्वंस करून पोट भरण्यासाठी

चढाओढ, त्यासाठी आपापसात मारामाऱ्या, एकादा नर किंवा एकादी मादी वरचढ सिद्ध झाली की पळ काढणे वगैरे.

उत्क्रांतीवादी असंही सांगतात, की माणसाने पाशवी गुणदोषातून प्रयत्नपूर्वक सुटका करून घेतली तरच उत्क्रांतीचा पुढला टप्पा गाठता येईल. याच हेतूने भारतीय योगशास्त्राने पांच यम (अहिंसा, सत्य, चोरी न करणं, ब्रह्मचर्य, आणि अपरिग्रह-म्हणजे वस्तू साठवून न ठेवणे) आणि पाच नियम (शरीरशुद्धी, समाधान, तप, अभ्यास आणि परमेश्वराचे चिंतन) सांगून ठेवले आहेत. हे यम-नियम माणसाला कठीण वाटतील असा विचार करून आपल्या संतांनी तर अखंड नामस्मरणाचा साधा सोपा उपाय सांगून मानवी मनाच्या उत्क्रांतीचा मार्ग सोपा करून ठेवला आहे.

पण आपल्याकडच्या इंग्रजाळलेल्या सुशिक्षितांनी, सुधारकांनी आणि तथाकथित पुरोगाम्यांनी या यम-नियमांची खूप टवाळी केली आणि अनेक लोकांना उत्क्रांतीच्या चळवळीतून बाहेर खेचले! मन जास्त विकसित करण्याची धडपड एकीकडे तर दुसरीकडे नैसर्गिक प्रवृत्तीचा मनसोक्त वापर करण्याचं आमिष! माणूस त्याच आमिषाकडे झुकून पुन्हा पशू बनण्याच्या मार्गावर आहे! आणि या नर पशूंनी मानव जातीलाच नाही तर संपूर्ण निसर्गालाच दाढेखाली धरलय्.

नैसर्गिक प्रवृत्तीवर विजय मिळवल्याशिवाय बाह्य निसर्गावर मिळवलेला विजय काही कामाचा नाही. चंद्रावर जाऊन परत आलास तरी नंतर नरपशू म्हणूनच पृथ्वीवर हिंडत रहावं लागेल!!

३२. बामण्या, निसर्गात सतत बदल होतात हे तू इतकी वर्ष बघतोयस ना? मग माणसांनी बदलायला नको कां? सनातन्यासारखा परिवर्तनाला विरोध कां करतायस?

शास्त्रज्ञ, विचारवंत हेच मत मांडतात. पण परिवर्तन कशासाठी याचाही कुणीतरी विचार करायला नको कां? आणि परिवर्तनानंतर कोणती व्यवस्था अपेक्षित आहे. त्याचा आराखडा डोळ्यासमोर नको कां? माणसाने, समाजाने, शासनने सतत बदल घडवून आणले पाहिजेत असा मूठभर लोकांनी आग्रह धरला.

कालांतराने त्या आग्रहाचे हट्टात रूपांतर झाले. बंदुकीच्या नळीतून परिवर्तन घडवून आणण्याचा काही लोकांनी प्रयत्न केला. आता परिवर्तनाचा हट्ट हास्यास्पद पातळीला पोहाचला आहे. कारण अपेक्षित परिवर्तनाऐवजी वेगळंच परिवर्तन दिसू लागलं आहे.

लाखो, करोडो वर्षांपासून पृथ्वीवर आणि सजीव सृष्टीमधे बदल होत आले आहेत. पण त्या बदलामागं निसर्ग न्यायाचं (Natural Justice) सूत्र होतं. 'माझ्या बुद्धीच्या जोरावर मी निसर्गावर विजय मिळवलाय. तेव्हा आता मी ठरवीन तो न्याय' या अहंकारापोटी माणसाने सजीव-निर्जीव सृष्टीवर बलात्कार करायला सुरुवात केली. अशा बलात्कारातून सूड भावनाच जन्माला येते. परिवर्तनाचे चक्र, स्वतःच्या मर्जीप्रमाणे फिरवायला निघालेली मानवजात त्या सूडाच्या चक्रात भरडून निघत आहे.

म्हणूनच काळ, निसर्गशक्ती आणि मानवाची विवेक बुद्धी यांच्या समन्वयाने जे बदल घडून येण्याची शक्यता आहे, अशा बदलांचाच स्वीकार कर! परिवर्तनासाठी परिवर्तन स्वीकार नको किंवा चळवळ यशस्वी झाली नाही म्हणून सूडभावनेने काहीही करू नकोस!

३३. एका विचारवंताने सिद्धांत मांडला की, भौतिक सृष्टीतला कण अन् कण एकमेकांशी सतत संघर्ष करत असतो. त्या संघर्षातूनच पुढल्या विकासाचा मार्ग मोकळा होतो. पण हा सिद्धांत संघर्षापुरताच खरा आहे.

पाणी कसे तयार झाले माहिती आहे ना तुला? वातावरणात अनेक वायू संचार करीत असतात. ते वायूंचे कण एकमेकांशी संघर्ष करत असतीलही! पण हैड्रोजनचे दोन अणू आणि ऑक्सिजनचा एक अणू एकत्र येतो तेव्हाच पाण्याचा जीवनदायी अणू तयार होतो.

व्यक्ती, कुटुंब, समाज आणि त्यांचा राजकीय, आर्थिक विकास यांनाच हाच नियम लागू आहे. एकमेकाला सामावून घेतील, सहकार्य करतील असे घटक जवळ आणण्यापुरताच संघर्ष करायचा आणि नंतर एकमेकात मिसळून जायला तयार असणाऱ्या घटकांच्या सहकार्याने विकास साधायचा! बा मना, मानवी

जीवनाचा खरा विकास संघर्षापेक्षा सहकार्य आणि समन्वय या दोन गोष्टीमुळेच घडून येतो हा विचार मनावर ठसवून घे!

३४. औद्योगिक क्रांतीनंतर, यंत्राने निर्माण केलेल्या वस्तूंना सतत मागणी तयार करण्यासाठीच बुद्धिवाद्यांनी ग्राहकांना देव, धर्म, न्याय, नीती, कुटुंब या कल्पनातून बाहेर खेचले असे नाही वाटत तुला?

ए बामण्या, मी ऐकून घेतोय म्हणून तू आता वाटेल ते बरळायला लागलास हं! औद्योगिक क्रांतीचा आणि देव, धर्म, न्याय, नीती आणि कुटुंब व्यवस्थेचा संबंध काय?

हेच! अगदी हीच गोष्ट माणसांना समजावून सांगण्याची उद्योगपतींनी प्रचंड धडपड केली. अरे असं बघ, की कारखान्यात तयार झालेल्या वस्तू विकल्याच गेल्या नाहीत तर उद्योगप्रधान अर्थव्यवस्थाच कोसळून पडते. म्हणून उद्योगपतींनी शास्त्रज्ञ, बुद्धिवादी, सुधारणावादी लोकांना नोकरीवर ठेवून घेतल आणि त्यांच्याकडून गुळगुळीत आकर्षक घोषणा तयार करून घेतल्या, ज्यामुळे ग्राहक ईश्वर, धर्म, न्याय, नीती, कुटुंब या कल्पना सोडून देऊन भोगवादाचा संपूर्ण पुतळा बनू शकेल!

'धर्म ही अफ्‌ची गोळी आहे.' ही घोषणा होताच माणसांनी पैसा आणि दारुच्या नशेत राहायला सुरवात केली. दारूची आणि इतर खाद्यपेयांची मागणी दहा टक्यानं वाढली! बुद्धिवाद्यांनी आणखी एक घोषणा केली. 'धर्मच खोटा तर धर्मानं ठरवून दिलेली नीती तत्वंही खोटीच ठरतात! ईश्वर, धर्म, नीती ही बुजगावणी झुगारून द्या!' लोकांनी ऐकलं बुजगावणी जाळून टाकली. सुख-साधनांची मागणी चाळीस टक्यांने वाढली. याच काळात सुख साधने गोळा करण्यासाठी गळेकापू स्पर्धा सुरू झाली!

धर्म, ईश्वर, नितीला बुडवणे पुरेसे नाही असे वाटल्यावरून विचारवंतांनी आणि उद्योगपतींनी मोहरा सामाजिक संस्थांकडे वळवला. व्यक्ति स्वातंत्र्याची घोषणा देऊन दहा माणसांच्या एकत्र कुटुंबाचे बारा वाजवले. एका छपराखाली राहणाऱ्या कुटुंबाची बारा घरे झाली. घरे वेगळी झाली की सुखसोई पण वेगळ्या पाहिजेत! घरगुती वस्तूंची मागणी बारापट वाढली! केवढी ही औद्योगिक प्रगती!

ती प्रगतीही अपुरी वाटली म्हणून सिग्मंड फ्राईड कडून एक सिद्धांत वदवून घेतला. 'दाबून टाकलेल्या इच्छा, वासनाच मानसिक विकृती निर्माण करतात!' झालंऽ! इच्छा वासनेला आवर घालणे माणसाने सोडून दिले आणि भोगवादाचा परमोच्च बिंदू गाठला. 'तेल लावू, तूप लावू, धुवून काढू' या भांडवलदारी न्यायाखाली सामान्य ग्राहक मात्र नागवला गेला, धुतला गेला!

भांडवलदारांनी आणि बुद्धिवाद्यांनी रचलेला हा जागतिक कट उधळून लावयचा असेल तर परमेश्वराला शरण जा आणि मनात इच्छा, वासना आकांक्षा निर्माणच होऊ देवू नकोस अशी प्रार्थना कर!

३५. बामण्या, तू फक्त हुशार नाहीस तर खडूस पण आहेस! अरे बाबा, वासनेला अक्षता वाहून आवाहन करावे लागत नाही. 'आगच्छ वासना देवी'! सगळे जगच वासनेतून निर्माण झालंय तर माणसात वासना असणारच!

तू म्हणतोयस ते खरे आहे. काम करणाऱ्या अवयवांना सकारात्मक किंवा नकारात्मक काम करण्याच्या सूचना वासनाच देते हे मान्य! त्या नैसर्गिकरित्या काम करत असतात. पण वासनांना काबूत ठेवणारा विवेकही निसर्गानेच निर्माण केलेला असतो हे तू मान्य करतोयस कां? वासनेला आवर घालणाऱ्या विवेकाला आवाहन करणे ही उत्क्रांतीच्या पुढल्या टप्प्याची पहिली पायरी आहे असे समज आणि एक पाऊल तरी ठेव त्या पायरीवर!!

३६. काय करतोयस?

एऽ बामण्या, भलत्यावेळी येऊन माझ्या कामात खोऽ घालण्याची तुझी सवय सोडावीस असं तुला एकदाही वाटलं नाही? लंब्याचौड्या गप्पा मारत बसतोस्, प्रश्न विचारत बसतोस! आणि आल्याआल्या ठराविक प्रश्न असतो तुझा 'काय करतोयस्?' तुला दिसलं नाही, मी पडल्या पडल्या टीव्ही बघत होतो ते?

टीव्ही बघतोयस का रिमोट हातात घेऊन सारखे चॅनल्स बदलतोयस? बघ! खुशाल टी.व्ही.बघ. पण रिचर्ड होगार्ट नावाच्या ब्रिटीश लेखकानं या प्रसार माध्यमाबद्दल (Electronic Media) काय लिहून

ठेवलंय ते माहीत आहे कां? तो म्हणतो- 'जनसामान्यांची करमणूक करणारी माध्यमं (टीव्हीचे कार्यक्रम) जीवन विरोधी असतात. कारण त्यात 'झगमगाट, चुकीची आवाहने आणि नैतिक टाळाटाळ यांची रेलचेल असते. (उपभोगाच्या) वस्तू गोळा करणे म्हणजेच प्रगती, अमर्याद सुखाची इच्छा बाळगणे म्हणजेच स्वातंत्र्य, आणि एकाच पातळीवरची नैतिकता म्हणजेच समानता अशा समिकरणांचा (अप्रत्यक्ष) प्रचार केला जातो' (संपादकीय, टाईम्स ऑफ इंडिया, २३-६-९३).

आपल्याकडल्या सरकारी आणि खाजगी वाहिन्यांवरच्या अर्ध्या तासाच्या करमणुकीच्या कार्यक्रमातील १२/१५ मिनिट वेगवेगळ्या वस्तूंच्या जाहिराती करण्यातच खर्ची पडतात. अगदी अलिकडे तर बातमी पत्रांनाही, साबण, टूथपेस्ट, पेट्रोल यांचे वास येऊ लागलेत. ते बघितले की रिचर्डसाहेब म्हणतो ते शंभर टक्के पटायला लागते. म्हणून म्हणतो, प्रगती, स्वातंत्र्य आणि समानता या बद्दलच्या चुकीच्या कल्पना रुजवणाऱ्या जाहिराती सुरु झाल्या की टीव्ही बंद करत जा. नाहीतरी मधूनमधून डोकावणाऱ्या जाहिराती, चालू कार्यक्रमाचा रसभंग करतातच!! स्वतःच टीव्ही बंद केला की रसभंगाचे दुःख थोडे तरी कमी होईल की नाही?

३७. बामण्याऽ, तू बोलतांना मधून मधून भारतीय परंपरेची, ऋषि-मुनींनी लिहिलेल्या ग्रंथांची, संतवचनांची त्याचप्रमाणे इतर देशांतल्या शास्त्रज्ञांच्या संशोधनाची आणि विचारवंताची उदाहरणे देतोयस. पण तुझे स्वतःचे मत काय? याबाबतीत तुझं कॉन्ट्रीब्यूशन काय?

अरे, आपण सामान्य माणसं! म्हणजे तू आणि मी एकच माणूस आहोत. पण आपण ज्या गोष्टी बघतो, ऐकतो, जी पुस्तके वाचतो त्यामुळे मनात गोंधळ निर्माण होतो हे तरी खरं ना? तो गोंधळ दूर होईल असा प्रयत्न करायला नको का? डॉ.काप्रानी 'ताओ ऑफ फिजिक्स' या पुस्तकात एक छान विचार मांडलाय. 'माणसाच्या वैचारिक विश्वाच्या इतिहासात महत्वाचे बदल त्या टप्प्यावर होत गेले ज्या टप्प्यावर दोन विचारधारा एकमेकीला खऱ्या अर्थानं भेटल्या. पण त्या विचारधारात सचोटीने देवाण-घेवाण झाली

तरच त्यातून काहीतरी चांगले निर्माण होऊ शकते.' 'आमचे विचार तेच खरे, तुमचे विचार धादांत खोटे' अशी भूमिका घेऊन समोरासमोर उभ्या ठाकलेल्या दोन विचारधारात देवाण-घेवाण शक्य होईल कां? डॉ. काप्रांनी आणखी एका ठिकाणी लिहिलयं की 'पश्चिमेकडल्या आणि पूर्वेकडल्या देशांनी स्वीकारलेल्या विश्वाच्या स्वरूपाचे मूळ घटक यात विलक्षण साम्य आहे.' डॉक्टरसाहेब पुढं म्हणतात, 'जडपदार्थ, स्थळ, काळ, कार्यकारणभाव या कल्पनांमध आश्चर्यकारक बदल झालेला आहे.... त्यामुळे पदार्थ वैज्ञानिकांना धक्का बसला असल्यास नवल नाही. या बदलातून एक नवीन आणि अगदी भिन्न असे जगाचे दृश्य उभे राहते.'

मी प्रामाणिकपणे सांगतोय तरी कि मी इकडून तिकडून विचार गोळा केलेत आणि त्या विचारांचे मनातल्या मनांत मंथन चालू आहे. या विचार मंथनातून आपल्या मनाची 'इकडं का तिकडं' ही अवस्था साधली गेली तरच दोन विचारधारा खऱ्या अर्थानं एकत्र आल्या असे म्हणता येईल. आपण त्याच ध्येयाकडे वाटचाल करूया! माझा प्रामाणिकपणा आणि कांही बाबतीत केलेली मल्लिनाथी हेच माझे कॉन्ट्रीब्युशन आहे असे समज!

३८. बामण्या, तू म्हणतोय ते काही काही बाबतीत खरं वाटायला लागलंय्! तू एकदा पतंजलींच्या योग शास्त्राचे उदाहरण दिले होतंस्! म्हणून मी श्री.कृ.के. कोल्हटकरांनी लिहीलेले 'भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातंजल-योगदर्शन' हे पुस्तक लायब्ररीतून घेऊन आलो. त्याची 'भूमिका' वाचूनच फ्लॅट झालो. पहिल्या अध्यायातले दुसरे सूत्र तर फॅन्टॅस्टिक! 'योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध'. आपल्याकडे सुशिक्षित, बुद्धिवादी, असली शास्त्रीय पुस्तके वाचतच नाहीत कां? कां जाणूनबुजून तिकडे कानाडोळा करतात? साहजिक आहे! इंद्रियावर चढवण्याचे स्वस्त आणि मस्त निरोध बाजारात मिळत असताना चित्तवृत्तींचा निरोध करण्याचा खटाटोप कशाला करायचा? 'सुख भोगा भरपूर' पोरांचे लटांबर ठेवा दूर!'

बा मना, तू तर माझ्यापेक्षाहि तिरकस बोलायला लागलास. शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, बुद्धिवादी एकमेकाला परस्पर उत्तरे देतायत. त्यांच्या आणि आपल्या विचारात, जीवन पद्धतीत फरक असला तरी काही बाबतीत समानता आहे. त्या समान गोष्टींचा एकत्रित विचार करून आपण आपले जीवन समृद्ध करावे हे जास्त चांगले नाही कां?

३९. गृहस्थाला जेव्हा आपल्या शरिरावर सुरकुत्या पडलेल्या दिसायला लागतोल, किंवा पिकलेले केस दिसतील, किंवा नातवाचे तोंड बघायला मिळेल त्यावेळी त्या गृहस्थाने जंगलाचा आश्रय करावा असं मनू सांगतो. (मनुस्मृति, अध्याय ६, श्लोक २)

याचाच अर्थ असा की वानप्रस्थाश्रमात जाण्याचे ठराविक वय मनुस्मृतीत सांगितलेलं नाही. श्लोक २ मधे सांगितलेल्या तीन लक्षणांपैकी एक लक्षण दिसले तरी माणसानं जगण्याच्या सगळ्या प्रयत्नातून आपली सोडवणूक करून घ्यायला पाहिजे.

या सामाजिक चिंतनाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम समाजाच्या आणि कुटुंबाच्या स्वस्थ जीवनावर दिसत होते यात शंकाच नाही. समाजातला एक हिस्सा बाहेर काढला जात होता. त्यामुळे अनेक क्षेत्रातली स्पर्धा आणि कौटुंबिक संघर्षाला वावच राहात नव्हता. सामाजिक मान सन्मान आणि तो मिळवून देणारी पदे यासाठीची चढाओढही तेवढ्या प्रमाणात कमी होत होती. आज निवृत्ती याचा अर्थ फक्त नोकरीतून बाहेर पडणे एवढांच राहिलाय. बाकीच्या गोष्टीसाठो स्पर्धा चालूच आहे. जीवनाच्या सर्व अंगातून निवृत्त होण्याचे धाडस आज कुणीच करणार नाही. निवृत्त होऊन जंगलात जाऊन राहण्यासारखी जंगलही आता उरलेली नाहीत. म्हणून तू घरातल्या घरातच वानप्रस्थाश्रम स्वीकार. सगळ्या वासना, इच्छा, अधिकार, किंवा तरूणपिढीशी संघर्ष होईल अस सगळे मुद्दे सोडून देऊन आत्मचिंतनात रहाण्याची सवय कर.

४०. ए बाम....... नको! आजपासून मी 'बामण्या' म्हणून तुझी हेटाळणी करणार नाही. पण मग काय म्हणू तुला?

काहीही म्हण. एऽ बामण्या म्हण, नुसतं बामण्या म्हण, बा मना म्हण! मन्या म्हणून हाक मारली तरी चालेल.

हंऽऽ, मन्या हे नाव चांगलं आहे! त्यात जवळीक आणि आपुलकी आहे. तर मन्या, अल्विन टॉफलर या लेखकानं त्याच्या 'The third wave' या पुस्तकात मानवी जीवनात उलथापालथ करणाऱ्या तीन लाटांचं वर्णन केलंय. मला सांग, मानवी जीवन अशा लाटावर कितीदा आणि किती वर्ष हेलकावे खात राहणार आहे?

अरे, विश्वाच्या निर्मितीपासून लाटा, हेलकावे, उलथापालथ या परिस्थितीशी फक्त माणसाची जातच नाही तर या विश्वातला प्रत्येक सजीव-निर्जीव कण अन् कण सामना करत आला आहे. त्याची खंत बाळगण्यात काहीच अर्थ नाही. लाटा उसळल्या आणि ओसरल्या. काही जीव आणि भूभाग लाटांनी गिळला! पण जीवनाचा प्रवाह अखंड वाहतोच आहे!

मन्या, पण अल्विन टॉफलर म्हणतो त्या प्रमाणं शेती क्रांती दहा हजार वर्ष चालू होती. औद्योगिक क्रांतीची लाट तीनशे वर्षातच ओसरली. आता उठलेली माहिती आणि तंत्रज्ञानाची लाट काही दशकातच माघार घेणार आहे. मग पढे काय होणार?

पुढे काय होणार हे सांगणे कठीण आहे. पण या लाटात आणि उलथापालथीत हजारो वर्षं तग धरून राहिलेले भारतीय-जीवन-विज्ञान (म्हणजेच धर्म, तत्वज्ञान आणि संस्कृती) मानव जातीला दिलासा देणारे ठरणार आहे यात संशय नाही. त्यात सांगितलेल्या मार्गानं आपण चालत राहूया!

४१. मन्या, एकेकाळी आपला भारतदेश सगळ्या दृष्टींनी वैभवाच्या शिखरावर होता असे म्हणतात. मग आज आपल्या देशाची इतकी दयनीय अवस्था कां झाली आहे?

आपल्या देशाची अवस्था दयनीय झालीय असं मलातरी वाटत नाही. तसा चुकीचा समज करून देण्यात आला आहे. आणि तसा समज पसरवणारे दुसरे तिसरे कुणी नसून विज्ञानाच्या झगमगाटाने दिपून

गेलेले, इंग्रजाळलेले, पाश्चात्य जीवन-पद्धतीने भारावलेले, आपल्या भोवती वावरणारे भोंदू बुद्धिवादीच आहेत! शिवाय भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या चार दशकात राज्यावर आलेल्या पक्षाच्या स्वार्थी आणि भ्रष्टाचारी नेत्यांनी, बुद्धिवादी (म्हणून क्रांतीवादी) आणि सुधारणावादी मुठभर लोकांशी हातमिळवणी केली. पैसा प्रसिद्धी आणि बक्षिसे देऊन त्यांना बटीक बनवून ठेवले. त्या मूठभर लोकांनीच प्रसार माध्यमे, साहित्य, कला या क्षेत्रात धुडगुस घालून जनतेला क्रांतीची, परिवर्तनाची स्वप्ने विकली. समाजाला उपभोग आणि त्यासाठी संघर्ष करण्यात गुंतवून ठेवले आणि स्वतःची उखळं पांढरी करून घेतली. राज्यघटना, सरकार, न्यायपद्धती, उत्पादन, वितरण, विनिमय, उपभोग-कशातच भारतीय आत्म्याचे प्रतिबिंब उमटले नाही. त्या बुद्धिवाद्यांनी उमटू दिले नाही.

भारताची मान या मातीत रुजलेल्या धर्म, अनेक भाषा, तत्वज्ञान आणि संस्कृती इत्यादीमुळे अजून ताठ आहे. आणि ती तशीच राहणार आहे!! बुद्धिवाद्यांनी त्या गोष्टींच्या विरोधात कितीही प्रचार केला, लढे दिले, सुख समृद्धीची स्वप्ने पुरवली तरी, त्यांचे पाठीराखे त्यांना मधेच सोडून जातात, आणि ‘मी भारतीय आहे आणि मला त्याचा अभिमान आहे’ असं म्हणू लागतात किंवा सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी गुपचूप रांगेत उभे राहतात, ही खरी वस्तूस्थिती आहे.

बा मना, अध्यात्म हीच भारताची खरी शक्ती आहे. ती शक्ति वाढवण्याचा आपण प्रयत्न करूया!

४२. दगडात शक्ति (Energy) असते ही गोष्ट ओळखून आपल्याकडल्या कलावंतांनी त्या दगडातून देव घडवला, त्याची पूजा केली, उपासना केली. जड वस्तूत चैतन्य शोधण्याचा तो एक महान शास्त्रीय प्रयोग होता.

पण कलियुगात वावरणाऱ्या माणसाने मात्र तो प्रयोग हाणून पाडला! दगडाला दगडच समजून त्याची पूजा करणे सोडून दिलं. पण दगडातल्या शक्तीने माणसाला सोडले नाही. त्या शक्तीने स्वतःला बुद्धिवादी समजणाऱ्या माणसांची बुद्धिच फिरवली. म्हणून बुद्धिवाद्यांनी सुंदर सुंदर मूर्तींच्या ठिकऱ्या

उडवल्या, आणि त्याच ठिकऱ्या सामान्य माणसांनी एकमेकांची डोकी प ोडण्यासाठी, सरकारी कचेऱ्यांवर, घरांवर, वाहनांवर, दगडप क करण्यासाठी वापरल्या!! सुप्तशक्ती आपले कोणकोणते अवतार आणि अवतार कार्य कसं दाखवील त्याचा काही भरवंसा नाही. प्रत्येक दृश्य अविष्काराच्या मागे एक अदृश्य शक्ति असते. त्या शक्तीला जो शरण गेला तो तरून गेला. पण जो शरण जाणार नाही तो दगडासारखा तळाशी जाणार याची खात्री बाळग!

४३. परिस्थितीचा प ायदा उपटण्यासाठी तिकडमबाजी करणारी बुद्धिजीवी माणसं सगळ्या युगात, सगळ्या कालखंडात आणि कुठल्याही प्रदेशात/देशात वावरताना आढळतातच! साहित्य सम्राट न.चिं. केळकरांनी प च राज्यक्रांती (तिसरी आवृत्ती १९८९) या त्यांच्या पुस्तकात अशा बुद्धिजीवी लोकांची दोन उदाहरणं दिली आहेत.

प च राज्यक्रांतीच्या काळात 'पानकोन' नावाचा वृत्तपत्र प्रकाशक एकाचवेळी दोन वर्तमान पत्रे प्रकाशित करीत असे. एक राजपक्षाचे तर दुसरे प्रजापक्षाचे. त्याने एकमेकावर टीकेचा भडिमार करून दोन्ही पक्षांचे वाचव काबीज केले आणि अमाप पैसा मिळवला. त्याचप्रमाणे 'व्हालने' नावाच्या माणसाने चालवलेल्या वृत्तपत्राचा छापखाना आणि संपादकीय कचेरी एका जुन्या आणि ओसाड वाड्यात होती. तिथे भुते वावरतात आणि व्हालने लिहितो त्या मतांना अदृश्य सृष्टींतल्या आत्म्यांचा पाठिंबा असल्यामुळे त्याने मांडलेली मते आणि भविष्यातल्या घटना खऱ्या ठरणार अशी भोळ्या लोकांची समजूत करून देण्यात आली होती. त्यानेही खोऱ्यानं पैसा ओढला असणारच!! आपण केवळ पैसा कमावण्यासाठी बुद्धी वापरायची गरज नाही! कारण पैशाने सोय होते, पण खरे सुख समाधान मिळत नाही हे गोंदवलेकर महाराजांचं वचन आपल्या मनावर कोरले गेलेलेच आहे!!

४४. सेंट हेलेना बेटावरून आपल्या मुलाला लिहिलेल्या शेवटच्या पत्रांत प च राज्य क्रांतीबद्दल नेपोलियन म्हणतो- ‘प च राज्य क्रांतीत प्रजापक्ष आणि राजपक्षातल्या लोकांनी इतके अत्याचार केले की, ज्या काही चांगल्या मूलभूत कल्पना त्यात होत्या त्याही नष्ट होण्याची वेळ आली होती.’

नेपोलियन पुढे म्हणतो, ‘राज्य कारभार करणे म्हणजे लोकांना सार्वजनिक हित व नीतिमत्ता शिकवणे होय. हे विसरून असत्पक्ष उभारणे किंवा डाव खेळत बसणे याने प ार तर गावगुंडी साधेल, खरे राजकारण साधणार नाही.’

तसेच, ‘गुन्ह्यांची संख्या कमी होणे हाच राज्य नीट चालल्याचा पुरावा आहे.’ (प च राज्यक्रांती, न.चिं. केळकर, तिसरी आवृत्ती, १९८१)

मन्या, सध्या आपल्या देशात हेच चाललंय! चांगल्या कल्पना पायाखाली चिरडल्या जात आहेत; गावगुंडीला खतपाणी घातलं जात आह; गुन्ह्यांची संख्या दर दिवशी वाढत आहे! कायद्याने प्रस्थापित झालेल्या लोकशाही देशातले राज्य नीटपणे चालल्याची ही लक्षणं समजायची कां?

म्हणूनच तुला केव्हापासून सांगतोय, या सगळ्याचा विचार कर आणि अत्याचाराकडे झुकू नकोस. असत्पक्ष किंवा गावगुंडीच्या बाजूने उभा राहू नकोस. सार्वजनिक हित आणि नीतिमत्तेचे धडे मात्र विसरू नकोस!! गांवगुंडी तुझ्यापर्यंत पोहचू नये यासाठी हाच एक खात्रीलायक उपाय आहे.

४५. स्वार्थ लोलुपता प्रमाणाबाहेर गेली म्हणजे राज्यक्रांती शांततेने होऊच शकत नाही. ही गोष्ट जगाच्या इतिहासावरून स्पष्ट होते. म्हणूनच प च राज्यक्रांतीचा इतिहास लिहिणाऱ्यांनी त्या काळात झालेल्या अत्याचारांकडे दुर्लक्ष करून त्यातून काय निष्पन्न झाले याची तात्विक चर्चा करण्यावर भर दिला.

मन्या, हे मात्र खरं आहे हं! स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व हे तीन महान विचार प च राज्यक्रांतीनेच जगाला दिले. आणि त्याची दखल इतिहासकारांनी घेतली हे योग्य झालं!!

बा मना, विचार दिले. पण त्या प्रमाणे आचरण करण्याची जबाबदारी कुणाची? ते विचार सामान्य माणसांच्या दैनंदिन आचरणात गोवले जात नाहीत तोपर्यंत ते ग्रंथांतच राहतात. विचार आणि आचार यांची एकत्र बांधणी करण्याची दूरदृष्टो फक्त भारतीय ऋषि-मुनिंनी दाखवली. माणसाचा पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आखून दिला. सकाळी लवकर उठावे; आदल्या दिवशी जी काही बरीवाईट कामे केली असतील ती देवाच्या पायावर अर्पण करून उगवलेल्या दिवसांत माझ्या हातून चांगलीच काम व्हावीत अशी प्रार्थना करावी; नंतर आंघाळ, संध्या, देवपूजा करून सगळ्या कुटुंबाच्या गरजा भागवता येतील एवढा पैसा कमावण्यासाठी उद्योग-व्यवसाय करावा; सूर्य डोक्यावर आला की पुन्हा देवाची प्रार्थना करून बायकां मुलांसह जेवण करावं; त्यानंतर कुटुंबातल्या लहान-मोठ्या लोकांसह बसून, पाढे स्तोत्रपाठ आणि इतर चांगल्या पुस्तकाचं वाचन करावे; कुंटुबासमवेत रात्रीचं भोजन करून झोपी जावे!

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष, यार चारही पुरुषार्थांचा योग्य तो लाभ पदरात पडावा म्हणून सामान्य माणसांसाठी आपल्या पूर्वजांनी किती सुंदर दिनक्रम आखून दिला होता. पण फक्त सुखाच्या आणि त्यासाठी पैसा कमावण्याच्या मागं लागलेल्या माणसांनी या कार्यक्रमाची ऐशीतैशी करून टाकली. दिवसाचे दहा-बारा तास पैसा कमावण्याच्या कामातच घालवल्यानंतर कुठलं आलंय संध्यावंदन, ग्रंथवाचन आणि पाढे पर्वचा? मग उरते ती फक्त धावपळ!! गाड्या पकडण्यासाठी, बकाबका पोट भरण्यासाठी, धक्के खात घरी परतण्यासाठी, थकून, भागून झोपी जाण्यासाठी! - सगळ्या गोष्टीसाठी धावपळ आणि धडपड!!

मन्या, खरच तसं झालंय रेऽ! पूर्वी सारखा आखीव दिनक्रम न राहिल्यामुळं निर्माण होणाऱ्या मानसिक अस्वस्थतेचा अनुभव मी सध्या घेतोय!! पाश्चात्य देशातली अस्वस्थतेने पछाडलेल्या लोकांची संख्या साठ टक्यांच्या पुढं गेलीय् असं म्हणतात. माझी ही तीच अवस्था होणार आहे कां?

घाबरू नकोस! मानसिक अस्वस्थतेचा अनुभव घ्यायचा नसेल तर आपल्या ऋषिमुनी, संतांनी घालून दिलेल्या आखीव दिनक्रमातल्या जेवढ्या गोष्टी पाळता येतील तेवढ्या तरी नेटाने पाळ!

४६. मन्या, तू मागं एकदा तुकाराम महाराजांची एक ओवी माझ्या तोंडावर पकली होतीस. 'मन करारे प्रसन्न...' पण माणसाला जे मिळायला हवं तेच मिळालं नाही तर मन प्रसन्न कसं ठेवणार माणूस? तुझं मन प्रसन्न आहे?

हो! मी अर्धा प्रसन्न आहे! कारण माझाच अर्धा भाग-म्हणजे तू-इकडून तिकडून सुख मिळवण्यासाठी अजून धडपड करतो आहेस! वस्तू विकत घेण्याचा सपाटा लावला आहेस!! अरे वस्तू शिवाय अन्य कुठं तरी मन गुंतव. कुठंतरी श्रद्धा ठेवल्या शिवाय मन प्रसन्न कसं राहणार? सध्या श्रद्धा-अंधःश्रद्धा या मुद्यांवर गदारोळ चालू आहे. तो गदारोळ आपण क्षणभर बाजूला ठेवू, आणि भदंत नागसेनांनी सांगितलेली खऱ्या श्रद्धेची दोन लक्षणं मान्य करू!

मन्या, मधेच गप्प कां झालास? हे भदंत नागसेन कोण?

ग्रीक राजा मिलँडर भारतात आला असतांना नागसेन आणि त्याच्या मधे प्रश्नोत्तरे झाली. दोन हजार वर्षापूर्वी झालेल्या त्या प्रश्नात्तरांचा संग्रह उपलब्ध आहे. श्री.बी.सी. कांबळे यांनी १९६१ साली त्या संग्रहाचं मराठी भाषांतर 'राजा मिलिंदाचे प्रश्न' या नावाने प्रसिद्ध केलं होतं. त्यात श्रद्धेची लक्षणे दिली आहेत.

नागसेन - प्रसन्नता आणि महत्वाकांक्षा ही श्रद्धेची लक्षणे आहेत.

मिलिंद - प्रसन्नता हे श्रद्धेचे लक्षण कसे काय?

नागसेन - श्रद्धा एकाद्या झऱ्याप्रमाणं उगम पावते. तिचे उगमस्थान चित्तात आहे. अशी श्रद्धा पांच प्रकारचे अडथळे मोडून काढते. लालसा, मत्सर, बौद्धिक शिथिलता, आध्यात्मिक गर्व, शंका कुशंका हे पाच अडथळे मोडून काढले म्हणजे मन स्वच्छ, प्रसन्न व निर्धास्त राहते!

मिलिंद - महत्वाकाक्षा हे श्रद्धेचे लक्षण कसे?

नागसेन - चित्तमुक्तीच्या तीन अवस्था असतात. त्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय अवस्था असं संबोधितात. ज्या अवस्थेस भिख्खु पोहोचलेला नाही, जो अनुभव त्यास अजून मिळालेला नाही, अद्याप जे आकलन झालेलं नाही त्या अवस्थे प्रत जाण्याची (इच्छा) महत्वाकांक्षा त्यास असते. म्हणून श्रद्धेचं लक्षण महत्वाकांक्षाही आहे.

भदंत नागसेन आणि राजा मिलिंद (मिलँडर) यांच्या झालेल्या या संवादावर टिका-टिप्पणी करण्याची गरजच नाही.

पाश्चात्य विज्ञानाचे समर्थक प्रत्येक श्रद्धेला अंधःश्रद्धा ठरवण्याची धडपड करतायत. पण त्यात त्यांना प ारसे यश मिळण्याची शक्यता नाही! कारण चित्ताची प्रसन्नता आणि साधनेत पुढे जाण्याची महत्वाकांक्षा या गोष्टी अन्य कोणीच ठरवू शकत नाही. ज्या त्या व्यक्तीलाच ते ठरवावं लागतं!! आपणच ते ठरवू या! आणि पाचही अडथळे दूर करण्या प्रयत्न करू या.

४७. एऽ, आरशांत बघतोस ना नेहमी?

मन्या, हे काय विचारणं झाल? आरशांत बघून, केस विंचरून कोल्ड क्रीम लावून, दाढी व्यवस्थित झाली आहे की नाही याची खात्री करून घेऊन मगच बाहेर पडतो मी!

शिवाय, शर्ट, पँट, टाय, बूट व्यवस्थित घातले आहेत की नाहीत, बुटाला पॉलिश आहे की नाही याची पण खात्री करून घेतोस!

त्या गोष्टींचो खात्री करून घ्यायला आरशाची गरज असते. आरशात न बघताही त्या गोष्टी कळतात.

तरी पण घराबाहेर पडण्यापूर्वी एकदा आरशात डोकावतोसच. कशासाठी?

ती आपली एक सवय!

ती सवय हे खरंच आहे. पण हा सगळा खटाटोप कशासाठी? आपलं मूल्य किती वाढलंय त्याची खात्री करून घण्यासाठी?

व्हॉट नान्सेन्स? तू......

चिडू नकोस! आरसाच तुला दाखवतो की तुझं मूल्य किती वाढलंय!! त्या आरशानंच तुला 'मूल्यवर्धित वस्तू' (Value added product) बनवून टाकलंय. लाकडाचे जुने फर्निचर विकायचे असेल तर जिथे कुठे लाकडाचे टवके उडाले असतील तिथे लांबी भरून, नंतर सँडपेपरने घासून, त्यावर पॉलिशचे दोन हात मारले की वस्तूला शे-पाचशे रूपये किंमत जास्त मिळते. तोच प्रकार भाजीच्या बाबतीत! भाजी निवडून, चिरून, नीट पॅकींग करून विकली की पाव किलो भाजीला दोन रूपये जास्त किंमत मिळते. माणसानं तो प्रयाग करून बघायचं ठरवलं!

पण माणूस आणि फर्निचर किंवा भाजी यातला फरक इतरांना कळतोच! त्यामुळं रंगरंगोटी आणि जामानिमा करून बाहेर पडणाऱ्या माणसाची कधी कधी किंमत घटते सुद्धा! कुणी म्हणतं 'च्यायला, साधा कारकून तर आहे. उगीच 'शाइन' मारतोय'! आणखीन कुणी म्हणतं 'बापाचा पैसा आहे. करतोय मस्ती!' हे झालं बाहेरच्या लोकांचं. पण तुझी बायको सुद्धा तुझं अवमूल्यन करते. अरे, दुपारी डब्यातली भाजी खातांखातां, किंवा हॉटेलमधे बसून चहा पितापिता तुझ्या कपड्यावर पडलेले डाग दाखवून बायको विचारतेच ना, 'कपड्याची एवढी काळजी घेता येत नाही तर कशाला शिवता इतके छान छान कपडे'? लोक टिंगल करतात ते वेगळचं!

माणसांचे मूल्य ठरते ते त्याच्यात झालेल्या गुणात्मक बदलामुळं! सौंदर्य प्रसाधने किंवा छान छान कपडे घालून गुणात्मक बदल साध्य होतोच असे नाही! म्हणूनच सांगतो, येताजाता आरशात डोकावत जाऊ नकोस!

४८. मन्या, तू प्रत्येक नव्या कल्पनांची टर उडवतोयस आणि जुन्या कल्पनाचं समर्थन करतोयस्! या पद्धतीनं तू स्वर्ग, नरक, पुनर्जन्म या कल्पनाचं पण समर्थन करशील! काय मिळतं तुला तसं करून?

दिलासा, समाधान, प्रसन्नता!! चांगली कामे केली की स्वर्गात जागा मिळते या कल्पनेमुळे माणूस चांगली कामे करण्याची धडपड करतो. वाईट कर्मामुळे नरकात पाठवणी होईल या भीतीने माणूस वाईट कर्म करण्याचे टाळतो. पुनर्जन्माची कल्पना तर फारच सुंदर आहे! मरणानंतर जीवन संपत नाही, तुम्ही नव्या रूपाने, नावाने, नव्या दशात, नव्या मानवी गटात, नव्या कर्तृत्वाचे आव्हान स्विकारण्यासाठी पुन्हा जन्माला येऊ शकता हा पुरोगामी विचार दिलासा देणारा नाही?

राजा मिलिंदाच्या आणखी एका प्रश्नाला उत्तर देताना भदंत नागसेन सांगतात 'एका दिव्याच्या अग्निमधून दुसरा अग्नि निर्माण होतो. त्या प्रमाणे एका नावारूपाचा अंत होऊन त्यामधून दुसऱ्याचा पुनर्जन्म होत असतो. दुसरे नांव रूप पहिल्या नांव रूपाच्या परिणामातूनच उत्पन्न होते.'

या सगळ्याचे मर्म एकच. माणसाने आयुष्य भर चांगली कामे करत राहावे! मृत्यूनंतर किंवा पुढल्या जन्मात तुला कोणती बक्षिसे किंवा शिक्षा (Rewards & punishments) मिळणार आहेत त्याची पूर्व तयारी या जन्मातच नको कां करायला? स्वर्ग, नरक, पुनर्जन्म या कल्पना म्हणजे मृत्यू नंतरच्या आणि पुढच्या जन्मातल्या शक्यतांचे आलेखच आहेत. पुढल्या काही वर्षात कोणती उद्दिष्टे कशी गाठायची याची टिपणे आपण करतो आणि तसे प्रयत्नही करतो (forecasting, planing & execution). यश किंवा अपयश मिळाल तर ते स्विकारावंच लागतं! तोच पद्धत पुढल्या जन्माला कां लागू करायची नाही?

आपल्या पूर्वजांनी सबंध मानव जातीला लागू पडतील अशा स्वर्ग नरक पुनर्जन्म या कल्पना मांडून मानव जातीवर फार उपकार केलेत! आणि गमतीची गोष्ट म्हणजे जगातल्या प्रमुख धर्मांनी त्या कल्पना उचलून धरल्या आहेत. हिंदूंचा स्वर्ग-नरक, ख्रिश्चनांचा हेवन-हेल, इस्लामचा जन्नत-जहन्नम, तसंच बौद्ध धर्मातली पुनर्जन्माची कल्पना यांच्यात फारसा फरक नाही. फरक असलाच तर फक्त तपशीलाचा आहे.

म्हणून म्हणतो, मन शुद्ध ठेवून चांगली कर्म करण्याचा कसोशीनं प्रयत्न कर! स्वर्ग, नरक, पुर्नजन्म ह्या कल्पना सध्याच्या जन्मात चांगली कामे करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या आहेत असे समजून त्यांचा स्वीकार कर.

४९. मन्या. तू सामाजिक बांधिलकी मानतोस?... का रे? हंसायला काय झालं?

मी तुला वेगळा प्रश्न विचारतो. त्याचं आधी उत्तर दे. तू व्यक्ति स्वातंत्र्य मानतोस?

अर्थात!

मग सामाजिक बांधिलकीच्या गप्पा सोडून दे. स्वतःच्या सगळ्या इच्छा, वासना पूर्ण करण्याची साधने तुझ्याजवळ आहेत. म्हणून तुला सामाजिक बांधिलकीची आठवण झाली! म्हणजेच व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरेपूर उपयोग करून घतल्यानंतर तुला समाजाचा कळवळा आला!! तेही बरोबरच आहे म्हणा. प्रथम व्यक्तिगत स्वार्थ, मग सामाजिक स्वार्थ!!

आपल्या देशातल्या सामाजिक, राजकीय, शासकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांनी समाजवादाचा मंत्र घोकत घोकत प्रथम व्यक्तिगत स्वार्थ जपला. आणि नंतर समाजाच्या भल्याचा विचार केला. ज्यांचे उखळ लवकर पांढरे झाले त्यांना-म्हणजे जे लोक 'नाहीरे' वर्गातून पटकन 'आहेरे' वर्गात गेले (have nots became haves) यांना 'नाहीरे'वाल्यांनी खाली खेचायची धडपड केली. खाली खेचणे जमले नाही तेव्हा उरलेले 'नाहीरे'वाले प,टून वेगळे झाले. भारतात गेली पन्नास वर्षे अशीच सुंदोपसुंदी चालू आहे. आता तर समाजवादाचे इतके तुकडे झालेत, की समाजवाद हा पाच अक्षरांचा पूर्ण शब्द प क्त पुस्तकातच हुडकावा लागतो!

व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजवाद या दोन्ही कल्पनांची गल्लत केल्यामुळे भारतीय समाजाची इतकी वर्ष कशी ससेहोलपट झाली हे तझ्या लक्षात आलंच असेल! तेव्हा नशिबानं तुझ्या पदरात झुकतं माप

टाकलं असेल तर त्यातला काही भाग 'इंद न मम' या भावनेनं 'नाही रे' च्या झोळीत टाक! तुझ्या माझ्या पुरतं समाजवादाचं हेच साधं, सोपं आणि गोंडस रूप आहे.

५०. शिट्!

का रेऽ, आल्या आल्या शिट् करायला काय झालं? घाईची लागली असेल तर संडासात जा. इथं करू नकोस!

मन्या, मला लागलेली नाहीये! एका शब्दात नाराजी किंवा निषेध नोंदवण्याची अलिकडली पद्धत आहे ती. मन्या तुला सांगतो ही हिंदुत्ववादी मंडळी कुठल्या काळात वावरतायत कुणास ठाऊक? 'विश्वशांती यज्ञ' करायला निघालीयत! दहा-दहा, शंभर रूपयांचे बिल्ले विकून देणग्या गोळा करत आहेत!

त्यात काय बिघडले? तुला माहित नाही? ऋषि चॅनलवाल्यांनी तर विश्वशांती यज्ञासाठी करोडो-अरबो डॉलरचा कायम स्वरूपाचा निधी जमवण्याचा घाट घातलाय असे ऐकिवात आलंय.

ओऽशिट्!! पैसा गोळा करण्याचे धंदे आहेत सगळे, दुसरं काय? लाकडे, अन्न धान्य, दूध तूप, जाळून विश्वशांती प्रस्थापित होणार आहे का? आपल्या देशात अजून हजारो कुटुंबांचे भूकबळी जात आहेत? यज्ञात जाळण्यापेक्षा त्या वस्तू गरिबांना वाटल्या तर त्यांचा दुवा तरी मिळेल संयोजकांना?

तू म्हणतोयस् ते 'डावीकडे' झुकलेल्या लोकांचे एककल्ली विचार आहेत. पण तूच विचार कर. ज्या कुटुंबांचे हाल चालू आहेत ते केवळ यज्ञात अन्नधान्य जाळले जातयं म्हणून? नाही! सरकारी गोदामांत हजारो पोती धान्य सडत पडलंय; श्रीमंतीचं ओंगळ प्रदर्शन करण्यासाठी पंचतारांकीत हॉटेलमधे जाऊन जेवण करणारी श्रीमंतांची बाळं कितीतरी टन अन्न दरमहा टाकून देतायत्; खाद्य-पेय पुरवणाऱ्या उपहार गृहात तीच परिस्थिती आहे; शेतमालाला योग्य भाव मिळण्याची शक्यता नाही असे दिसून आल्यावर उभी पिके जाळून टाकणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी नाही; सामाजिक आदोलन करणाऱ्या संघटनांनी आणि

अलिकडल्या अतिरेक्यांनी सामाजिक यज्ञात किती संपत्तीची आणि निरपराध माणसांची आहुती टाकलीय त्याची आकडेवारी आहे तुझ्याकडे?

वेदातल्या तंत्रज्ञानाची आपल्याला विशेष माहिती नाही. ऋषिचॅनलवाले त्याला Vedic Technology म्हणतात. यज्ञामुळं Collective consciousness वर परिणाम होऊन त्यात positive change होतो असं त्याचे मत आहे. तसे परिणाम खरचं घडून येतात कां हेही आपल्याला ठाऊक नाही. केवळ अन्नधान्य आणि इतर वस्तू जाळल्या जात आहेत म्हणून यज्ञावर टीका करण्यात अर्थ नाही!

बा मना, अन्नधान्याची आणि इतर वस्तूंची कोणत्याही प्रकारे नासाडी करणार नाही, आपल्या जवळच्यांनाही तसे करू देणार नाही, भुकेला माणूस दिसला तर आपल्या चार घासातला एक घास त्याला देईन असा निश्चय आपण करू या!

५१. 'पूर्वेकडल्या देशांनी (म्हणजे विशेषतः भारत, चीन आणि जपान) स्विकारलेल्या विश्वाबद्दलच्या दृष्टीकोनातून आणि आधुनिक पदार्थ विज्ञानाने दिलेल्या नव्या दृष्टीकोनातून एक गोष्ट स्पष्ट होते की, विश्वातील प्रत्येक वस्तू किंवा घटना अन्य सगळ्या गोष्टींशी संबंधित असतात'..... 'विश्वातील कोणताही घटक मूलभूत किंवा स्वतंत्र घटकांशी त्यांचा कसा संबंध आहे त्यावरून तेच स्पष्ट होतं.'..... अश्वघोषाची वचनं सुद्धा हेच सांगतात. अश्वघोष म्हणतो- 'सर्व गोष्टींचं त्यांच्या मूळ स्वरूपात नामकरण किंवा वर्णन करता येत नाही.'

वरील अवतरणं डॉ. फिट्जोफ काप्रा यांच्या 'ताओ ऑफ फिजिक्स' या पुस्तकातल्या काही उताऱ्यांचं मुक्त भाषांतर आहे.

डॉ.काप्रानी पुढं लिहीलंय 'माझा असा विश्वास आहे की पदार्थ विज्ञानाद्वारे स्पष्ट होणारा वैश्विक दृष्टीकोन (World view) हा आपल्या आजच्या समाज रचनेशी असंबंद्ध आहे. कारण निसर्गात आपल्याला जे परस्परावलंबित्व किंवा संतुलन आढळते ते आजच्या आर्थिक आणि सामाजिक रचनेत दिसत नाही....

गतिमान संतुलन राखण्यासाठी आपल्याला आर्थिक आणि सामाजिक रचनेत आमूलाग्र परिवर्तन करावे लागेल. तीच खऱ्या अर्थाने सांस्कृतिक क्रांती म्हणता येईल. आपल्या सभ्यतेचं अस्तित्व त्यावरच अवलंबून आहे.... निसर्गात आढळणाऱ्या पूर्णत्व आणि परावलंबित्वाचा अनुभव घ्यावा लागेल, सहअस्तित्वाची कला आत्मसात करावी लागेल.'

बा मना, गप्प कां झालांस? तुझ्या माझ्यातल्या संबंधाचा आणि आपण एकमेकांवर किती अवलंबून आहोत त्याचा शोध घेतायस कां?

५२. अनेक दोषांनी बुजबुजलेल्या माणसांच्या प्रदेशात 'शंभुला' नावानं ओळखली जाणारी लोककल्याणकारी (Philanthropic), आणि तत्वज्ञानाला वाहून घेतलेल्या लोकांची वसाहत आहे. वाळवंटात आढळणाऱ्या ओलाव्याच्या जागेसारखी (oasis), मानवजातीला दिलासा देणारी!

मन्या, कालरात्री तू एकादं स्वप्न तर बघितलं नाहीस ना?

स्वप्न? नाही!! ॲन्ड्यु थॉमस या ब्रिटीश पर्यटकानं त्याच्या 'शंभाला-प्रकाशाचा ओलावा' (Shambhala-Oasis of light) या पुस्तकात शंभालाच्या चतुःसीमा दिल्या आहेत. 'उत्तरेला सैबेरिया, दक्षिणेला तिबेट-भारत, पूर्वेला चीन आणि पश्चिमेला खोतन' (Khotan) यांच्यामधे शंभाला नावाची वस्ती आहे. शाक्य घराण्यातल्या शंभाला नावाच्या राजाच्या अधिपत्याखाली तो प्रदेश होता. तेच नाव या प्रदेशाला दिलं गेलं. तिबेटी भाषेत शंभाला या शब्दाचा अर्थ 'सुख स्त्रोतावर आधारलेला' असा आहे (Held by the source of happiness).

अरे व्वा! मन्या, तुझ्या थॉमसनं त्या वसाहतीला भेट दिली असलेच!

नाही! एका तिबेटो लामाने थॉमसला त्या वसाहतीलकडं जाणाऱ्या रस्त्यापर्यंत पोहोचवलं आणि लामा निघून गेला. थॉमस पुढं जाऊ लागला. पण वसाहतीत शिरण्यापूर्वीच थॉमसला कळून चुकायचं की लामानं त्याला ज्या जागेवर सोडलं होतं तिथंच तो उभा आहे. असं दोन तीनदा घडलं. मग शंभालाला भेट

देण्याचा विचार सोडून देऊन थॉमस लामांच्या आश्रमात परत गेला. तिथं गेल्यावर त्याला कळलं की ज्याला शंभालाची दिक्षा मिळालेली नाही त्याला त्या प्रदेशात शिरकाव करताच येत नाही.

पण थॉमसनं एका शक्यतेची नोंद करून ठेवलीय की 'ज्याप्रमाणं माणूस चंद्रावर उतरू शकेल ही कल्पना प्रत्यक्षात उतरली त्याप्रमाणं पूर्ण मानवांची शंभाला ही वसाहत एक दिवस उजेडात येईल!' शंभालामधे राहणाऱ्या तत्वचिंतकांनी मानवजातीला काय दिलं त्याचा गूढ आणि रोमहर्षक इतिहास प्रत्यक्ष वाचण्यासारखा आहे.

५३. 'ॐ सहस्त्रशीर्षा पुरूषः सहस्त्राक्षः सहस्त्रपाद'

मन्या, काय चालवलंयस हे?

'स भूमिम्.....'

पुन्हा तेच! आपल्या सोसायटीतल्या लोकांची भांडणं; विक्रेत्यांचे कान किटवणारे आवाज; शाळेत पाठवण्यासाठी मुलांच्या पाठीत रपाटे घालत ओरडणाऱ्या आया; नवऱ्यावर फ कलेल्या भांड्यांची ठणाठण् हा सगळा आक्रोश कमी पडतोय म्हणून कां तू बेंबीच्या देठापासून घोकंपट्टी चालवलीयस्?

त्या सगळ्या आक्रोशाचा परिणाम शांत करण्यासाठीच मी स्तोत्रपाठ करतोय!

ऐक! ऐक! रडत ओरडत पॅसेजमध्ये आलेल्या आपल्या मुलाला गंगूमावशी काय सांगतीय. म्हणतीय 'मनु काका पुरूष सूक्ताचा पाठ करतायत. इथं गळा काढून रडू नकोस.' आहे की नाही सूक्ताचा सकारात्मक परिणाम! सगळे आवाज (स्वर) सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम घडवून आणतात हे शास्त्रीय सत्य तुला माहितच आहे. आकाशातून विमान गेलं की रात्री झोपलेली मुलं दचकून उठतात; शक्तिशाली बॉम्ब स्फ ोटानं इमारती ढासळतात, माणस मरतात; लोकल मधून सतत प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना कमी ऐकू येतं. म्हणून ते मोठ्यानं बोलू लागतात; मंद स्वरातलं संगीत ऐकलं की गाई जास्त दूध देतात; आईच्या अंगाई गीतानं मुलं पटकन झोपतात! एकूण काय की, स्वरांचे असे असंख्य बरे वाईट परिणाम होतात एवढं

तरी तुला मान्य करावंच लागेल. वाईट परिणाम टाळण्यासाठी हल्ली पोलिसांनाही समाजाला वेळोवेळी समज द्यावी लागते. 'रात्री अकरा नंतर ध्वनी-वर्धक बंद!' मग ठराविक स्वरावर कमी-अधिक आघात करून म्हटलेल्या वैदिक स्तोत्रांनी सकारात्मक परिणाम घडून येतात अशी श्रद्धा ठवून सूक्तांचं रोज पठण करायला काय हरकत आहे? माझ्याबरोबर म्हण- 'हरिः ॐ'....!!

पारंपारिक सूक्तातलं ज्ञान भोवतालच्या वातावरणात सकारात्मक परिणाम घडवून आणणारं असतं आणि त्याचा रोज प्रयोग करावा लागतो. उलट प्रयोगातून सिद्ध होणारं ज्ञान पुस्तकात पडून राहतं. एकाद्याला खुमखुमी आली तरच त्याचं पुन्हा परिक्षण करता येतं. आता तूच ठरव मानव जातीच्या आणि संस्कृतीच्या जोपासनेला कुठल्या प्रकारचं ज्ञान जास्त प ायदेशीर आहे!! मग म्हण, 'हरिःॐ, सहस्त्रशीर्षा पुरूषः'

५४. ध्वनि आणि प्रकाश लहरी (Sound and Light waves) कधीही नष्ट होत नाहीत. त्या वातावरणात (अवकाशात) सतत घुमत आणि पि रत राहतात. या शास्त्रीय सत्याची नोंद जुन्या आणि नव्या शास्त्रीय ग्रंथांत सापडते. म्हणूनच आकाशाला 'पृथ्वीचं/ निसर्गाचं मन किंवा स्मृती' असं म्हटलं जातं.

एक अवकाश यात्रेकरू शक्तिशाली यंत्राद्वारे अंतराळात भिरभिरणारया ध्वनिलहरींचो नोंद घेत होता. त्यावेळी त्याला काही कुजबुज ऐकू आली. ध्वनि-पि तीवर मुद्रित (Recorded on a tape) केलेली ती कुजबुज पुन्हा पुन्हा ऐकल्यावर त्या आकाश यात्रेकरूची खात्री पटली की ती कुजबुज 'ॐ' या स्वराशी मिळतीजुळती आहे.

अशीच एक कथा जिवंत राहणाऱ्या प्रकाश लहरीच्या संबंधात विज्ञान-वर्तुळात 'एक आश्चर्य' म्हणून सांगितली जाते. दुसरा एक अवकाश यात्रेकरू चित्रीकरण करत असतांना त्याच्या कॅमेऱ्यावर एका विमानतळांचं चित्र उमटले. सध्या अस्तत्वात असलेल्या कुठल्याही विमानतळांशी ते चित्र जुळेना. खूप शोध घेतल्यानंतर असे उघडकीस आले की सध्या जिथे मास्को शहर वसलेले आहे त्याच्या जवळच्या सीमा प्रदेशात पूर्वी तो विमानतळ होता.

या शास्त्रीय सत्याचं कुणी अवमूल्यन करण्या प्रयत्न केला, तरी पृथ्वीवर घडणाऱ्या चांगल्या किंवा वाईट घटनांची नोंद पृथ्वीच्या /निसर्गाच्या मनात म्हणजेच आकाशांत-साठवून ठेवली असते हे सत्य नाकारता येणार नाही.

माणसाच्या मनातून सुख-दुःखाच्या आठवणी ज्याप्रमाणे नष्ट होत नाहीत त्याप्रमाणे पृथ्वीवर घडलेल्या चांगल्या वाईट घटनांच्या स्मृतीही आकाशाच्या मनातून नष्ट होत नाहीत. म्हणूनच आपले पूर्वज आपल्याला शिकवत आले की, माणसाने नेहमी चांगले विचार करावेत; चांगलं वागावे; चांगले बोलावे; शिवीगाळ, मारामाऱ्या, पसवापसवी करू नये. म्हणजे त्या चांगल्या स्मृती आकाशाच्या मनांत साठवल्या जातील. बघूया तसं वागणं आपल्याला जमतंय कां!! याचा अर्थ दुबळेपणा स्वीकारावा असा नाही. अज्ञान, असत्य आणि दुष्ट प्रवृत्ती यांच्या विरूद्ध लढा दिलाच पाहिजे!

'शंभालानंही' मानवजातीला निर्वाणीचा इशारा दिलाय की 'एकदाच काय ती निवड करा. तुम्हाला प्रकाश हवाय की अंधःकार, हृदयाची भाषा बोलणार आहात की गुद्यांची, शांती हवीय की युद्ध, ज्ञान हवंय की अज्ञान!! मानवजातीनं यातला दुसरा पर्याय म्हणजे अंधःकार, गुद्द, युद्ध आणि अज्ञान-निवडलं तर जगाचा आणि मानव जातीचा विनाश अटळ आहे!'

५५. जीव शास्त्राप्रमाणे माणसाचा तीन चतुर्थांश मेंदू अजून पशूंच्या मेंदू सारखाच आहे. मन्या, मी काय म्हणतोय ते ऐकतोयस ना?

ऐकतोय! तू बोल!

तू बोल काय? स्वर आणि प्रकाशलहरी नष्ट होत नाहीत ह शास्त्रीय सत्य तू मला सांगितलंस. मी एक सत्य सांगितलं. तुझी प्रतिक्रिया काय आहे?

माझी प्रतिक्रिया नेहमी सारखीच असणार. आज कालचे शास्त्रीय सत्य हे नेहमीच तात्पुरते सत्य असते. ज्या त्या शास्त्रज्ञाला जाणवलेलं सत्य! पुढच्या पिढीतल्या शास्त्रज्ञांनी आधीच्या संशोधनात भर

घालून मांडलेले सत्य वेगळंच असते! पहिल्यांदा माणसांची दुःख दूर करण्यासाठी ज्या भागाला दुःख होत आहे त्यावर उपचार केले जात असत. खूप काळ लोटल्यानंतर शरीर शास्त्रज्ञांना जाणवलं की शरिराची दुःखं (किंवा आजार) दूर करण्यासाठी शरिराच्या भागांचा वेगवेगळा विचार करून चालणार नाहो. संपूर्ण शरिराचा एकत्र विचार केला पाहिजे. म्हणून 'होलिस्टिक मेडिसिन्स' वापरायला सुरुवात झाली. त्यानंतर काही काळानं असं उघडकीस आलं की, बऱ्याचशा शारिरिक दुःखांचं कारण मनोव्यापाराशी निगडीत आहे. म्हणून मग 'सायको-सोमॅटिक' थेरपी सुरू झाली. आणखी काही वर्षांनी शास्त्रज्ञ असंही म्हणतील की माणसाला व्याधिमुक्त करण्यासाठी आध्यात्माचीही मदत घेतली पाहिजे.

आपल्या पारंपारिक विचारानुसार माणूस तीन प्रकारची दुःखं (ताप) भोगतो-आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक. या तीनही प्रकारच्या 'दुःखाचा' (तापांचा) विचार करून आणि त्या दुःखातून मानव जातीला मुक्त करण्यासाठी प्राचीन ऋषींनी चार वेद आणि 'आयुर्वेद' नावाचा पांचवा वेद निर्माण केला. हे पांचही वेद तीनही ताप नाहीसे करून माणसातलं माणूसपण जागं ठेवण्याचा प्रयत्न करतात.

उत्क्रांतीचं ध्येय केवळ भौतिक असतं तर तो ओघ मानवापर्यंत यऊन थांबायला पाहिजे होता. तसं झालं असतं तर पशुत्वाच्या खुणा प्रकट करणाऱ्या तीन चतुर्थांश मेंदूचे मानवच जन्माला आले असते. त्याच्यामधे सद्सद्विवेक बुद्धीचा अंशही सापडला नसता. पण पूर्ण मानवी मेंदू घेऊन जन्माला आलेली माणसं किंवा पाशवी वृत्तीवर विजय मिळवून मेंदू पूर्णपण मानवी करून घेतलेली माणसं कमी नाहीत.

'तीन चतुर्थांश पाशवी मेंदूचाच वापर करा. कारण ते एक शास्त्रीय सत्य आहे' असं सांगून माणसांतल्या हिंस्त्र प्रवृत्तीला खतपाणी घालणारे आजच्या घडीला जगात जास्त आहेत हे खरं! पण प्रत्येक माणसानेच आपल्यापुरता निर्णय घ्यायला हवा की मी माणस म्हणून जगणार आहे की नरपशू म्हणून जगणार आहे? नरपशू म्हणून जगायचे नसेल तर मानवाला स्वतःची उन्नती स्वतःच करून घेतली पाहिजे. त्यासाठी

झगडले पाहिजे. वैश्विक सत्य आणि शास्त्रीय सत्य यामधला झगडा फार पूर्वीपासून चालत आलेला आहे, तो थांबवला पाहिजे!

मन्या, सध्या जगात चाललेला संघर्ष हा त्याच प्रकारचा आहे असंच तुला म्हणाचंय ना?

किती भोळा आहेस! सध्या चालू असलेले संघर्ष हा मानवी आणि पाशवी प्रवृत्तीतला झगडा नसून, पाशवी प्रवृत्तीच्याच दोन मानवी गटातला संघर्ष आहे! गरजा पूर्ण करणारी सुख-साधने आपल्याच ताब्यात राहिली पाहिजेत, किंवा अशो साधने जिथे सापडतात तो भू-प्रदेश आपल्या प्रभावाखाली असला पहिजे यासाठी हे युद्ध चालू आहे. पण सामान्य माणसाची मात्र अशी समजूत करून देण्यात येतीय की हा दोन प्रवृत्तीतला झगडा आहे. खरे युद्ध पुढेच आहे. आणि त्यावेळी मेंदूचे पूर्ण मानवीकरण करून घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या व्यक्तिंना लपून छपून आपले अस्तित्व सांभाळावे लागेल कदाचित्!

५६. बा मना, तू संगणकावर (Computer) प्रेम करतोस की आपल्या आजोबांवर?

मन्या, वेड नाहीना लागलं तुला? कॉम्प्युटर आणि आजोबा यांची तूलना करतोस? .... तुला उत्तर हवंच असेल तर सांगतो की ऑफिसमधे गेल्यावर कॉम्प्युटरवर प्रेम करतो. आणि घरी आल्यावर आई-वडिलांवर, आजोबांवर प्रेम करतो!

हे दुटप्पी, उडवाउडवीचं उत्तर झालं!

मन्या, तुझा प्रश्नच तसा होता. तुला कळत कसं नाही. तूलना नेहमी समान गुणधर्म असलेल्या वस्तूमधे होऊ शकते. कॉम्प्युटर आणि आजोबा यांच्यात तूलना ? एक थंड, निर्जीव मशिन तर दुसरा सजीव आणि नातवासाठी तिळतिळं तुटणारं हृदय असलेला माणूस!!

मुख्य मुद्यावर बरोबर बोट ठेवलंस! पण त्या दोन्हीत एक समानता आहे. त्या दोन्ही मधे खूप माहिती (Information) साठवलेली असते. ऑफिसमधे गेल्यावर कॉम्प्युटरमधे साठवलेल्या माहितीच्या आधारे तू

निर्णय घेतोस. मग आई-वडिल-आजोबा यांनी पुरवलेली माहिती धुडकावून कां लावतोस? त्यांच्याशी भांडत कां बसतोस?

बा मना, कॉम्प्युटरमधे कोणती माहिती साठवायची, ती केव्हा अपडेट करायची. त्याचा उपयोग कुठं आणि कसा करायचा हे तूच ठरवतोस. ती माहिती परत मिळवण्यासाठी तुम्हीच प्रोग्रॅम तयार करता आणि त्या माहितीच्या आधारे तुम्हीच निर्णय घेता. सगळं काय ते तुम्हीच ठरवायचं. पण आजोबांच्याकडून मिळालेली माहिती चांगल्या वाईटांच्या कसोटीवर घासून बाहेर आलेली असते. (Processed Information ) म्हणजे एक प्रकारे तो सल्लाच असतो. तशी व्यवस्था कॉम्प्युटरमधे नसते! साठ-सत्तर वर्षात जमा झालेली माहिती क्षणाक्षणाला अपडेट करून आणि चांगल्या वाईटाच्या कसोटीवर घासून तुझ्यापर्यंत पोहचवणाऱ्या मानवी कॉम्प्युटरचा आदर करायला शीक!! अनुभवी माणसांचा आदर करणं हे चांगल्या संस्कृतीचं लक्षण आहे! कॉम्प्युटर चांगला मित्र, मदतनीस असू शकतो. तो आजोबा होऊ शकत नाही!

४७. काही बुद्धिवादी, विचारवंत असं सांगतात की निसर्गात होणाऱ्या उलथापालथींची -वादळे, आकाशात कडाडणारी वीज, भूकंप, ज्वालामुखीतून वाहणारा लाव्हारस इत्यादींची-भिती वाटल्यामुळे माणसाने देव निर्माण केला. एवढेच नाही तर ज्या गोष्टींची भिती वाटू लागली त्या वस्तूंच्या ठिकाणी सुद्धा देवत्वाची कल्पना करून त्यांची पूजा करायला सुरुवात केली. आग, झाडे, दगड, साप-नाग, पाणी वगैरेंना मानवाने देव मानले. यालाच अंधःश्रद्धा म्हणायचे.

हेच विचारवंत आता असे सांगतायत की, ‘ज्ञानाची आणि निसर्गाबद्दलच्या विज्ञानाची खूप प्रगती झाली आहे. भितीचे कारणच उरलेले नाही. मग देव धर्म पाळायची माणसाला गरजच काय? देवाला रिटायर करा.’

भारतीय विचारवंतांचे मत मात्र वेगळे आहे. देवाने ही सजीव निर्जीव सृष्टी निर्माण केली. आणि त्याच निर्मात्याच्या प्रेरणेने माणसाने देवांच्या चित्र-विचित्र आकृती घडवल्या. भितीपोटी माणसाने देव निर्माण केला हे मत धादांत खोटं आहे. अर्थात, श्रद्धा ही अंधःश्रद्धा ठरू शकत नाही.

खऱ्या खोट्याची शहानिशा करत बसण्यात वेळ खर्ची घालवू नकोस. देवावरची श्रद्धा बळकट कर. आणि तुझ्यासाठी देवाने नेमून दिलेले कर्म करीत रहा. लकाम्ते द नॉय या विचारवंताचे श्रद्धा-अंधश्रद्धा याबद्दलचे स्पष्टीकरण मनावर कोरून ठेवलेस तर श्रद्धा बळकट होण्यासाठी तुला मदतच होईल. नॉय म्हणतो- '(विज्ञानवादी) ज्या क्षुल्लक कणांवर विश्वास ठेवून समाधान मानतात ते पाहिले म्हणजे तो देखील अंधःश्रद्धेचा प्रकार वाटतो.'

५८. व्यक्तिस्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ही समाजधारणेची मुख्य तत्वे मानली तरी त्या तत्वांच्या अंमलबजावणी मुळे समाज धारणा साध्य होतेच असे नाही. कारण व्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधात राज्य व्यवस्था, समानतेच्या विरोधात स्वार्थ आणि अहंकार, आणि विश्व बंधुत्वाच्या विरोधात गट निष्ठा (यात गटपूजापद्धती, गट संस्कृती, गट संहाराची भिती इ. भाव-भावनांचा समावेश होतो.) काम करत असतात.

इतर देशातल्या व्यवस्थांच्या अभ्यासकांनी त्या समाजातले दृश्य गुण आणि भारतीय समाजातला डोळ्यात खुपणारा जाती व्यवस्थेसारखा दुर्गुण यांची फक्त तूलना करून भारतीय समाज व्यवस्थेला लाथाडायाला सुरवात केली. पण पाश्चात्य समाजाचा अतिस्वातंत्र्यामुळे होत असलेला ऱ्हास, ब्रिटिश समाजातल्या अनौरस (bastard) युवकांची समस्या, साम्यवादी देशात वर्ग विग्रहाच्या अतिरेकी कल्पनेमुळे तिथल्या समाज घटकांचे झालेले शोषण आणि शिरकाण; मुस्लीम आणि अरब देशात पिसाटलेली धर्मांधिता वगैरे बाबतीत आपल्याकडल्या विचारवंतांनी कधी तोंड उघडल्याचे ऐकिवात नाही.

मानसशास्त्रीय दृष्टीनं पाहिले तर प्रत्येक माणूस स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी किंवा विशिष्ट ध्येय गाठण्यासाठी धडपड करत असतो. शिवाय व्यक्ति व्यक्तींचा मिळून समाज बनतो आणि प्रत्येक व्यक्ति

स्वतंत्रपणे धडपड करत असते या गोष्टी खऱ्या मानल्या तर एकसंध समाजाचे चित्र डोळ्यासमोर उभे राहूच शकत नाही. त्यामुळे व्यक्ति स्वातंत्र्य, समता, विश्व बंधुत्व, समाजवाद, मानवतावाद इ. शब्दांना अर्थच रहात नाही!!

हजारो वर्ष, वैचारिक आणि राजकीय आक्रमणे झेलूनही भारतीय समाज टिकून राहिला त्याचं एकच कारण म्हणजे 'पिंडाचा आणि ब्रह्मांडाचा' संबंध असतो आणि ब्रह्मांडाचा चालक-परमेश्वर-अंशरूपानं सजीव-निर्जीव वस्तूत उपस्थित असतो ही कल्पना!! व्यत्ति आणि वस्तूमात्रात बसलेल्या त्या परमेश्वराची ओळख पटली की सगळा समाज एकसंध दिसू लागतो. याला वाटल्यास आपण आध्यात्मिक समाजवाद असे नांव देऊ या. व्यक्तीला आणि वस्तूला आपला अंश देऊन उच्च पातळीवर नेणाऱ्या परमेश्वराला रिटायर करून कसे चालेल?

५९. मनुष्य आणि काम करणारे पशु यांनी दिवसभर काम केलं आणि रात्रभर विश्रांती घेतली की त्यांची काम करण्याची शक्ति (Energy) पुन्हा पूर्वीच्या पातळीवर येऊन स्थिरावते असा सामान्य अनुभव आहे. अर्थात याला आजारीपणाचा अपवाद आहे. पण भारतीय विचारवंतांनी हे दोन शक्तिस्त्रोत जपून ठेवणं आणि त्यांचा काटकसरीने वापर करणे (Conservation & economic use of energy sources) या दोन तत्वांवर आधारित अशी आर्थिक आणि सामाजिक रचना केली आणि राबवलीही. प्रत्येक व्यक्तीला वाटेल ते काम करण्याचे आणि पैसा कमावण्यासाठी सोळा-सोळा तास राबण्याचे स्वातंत्र्य त्या काळात नव्हते. त्याच्याच जोडीला, उपभोगाला मर्यादा घालण्याचे, मिळेल त्यात समाधान मानण्याचं आणि गरजू व्यक्तींना दान (मदत) देण्याचे शिक्षणही समाजाला दिले जात होते. या सगळ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजे त्या काळात देशात सुखसमृद्धी आणि शांती नांदत होती. दुसऱ्या कुठल्याही देशात अशाप्रकारे उर्जास्त्रोतांची जपणूक, कामाची विभागणी, आणि उपभोगावर मर्यादा घालण्याचे शिक्षण या तत्वांची सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात अंमलबजावणी झाल्याचे दिसत नाही. परकीयांचे अनुकरण करण्याच्या हव्यासापोटी

व्यवसाय धंदा करण्याचं स्वातंत्र्य, अमर्याद पैसा गोळा करण्याची आणि उपभोगाची लालसा या गोष्टींना चालना मिळाली. 'धडधाकट आहेस, काम करून पोट कां भरत नाहीस' अशी हेटाळणी करून गरजूला मदत करणे बंद झाले. त्यामुळेच आपल्या देशात ऊर्जा शक्तिची चणचण, अमर्याद स्पर्धा आणि आर्थिक सामाजिक क्षेत्रात आज अशांतता पसरलेली दिसत आहे.

म्हणूनच अलिकडल्या एका विचारवंताने असे मत मांडलय की, 'भविष्यकाळात एकदा वापरल्यानंतर संपून जाणाऱ्या ऊर्जास्त्रोतापेक्षा, स्वतः टिकून राहणाऱ्या आणि पुन्हा निर्माण करता येणाऱ्या (Self sustaining & renewable) ऊर्जास्त्रोतांवर आधारलेली सभ्यता (Civilization) पुन्हा उदयाला येईल.'

बा मना, ती नवी सभ्यता आपल्या प्राचीन विचारवंतांनी मांडलेल्या कामाची वाटणी, उपभोगावर मर्यादा आणि दान या तीन तत्वावर आधारित नसेल ना? बघू काय होतंय ते!!

६०. मन्या, गेल्या काही शतकांत मानवजातीने घोडचुकाच केल्या कारे?

अगदी तसंच म्हणता येणार नाही. पण मानवजातीला ज्यावेळी जाणीव झाली की आपण स्वतःच्या बुद्धीने काही निर्णय घेऊ शकतो, वेगळ्या दृष्टीने सजीव-निर्जीव सृष्टीकडे बघू यकतो त्या वेळेपासून आपल्याला पारंपारिक ज्ञानाची आणि सृष्टीची गरज नाही असेच वाटू लागले. विज्ञानाचा उदय त्याच सुमारास झाला आणि तेव्हापासून एक एक समस्या निर्माण होऊ लागल्या. कालांतराने त्या समस्यांनी गंभीर रूप धारण केले!

शेतीचंच बघ ना. शेतीचे उत्पन्न दुप्पट झाले. हरितक्रांती केल्याबद्दल मानवजातीनं टाळ्या पिटल्या! धरणं-कालवे बांधून, संकरित बियाणे तयार करून; किडीपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी कीटकनाशक द्रव्ये तयार करून, रासायनिक खते वापरून ही हरितक्रांती करण्यात आली. पण कालव्याच्या बाजूच्या सुपीक जमिनीत क्षार साठवले जाऊन त्या नापीक झाल्या; संकरित बियाणांतले गुणधर्म टिकेनासे

झाले; रासायनिक खते आणिक कीटक नाशके माणसाच्या जीवनालाच घातक ठरू लागली. त्यावेळी शेतकरी गडबडून गेले आणि पुन्हा पारंपारिक शेतीचे (जैविक शेतीचे) प्रयोग करू लागले.

त्याच संदर्भात बोलायचं तर मानवानं निसर्गावर विजय मिळवला हा बुद्धिवाद्यांचा उन्माद आता हळुंहळु ओसरूं लागला आहे. पारंपारिक ज्ञानाशी आणि निसर्गाशी पुन्हा तडजोड करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

बा मना, वैज्ञानिक प्रयोगातून मिळालेलं ज्ञान गणिताच्या भाषेत आणि प्रयोग पातळीवर सिद्ध झाले म्हणून ते स्वीकारण्यात अर्थ नाही. परिणामांच्या पातळीवर सुद्धा ते सिद्ध झाले पाहिजे. शास्त्रीय ज्ञान जीवसृष्टीला घातक ठरले तर ते टाकून देण्याचो मानवाने तयारी ठेवली पाहिजे.

६१. परस्पर विरोधी कल्पनांनी, तत्वांनी आणि त्यांच्यामागे असलेल्या शक्तींनी ठासून भरलेल्या विश्वात अमुक खरे आणि तमुक खोटे याचा निर्णय कुणी आणि कसा करायचा? सृष्टीच्या आरंभापासून परस्पर विरोधी कल्पना जगाचा पाठलाग करीत आहेत किंवा असंही म्हणता येईल की विरोधी कल्पनांच्या तुलनेनेच मूळ कल्पना सिद्ध करता येते. देव आहे तिथे दानव (राक्षस) आहेत; जन्म आहे तिथे मृत्यू आहे; सुख आहे तिथे दुःख आहे; कुरूपतेच्या संदर्भातच सौंदर्य सिद्ध करता येते. गरिबीकडे बोट दाखवल्याशिवाय श्रीमंतीचा टेंभा मिरवता येत नाही.

या सापेक्षतेचा अधिक शोध घेऊन आपल्या पूर्वजांनी क्षणोक्षणी बदलणाऱ्या आणि शेवटी नष्ट होणाऱ्या सजीव-निर्जीव सृष्टीकडे त्याच्या जोडीला काहीतरी शाश्वत असलेच पाहिजे, दृश्य आणि नश्वर सृष्टीच्या बरोबरच अदृश्य आणि शाश्वत सृष्टी असली पाहिजे असा सिद्धांत मांडला. विज्ञानाने मांडलेला सापेक्षतेचा सिद्धांत मान्य करणारे बुद्धीवादी, विचारवंत ही सापेक्षता कां नाकारतात हे न उलगडणारे गूढ आहे.

सहअस्तित्वाचा किंवा एका कल्पनेच्या अस्तित्वावरून तिच्या तूलनेत दुसरी कल्पना अस्तित्वात येते हा सिद्धांत भारतीय आणि चिनी विचरवंतांना फार पूर्वीपासन् माहीत होता. इ.स.पूर्वी तिसऱ्या शतकांत होऊन गेलेल्या लाओत्सेने 'ताओ ते चिंग' (ताओ तेह किंग) या उपनिषदाच्या दुसऱ्या अध्यायात त्या सापेक्षतेची किंवा सहअस्तित्वाची चांगली उदाहरणे दिली आहेत. लाओत्से म्हणतो-

१. सर्व जगाला सौंदर्याचा बोध होतो, तेव्हा कुरूपता अस्तित्वात असते.

२. जेव्हा सर्व जग चांगुलपणा ओळखते, तेव्हा दुष्टपणा अस्तित्वात असतो.

३. अशाचं तऱ्हेने अस्तित्व, अनास्तित्वाचे सूचक आहे.

४. सोप्यातून अवघड उगम पावते.

५. लांबीशी तूलना केल्याशिवाय आखूडाचा बोध होत नाही.

लाओत्सेला जे सांगायचंय् ते तो सुटसुटीत सूत्राच्या भाषेत सांगतो. त्यातला सूचक अर्थ समजावून घेतला की लाओत्से महान तत्वचिंतक वाटतो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, अस्तित्वात आलेल्या सजीव-निर्जीव गोष्टी किंवा घटना या एकेकट्या जन्माला येत नाहीत, किंवा घडत नाहीत. परस्पर संबंध किंवा तूलना केल्याशिवाय त्यांचे नीट आकलन सुद्धा होत नाही. म्हणून दृश्य जगाच्या बरोबर अदृश्य विश्व अस्तित्वात असते आणि अदृश्य विश्वात घडणाऱ्या घटनांचा दृश्य जगातल्या घटनांशी संबंध असतो ही गोष्ट मान्य करावीच लागते.

६२. मन्या, तू ब्राँझची नटराजाची मूर्ती घेऊन आलायस? मला सांगितलं पण नाहीस! काय सुंदर मूर्ती आहे रे!

तू माझ्याकडं येशील तेव्हा तुला दिसेलच, म्हणून सांगितले नाही एवढेच! ते जाऊ दे. त्या मूर्तीचं महत्त्व मी सांगत बसलो तर पुन्हा माझ्यावर चिडशील!

त्यात चिडण्यासारखं काय आहे? मूर्ती सुरेखच आहे. तुझ्या हॉलमध्ये ठेवलीयस.

हॉलची शोभा आणखीन वाढवण्यासाठी आणलेली नाही ही शंकराची मूर्ती! या मूर्तीच्या प्रत्येक भागाला फार मोठा अर्थ आहे. ही मूर्ती सबंध विश्वात चालू असलेल्या परमाणू पातळीवरच्या नृत्याचे प्रतीक आहे!

काय? अणू-परमाणू नृत्य करतात? मी थोडं हसूं कां?

आधी या रूपकाचा अर्थ समजावून घे. मग वाटल्यास हस! या शंकराला चार हात आहेत. मागच्या उजव्या हातात डमरू आहे आणि डाव्या हातात ज्वाला आहे. डमरू हे विश्वाच्या निर्मितीच्या वेळी झालेल्या ध्वनीचे प्रतीक आहे, तर ज्वाला विनाशाचे प्रतीक आहे; पुढचे दोन्ही हात, नाचताना शिवाचा तोल सांभाळणारे नाहीत फक्त, तर जन्म-मृत्यूचा समतोल सांभाळणारे आहेत; डाव्या हाताचे बोट खाली वळलेले आहे आणि ते उचललेल्या पायाकडे निर्देश करते! ही स्थिती मायेच्या प्रभावातून बाहेर पडण्याचे सूचक आहे; शिवाच्या चेहऱ्यावरचे भाव पहा. शांतता आणि तटस्थता यांचा सुंदर संगमच झाला आहे चेहऱ्यावर. ती शांतता आणि तटस्थता जन्म मृत्यूच्या द्वंद्वापलिकडे गेल्याची खूण आहे; विस्फारलेला केशसंभार हे जडामधे चेतना निर्माण झाल्याचं प्रतीक आहे; मूर्तीभोवती एक वर्तुळ आहे. ते अर्थातच शिव तत्व आणि त्याचे नृत्य संपूर्ण विश्व व्यापून टाकणारे आहे असेच सूचित करणारे आहे.

ए.के.कुमारस्वामी यांनी त्यांच्या 'शिवाचं नृत्य' (The dance of Shiva) या पुस्तकांत म्हटलंय की 'कोणत्याही कलेनं किंवा धर्मानं देवाच्या कार्याचा सार्थ अभिमान बाळगावा अशीच शिव-नृत्याची प्रतिमा आहे....' (एका अर्थानं) शिवाचे नृत्य म्हणजे विश्वाचे नृत्य आहे ज्यातून अखंड वाहणाऱ्या ऊर्जा प्रवाहाचे अनेक नमुने (आकृतीबंध) तयार होतात आणि (शेवटी) एकमेकात मिसळून, विरघळून जातात.

कुमारस्वामींच्या मतांवर अधिक स्पष्टीकरण करताना डॉ. फ्रिट्जोफ काप्रा म्हणतात की 'आधुनिक पदार्थ विज्ञानाने आता हे स्पष्ट केले आहे की (भौतिक विश्वातला) प्रत्येक परमाणू ऊर्जेच्या नृत्याचा केवळ

प्रयोग करतो असे नाही तर निर्मिती आणि विनाश यांची (नाडीच्या ठोक्यासारखी) अखंड धडपड चालू असते आणि शिवाचे नृत्य हे त्याचेच प्रतीक आहे.'

बा मना, तुला परमाणू पातळीवर चालू असलेल्या वैश्विक नृत्याबद्‌दल सविस्तर आणि शास्त्रीय स्पष्टीकरण जाणून घ्यायच असेल तर डॉ. काप्रांच्या 'ताओ ऑफ फिजिक्स' या पुस्तकातला १५० वा चॅप्टर वाचून काढ. आणि त्याच पुस्तकात छापलेली शंकराची सहा चित्रं बघ. अरेऽऽ अरेऽऽ, एकाएकी कुठे निघालास? अरे कुमारस्वामी आणि डॉ.काप्रा शेवटी काय म्हणतायत् ते तरी ऐकून जा. ते म्हणतात 'अशाप्रकारे वैश्विक नृत्याचे रूपक पौराणिक कथा, धार्मिक कलाप्रकार आणि आधुनिक पदार्थ विज्ञान (यांना) एकरूप करून टाकतात. ते (रूपक) काव्यात्मक असले तरीही विज्ञानच आहे!!'

६३. मानवी उत्क्रांतीच्या पाठीमागे काही घटक, कारणं काम करीत असतात. त्या कारणांमुळेच सुधारणा होत होत मानव जात आजच्या टप्प्यापर्यंत येऊन पोहचली आहे. ती कारणे म्हणजे परिवर्तन, भोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची वृत्ती, नैसर्गिक निवड, आणि वंशपरंपरा वाढवण्याची ओढ! डार्विनने सांगितलेली ही कारणे खरी मानली तर आपल्याला असे आढळून येते की यातील कोणतेच कारण माणसांच्या हातात नसते! म्हणजे ही सगळी कारणे निसर्गतः अस्तित्वात येतात आणि आपापला प्रभाव मानवी वंशावर पाडतात.

मानवी बुद्धी हळू हळू विकसित होत गेली; बुद्धीचा विकास एका विशिष्ट पातळीवर पोहचला; उत्क्रांतीच्या टप्प्याचे आणि त्याच्या मागच्या कारणांचे ज्ञान झाले! त्यानंतर मानवाने त्या कारणांना अधिक चालना देऊन उत्क्रांतीचा वेग वाढवायचा प्रयत्न केला तर बिघडले कुठे? तोच खरा बुद्धिवाद नाही कां?

म्हणून भारतीय परंपरेनं उत्क्रांतीच्या कारणात बदल करून समाजाला त्या बदलांचा पाठपुरावा करायला लावला असं म्हटलं तर चूक होणार नाही. हे बदल मुख्यतः दोन घटकांत केले गेले. नैसर्गिक निवडी

ऐवजी बुद्धिपुरस्सर निवड आणि नैसर्गिक परिवर्तनाच्या जागी 'संस्कारातून परिवर्तन' असं त्या बदलांचे स्वरूप होते.

आपल्या जोडीदाराची काही निकष लावून बुद्धिपुरस्सपर निवड केली नाही किंवा संस्कारातून परिवर्तन घडून येते हेच अमान्य केले की, कशा प्रकारचा मानवी समाज निर्माण होतो ते आज आपण पाहतोच आहोत! विज्ञानाची प्रगती म्हणजेच उत्क्रांतीचा पुढला टप्पा असे मानणाऱ्या निर्बुद्धांना या पारंपारिक बुद्धिवादाचे मर्म कुणी समजावयाचे? आणि समजावण्याची गरज तरी काय? आधुनिक बुद्धिवाद्यांना खुशाल परागतीकडे प्रवास करू दे पारंपारिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचे मर्म जाणून घेऊन आपण आपली वाटचाल सुरूच ठेऊया!!

६४. एकादी वस्तू किंवा व्यक्ती, दिव्याच्या (Source of Light) जसजशी जवळ जाते तसतशी त्या वस्तूची किंवा व्यक्तिची काळी सावली मोठी मोठी होत जाते. कधीकधी ती संपूर्ण दिव्याला झाकोळून टाकू शकते. पण माणसाचा अहंकार आणि देव (Source of inner light) यांच्या बाबतीत नेमका उलटा प्रकार घडतो. माणूस देव या कल्पनेच्या जितका जवळ जातो तितकी त्याच्या अहंकाराची सावली छोटी होत जाते, असे मानसशास्त्र सांगते. आपल्या परंपरेची तशी श्रद्धा आहे की, माणूस जसजसा देवाच्या जवळ जातो तसतसा त्याचा व्यक्तिगत अहंकार (म्हणजे काळी सावली) कमीकमी होत जातो! आहे की नाही उलटा प्रकार? एवढेच नाही, देवाच्या जवळ जाताजाता असा एक क्षण येतो की फसवी सावली पाडणाऱ्या अहंकाराचे-देहबुद्धीचं -भान नाहीसे होते. त्यालाच 'अद्वैत' किंवा 'प्रकाशात विरून जाणे' असं म्हणायला हरकत नाही.

प्रकाश आणि सावली, देव आणि अहंकार यांची केलेली तूलना कुणाला पटणार नाही, कुणाला आवडणार नाही. पण त्याने तुला मला काही फरक पडत नाही. तथाकथित विद्वान आपले विचार ऐकून सुद्धा

घेत नाहीत. समन्वय साधणाऱ्या विचारांची टिंगल टवाळीच करतात. मग त्यांचे विचार झिकारण्याचे स्वातंत्र्य आपल्याला आहेच!!

६५. बा मना, या पुस्तकाच्या ३४ व्या परिच्छेदात बुद्धीवादी आणि सुधारणावादी लोकांना पुढं करून भांडवलदारांनी सामान्य ग्राहकाची कशी पिळवणूक केली ते आपण समजावून घेतले. त्या वृत्तीपुढे सगळ्यांनीच गुडघे टेकलेत! त्या वृत्तीचे पुढले पाऊल म्हणजे 'डंकेल प्रस्ताव' आणि त्याचीही सुधारुन वाढवलेली आवृत्ती म्हणजे 'जागतिक व्यापार संघटना' (World Trade Organisation) विकसनशील आणि अविकसित देशांच्या नैसर्गिक साधन संपत्तीचं शोषण करण्यासाठी प्रगत राष्ट्रांनी रचलेला चोख कट आहे तो! हळद आणि बासमती तांदुळाचे पेटंट देण्याच्या प्रश्नावर भारताला आकाशपाताळ एक करावे लागले होते हा ताजा इतिहास आहे.

व्यापार संघटनेचे सगळे लक्ष नैसर्गिक साधनसंपत्ती बरोबरच भारतातल्या 'गृहस्थांनी' केलेल्या बचतीवर आहे. भारतातल्याच एका महान अर्थशास्त्रज्ञाचे म्हणणं आहे की, 'भारतातल्या कुटुंब प्रमुखांनी (गृहस्थांनी) १९८० ते १९९२ या बारा वर्षांत केलेली बचत अंदाजे सहा पूर्णांग छपन्न दशांश लक्ष कोटी (६.५६ लक्ष कोटी) तर सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांनी केलेली बचत प्रत्येकी अठ्ठ्यांशी हजार कोटी आणि ब्यायंशी हजार कोटी होती (८८ हजार कोटी आणि ८२ हजार कोटी)'.

गृहस्थांनी केलेल्या या प्रचंड बचतीवर डंकेल प्रस्तावाचा आणि नंतर जागतिक व्यापार संघटनेचा डोळा होता आणि आहे. या बाबतीत अनेक अर्थशास्त्रज्ञांनी उलटसुलट मते मांडली आहेत. पण श्री.जगदीश भगवती म्हणतात की, 'भारतातल्या गृहस्थांची बचतीची सवय मोडली नाही तर ते औद्योगिक उत्पादनाला मदत न करणाऱ्या- घर, जमीन, सोनं वगैरे - गोष्टीत गुंतवणूक करत राहतील. त्यामुळं चलनवाढ व्हायची ती होतच राहील! पण गृहोपयोगी वस्तूंच्या उत्पादनाला चालना मिळणार नाही. म्हणून भारतीय 'गृहस्थांना'

त्यांची बचत भाड्याच्या घरात राहून वातानुकूल यंत्रे आणि धुण्याच्या यंत्रावर खर्च करायला लावली पहिजे'! केवढा मूलगामी विचार आहे हा!

भारतीय मजदूर संघासाठी प्रसिद्ध केलेल्या 'स्वदेशी' या पुस्तकात श्री.एस. गुरूमूर्ती या अर्थतज्ञाने श्री.भगवतीच्या विचारांना समर्पक उत्तर दिलं आहे. त्याचा सारांश असा की, 'एका व्यक्तीला भारतात रोजगार मिळतो म्हणजे त्या कुटुंबाला रोजगार मिळतो. गृहस्थ आपल्या कुटुंबातील अनेकांची जबाबदारी मोठ्या आनंदाने स्वतःवर घेतो. या उलट पाश्चात्य सरकारांच्या खजिन्यातला बराचसा पैसा आरोग्य विमा, बेकारी भत्ता आणि वृद्ध वेतन या खात्यांवर खर्च होतो. आपल्या कडल्या कमावत्या आणि बचत करणाऱ्या 'गृहस्थांनी' त्यांच्यावर अवलंबून असलेल्या बेकार, अपंग आणि म्हाताऱ्या नातलगांची जबाबदारी सरकारवर टाकायची असे ठरवले तर सरकारला पळ काढावा लागेल.' मग ते सरकार कुठल्याही पक्षाचं असो!!

आज अनेक देशातल्या शासन संस्था जागतिक व्यापार संघटनेच्या आणि त्यांनी तयार केलेल्या नियमांच्या कात्रीत सापडल्या आहेत. सरकारी आर्थिक ध्येय धोरणे त्या नियमानुसार बदलली जात आहेत. उदारिकरणाच्या नावाखाली स्पर्धा, नोकर कपात, कामगार कायद्यात बदल, अनुदानात कपात, परकीय भांडवलाला निमंत्रण, परवानाराज्य काढून टाकण्याचा प्रयत्न, बचतीवरील व्याजाच्या दरात घट आणि अनेक क्षेत्रात केल्या जाणाऱ्या आर्थिक घोटाळ्याकडे दुर्लक्ष अशी धोरणे राबवली जात आहेत. हेतू का की 'गृहस्थ' सर्व बाजूंनी गांजला गेला की त्याला त्याची बचत मोडावी लागेल, आणि तोच पैसा जास्त उत्पन्न देणाऱ्या योजनांत किंवा उत्पादन क्षेत्रात गुंतवावा लागेल, किंवा जगण्यासाठी खर्च करावा लागेल. त्यामुळे वस्तूंच्या उत्पादनाला आपोआप चालना मिळेल!

पण सरकारची आणि उद्योगपतींची इच्छा पूर्ण होईल असं वाटत नाही. कारण 'चादर पाहून हात पाय पसरावेत' असे संस्कार भारतीय गृहस्थाच्या रक्तात इतके भिनलेले आहेत की, तो एका मर्यादेपलिकडे चंगळवादाकडे वळणार नाही. एका पाहणीत असे आढळून आलंय की, अमेरिकेतल्या चंगळवादी

'गृहस्थांनी' क्रेडिट कार्डाचा वापर करून पुढल्या एक दोन वर्षाचं उत्पन्न (पगार) आधीच खर्च करून टाकलंय!! भारतीय 'गृहस्थ' अशी उधळपट्टी कधीच करणार नाही.  कारण कमाई, खर्च आणि बचत याचं त्रैराशिक त्याच्या मनात पगार व्हायच्या आधीच तयार असते.

ऑक्टोबर २००१ ते मार्च २००२ या सहामाहीसाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेने आपले पत धोरण जाहीर केल्यावर उद्योगपतींनी टाळ्या पिटल्या. पण पारंपारिक 'गृहस्थ' गालातल्या गालात हसला फक्त!! कारण औद्योगिक तेजी-मंदी त्याच्या हातात आहे हे त्याला आता कळून चुकलंय!!  तो गृहस्थ अजून आपली बचत सांभाळून आहे. म्हणूनच दोन महिने झाले तरी शेअर बाजारातली घसरण, उलथा पालथ थांबलेली नाही!!

६६.   जनुकात (Jenes) बदल करून आपण मनुष्य प्राण्याच्या जडणघडणीत आणि माणसाच्या मनोव्यापारात बदल घडवून आणू शकतो कां? विनोदाचं इंद्रीय शाबुत असलेल्या एका शास्त्रज्ञानं हा प्रश्न उपस्थित केलाय आणि त्याचं उत्तरही दिलंय. तो म्हणतो की 'गाईसारखं पोट (पचनसंस्था) असलेले मानव आपण जन्माला घालावेत कां? याचं उत्तर होय असंच आहे. कारण मग अशी माणसं हिरवा चारा आणि गवत पचवूं शकतील आणि अन्नधान्याचा प्रश्न चुटकीसरशी सुटेल!!'

आणखी एका वैज्ञानिकानं या समस्येचा जरा गंभीरपणे विचार करून वेगळे प्रश्न विचारलेत. 'आपण (विज्ञानाच्या माध्यमाद्वारे) कामाच्या स्वरूपाप्रमाणे कामगारांच्या शरीर रचनेत बदल करावा कां? उदाहरणार्थ, विमान चालकांमधे प्रतिक्षेपित क्रिया (Reflective actions) जलद घडवणे किंवा कंटाळवाणी कामे करण्यासाठी मानवाच्या मेंदूत योग्य ते बदल घडवून आणणे. तसे झाले तर माणूस कंटाळणारच नाही कां? खालच्या दर्जाची माणसे नष्ट करून माणसांची श्रेष्ठ जात तयार करावी का?' 'क्लोन' पद्धतीने लढवय्ये तयार करावेत कां? किडनी, लिव्हर, लंगज् या सारखे राखीव अवयव तयार करून

त्यांची सेव्हिंग्ज बँक काढावी कां? वगैरे. या प्रश्नांच्या रोखातच त्यांची नकारात्मक उत्तरं सामावलेली आहेत! पण वैज्ञानिक आपले काम थांबवणार नाहीत.

ज्यावेळी नव्या शोधाचा व्यापार शक्य होतो त्याचवेळी नव्या ग्राहक वर्गाच्या गरजा लक्षात घेऊन नवी बाजारपेठही तयार करता येते.

या संदर्भात आल्विन टॉफलरचं मत विचार करण्यासारखं आहे! टॉफलर म्हणतो- 'जीव तंत्रज्ञानाची (Biotechnology) कशी प्रगती होईल हे छातीठोकपणे सांगणे कठीण आहे. आपण फक्त (जनमत तयार करून) त्या तंत्रज्ञानाची अंमलबजावणी, त्याचा जगभर प्रसार, विविध व्यापारी आणि वैज्ञानिक प्रयोग शाळांतील चुरस, याविरुद्ध लढा देऊ शकतो. (Third wave)'

बा मना, विज्ञानाने जन्माला घातलेले राक्षस माणसांवरच उलटण्याच्या आधीच त्यांना आवर घालण्याचे प्रयत्न अणु विज्ञानाच्या प्रसाराच्यावेळी सुद्धा झाले होते. त्याचे काय झाले? निर्बंध घालण्याचा प्रयत्न होतो त्याचवेळी आंतरराष्ट्रीय समुदायाच्या मताला धुडकावून लावण्याचेही प्रयत्न सुरु होतात. आज मार्थोफरु देशांनी आणि दहशतवादी गटांनी अण्वस्त्रांनी सज्ज होऊन सर्व जगापुढेच संकट उभे केले आहे!!

बा मना, ज्या गोष्टीचे ज्ञान झाले आहे त्याचा उपयोग न करण किंवा ते ज्ञान अज्ञानात परिवर्तीत करणे केवळ अशक्य आहे!! अहंकारी आणि विस्तारवादी राज्यकर्ते तसे करूही देणार नाहीत. त्यामुळे घुसमटून टाकणाऱ्या आजच्या अराजकसदृश्य परिस्थितीमुळे जन-प्रतिनिधीबद्दल लोकांच्या मनात इतका कडवटपणा उफाळला आहे की, यापुढे आपले प्रतिनिधित्व कुणीच करू शकणार नाही अशी सामान्य माणसाची खात्री पटली आहे. आणि म्हणूनच तो दहशतवादाचे कळत नकळत समर्थन करू लागला आहे किंवा अराजकतेकडे डोळेझाक करू लागला आहे! अर्थात, जीवतंत्रज्ञानाचे पुढे काय होणार ते स्पष्टच आहे!!

६७. बर्ट कॉस्को, लॉस ॲन्जेलिसचा रहिवासी, मॅथ्स् आणि इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग या विषयातला पदवीधर, १९९३ मधे युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियात इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या विषयाचा असोसिएट

प्रोपसर म्हणून काम करत होता. त्यानं ‘पझी थिंकिंग’(Fuzzy Thinking) नावाचं पुस्तक लिहीले आणि अमेरिकेतल्या विज्ञान क्षेत्रात आणि वैज्ञानिकांत एकच खळबळ माजली. बऱ्याचशा वैज्ञानिकांनी त्या पुस्तकावर उलटसुलट प्रतिक्रिया नोंदवल्या. पण प्रो. विल्यम कॅहन यांची प्रतिक्रिया पार बोलकी होती. ते म्हणतात ‘पझी लॉजिक विज्ञानाला बधीर करून टाकणारे द्रव्य आहे’ (Fuzzy Logic is the cocaine of science) प्रो. कॅहन म्हणतात ते खरंच आहे. त्या पुस्तकांतले कांही विचार तथाकथित बुद्धिवाद बधीर करून टाकणारे आहेत.

पुस्तकाच्या प्रस्तावनेतले पहिलेच वाक्य आहे की, ‘एक दिवस मला कळून चुकलं की विज्ञान खरं नाही....विसाव्या शतकातल्या त्या देवाच (विज्ञानाचं) देवत्व संपलं आहे.....’

विज्ञान आणि वैज्ञानिकांबद्दलची इतर विधानं अशीच आक्रमक आहेत.

‘आपल्या विज्ञान, गणित, तर्कशास्त्र आणि संस्कृतीने असे गृहीत धरलं आहे की, विश्व काळ्या किंवा गोऱ्या रंगाचे आहे. आणि त्यात बदल होत नाही.’(पृष्ठ ५) (पण) ‘विज्ञानान विश्वाबद्दल केलेले प्रत्येक विधान खरे किंवा खोटे असतं.’....‘ॲरिस्टॉटलचे दुहेरी तर्कशास्त्र (Binary Logic) एकाच सिद्धांतावर बोट ठेवतं-हे किंवा ते (A or Not A)’(पृष्ठ ६) ‘पण ॲरिस्टॉटलच्या आधी जवळजवळ दोनशे वर्ष महात्मा गौतम बुद्धानं ॲरिस्टॉटलच्या तर्कशास्त्राला आधीच धक्का दिला होता. आणि (जगाकडे) ‘हे किंवा ते’ ऐवजी ‘हे आणि ते’ च्या रूपात पाहण्याची दृष्टी दिली होती. म्हणजेच जग जसे आहे तसे पाहण्याची वास्तववादी दृष्टी दिली होती. म्हणजेच जग जसे आहे तसे पाहाण्याची वास्तववादी दृष्टी दिली. (तेव्हापासून) विसंगतीने भरलेल्या जगाकडं पाहता येऊ लागले’ (पृष्ठ ६) ‘विज्ञानाने केलेली’ वास्तवा बद्दलची विधाने ही पूर्ण सत्य किंवा पूर्ण असत्य  नसतात. त्यातले सत्य दोन्हींच्या मधे कुठंतरी-१ व ० च्या मधे कुठंतरी असते.’(पृष्ठ ८)

बा मना, बर्ट कॉस्को एक आणि शून्य या दोन अंकांमधल्या वास्तवाला करडं (ग्रे) किंवा एकापेक्षा जास्त शक्यतांनी (multi valent) भरलेले वास्तव म्हणतो. या अनेक शक्यता जाणून घ्यायच्या आहेत ? किंवा करड्या विश्वात भरारी मारायची आहे?

६८. ॲरिस्टॉटलनं विश्वाबद्दल मांडलेल्या 'हे किंवा ते' या सिद्धांताचा आधार घेऊन पूर्वीच्या वैज्ञानिकांनो ईश्वराचे अस्तित्व नाकारले. कारण आपल्याला विश्वाच्या निर्मितीचे कोडे उलगडले आहे अशी त्यांची खुळी समजूत होती. हे विश्व असंख्य भौतिक अणूपासून बनलेले आहे असे समजल्यावर देवाने विश्वाची निर्मिती केली या गोष्टीवर विश्वास ठेवण्याचे कारणच उरत नाही. आपल्या कडल्या शास्त्रज्ञ, बुद्धीवाद्यांनी पाश्चात्य विद्वानांची री ओढली आणि देवाला रिटायर करा असा प्रचार सुरु केला.

या आधीच्या ६२ व्या परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणं विज्ञान एका मुद्यावर स्थिरावलेले नाही. अणूनंतर रेणूंचा अभ्यास झाला, त्यानंतर परमाणूंचा अभ्यास झाला. परमाणूंच्या पातळीवर प्रत्येक कण अन् कण वैश्विक नृत्यात भाग घेत असतो आणि ऊर्जा प्रवाहाचे अनेक आकृतिबंध (Paterns) तयार करत असतो. या आकृतीबंधातून नृत्य करणाऱ्या शंकराचा आकार आणि गुण स्पष्ट होतात हे ही आता उघड झालंय!

पण ही वस्तुस्थिती शास्त्रज्ञ मान्य करणार नाहीत. कॉस्कोच्या म्हणण्याप्रमाणे 'शास्त्र' आणि 'शास्त्रज्ञ' यांच्यात गोंधळ, घोटाळा करू नये (फझी थिंकिंग पृष्ठ ४०) कारण शास्त्राला ओढ असते सत्य जाणून घेण्याची, तर शास्त्रज्ञांना ओढ असते पैसा, किर्ती, गौरव आणि पुरस्कार मिळवण्याची!!

कॉस्को पुढं म्हणतो 'शास्त्रज्ञ, रोजकीर्दीच्या आधारे तयार केलेले लेख, पाठ्यपुस्तके, निबंध, बैठकीचे इतिवृत्त, सॉफ्टवेअर आणि कधी कधी हार्डवेअर मागे सोडतात आणि धनादेश, व्यावसायिक बक्षिसे, भाषणानंतर मिळणारे कौतुक/भाषणाचे मानधन, सल्ला दिल्याबद्दल मिळालेले चेक्स, कंपन्यांनी दिलेले शेअर्स, आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणज (कर्तृत्वाचा) अभिमान, गर्व घरी घेऊन जातात.'

बा मना, फझी लॉजिक वापरून तयार केलेल्या यंत्र सामग्रीला व्यावसायिक यश मिळालं, ‘स्मार्ट यंत्रं’ तयार होऊन बाजारात विकली ही जाऊ लागली, म्हणून ‘फझी थिंकिंग’ हा विषय सध्या चर्चेत तरी आहे. तसं यश मिळालं नसतं तर पारंपारिक वैज्ञानिकांनी फझी थिंकिंगचा ते खोटं आहे, विज्ञानाच्या कसोटीवर उतरणारं नाही. त्यात विशेष असं काहीच नाही. अगदी सामान्य ज्ञानाच्या पातळीवरचे, आम्हाला माहित असलेलेच नियम आहेत; आमच्याकडं तेवढा वेळ, पैसा आणि रूची असती तर आम्हीही अशी ‘स्मार्ट मशीन्स’ तयार करू शकलो असतो वगैरे प्रकारे धिःकारच केला असता!! अणूचा शोध लागल्यावर ईश्वराचा धिःकार केला तसाच!! अगदी आजही इंटरनेटवर फझी थिंकिंगची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला तर धिःकारच वाचायला मिळतो!!

६९. मन्या, माझं डोकं गरगरायला लागलंय! आपली चर्चा आता इथंच थांबवूया!

नाही! तुझ्या माझ्यात एकवाक्यता होत नाही तोपर्यंत ही चर्चा चालूच राहिली पाहिजे!

ठीक आहे. बोल!

तुला माहितच आहे की, आपण कलियुगात वावरत आहोत. या युगात राज्यकर्ते, सामान्य माणसे कशी वागणार आहेत आणि एकूणच समाजाची आणि देशाची किती परागती आणि हाल होणार आहेत त्याची भविष्यवाणी वेदव्यासांनी श्रीमत् भागवत या ग्रंथाच्या बाराव्या स्कंदात, दुसऱ्या अध्यायात लिहून ठेवली आहे. महर्षीव्यास म्हणतात त्याचा सारांश असा की-

‘कलियुगात धर्म नष्ट होईल, त्यामुळे कुणी ही सत्य मान्य करणार नाही; क्षमा, दया हे गुणही नष्ट होतील; कलियुगात धनवान माणसालाच सगळे गुण चिकटवले जातील; न्याय, धर्म व्यवस्थेत धनदांडग्यांचा प्रभाव राहील; फक्त स्त्री आणि पुरूष अशी ओळख पटल्यावर स्त्री-पुरूष शरिरानं एकत्र येतील (धर्म, वर्ण, गण, गोत्र यांचा विचारही करणार नाहीत.); फक्त जानवं आणि वाढवलेल्या जटा या खुणावरूनच ब्राह्मण आणि ब्रह्मचारी/ वानप्रस्थाश्रमी ओळखले जातील; सौंदर्यात भर घालण्यासाठी लोक केस वाढवतील; चोर

आणि डाकू प्रजेला लुबाडतील; राज्यकर्तेसुद्धा चोर डाकूंशी संगनमत करून लोकांना लुटतील; कुलीन स्त्रिया परपुरूषाच्या प्रेमात पडतील; पोट भरणे हेच महत्वाचं काम समजले जाईल; गुरू, शिक्षक ज्ञानाचा बाजार मांडतील आणि म्हणून विद्यार्थी शिक्षकांचा मान राखणार नाहीत; वृक्ष छोटे होतील आणि वनस्पतीमधे औषधी गुण शिल्लक राहणार नाहीत; मुलं आपल्या आई-बापांना टाकून देतील आणि सासऱ्याच्या आणि पत्नीच्या मतांप्रमाणे वागतील; गृहस्थ जवळची (पवित्र) ठिकाणे सोडून दूरच्या तीर्थयात्रेला जातील; भूक, व्याधी, आणि काळजीने लोक जेरीस येतील आणि त्यांचे आयुष्य बावीस-तेवीस वर्षांचेच राहील!'

बा मना, तू श्रीमत् भागवताचं उदाहरण देतोयस, पण अलिकडच्या तुकाराम महाराजांनी.....

तू काय म्हणालास? बा मना?

हो! आधो बामण्या म्हणायचो. नंतर मन्या म्हणायला लागलो. काल तूच म्हणालास की तुझ्या-माझ्यात जोपर्यंत एक वाक्यता होत नाही तोपर्यंत चर्चा अशीच चालत राहणार. रात्रभर विचार केला, तू बोलायचास त्याच्या नोटस् मी घरी जाऊन लिहून ठेवायचो. त्या सगळ्या काढून वाचल्या. वाटायला लागलं आपल्या मधला वाद संपण्याचा क्षण जवळ आलाय.

ते नंतर ठरवूं. तू तुकाराम महाराजांबद्दल काय सांगणार होतास?

कलियुगात काय काय होणार आहे ते महाराजांनी त्यांच्या गाथेतही सांगितलंय-

'कलियुगामाजी थोर जाले बंड । नष्ट लोक लंड जाले फार।।१।। न धरती, सोय, न पुसती कोणा । येते जैसे मना तैसे चाले।।२।। सज्जनांचा वापरा टेको नेदी द्वारा । ऐसिया पामरा कोण तारी ।।३।। विश्वास तयांचा बैसे ना कोठेही । स्तुतिनिंदा पाही जीवींधरी ।।४।। वर्णधर्म कोणी न धरती विटाळ । घालिती गोंधळ एके ठायीं।।५।। तुम्हा सांगतो कलयुगाफळ। पुढे होईल ब्रह्मघोळ ।।६।। आम्हा म्हणतील कंटक । ऐसा पाडिती दंडक ।।७।। स्त्रिया पुजूनी सरे देती । भलते स्त्रियेसी भलते जाती।।८।। श्रेष्ठवर्ण वेदविद्वांस। अंगिकारिती मद्यमांस।।९।। ऐसे होईल, शकुन देतो । अगोदर सांगून जातो।।१०।।'

बा मना, व्यासांसारखे त्रिकालज्ञानी ऋषी आपले पूर्वज होते हे आपलं भाग्यच म्हटलं पाहिजे. हजारो वर्षांपूर्वी त्यांनी संस्कृतात सांगितले तेच प्राकृत भाषेत सांगणारे संत तुकाराम महाराज, म्हणजे तर आपल्यासाठी चालते बोलते देवच आहेत. व्यासांनी आणि तुकाराम महाराजांनी त्याकाळी सांगितलेली कलियुगाची लक्षणे आज प्रत्यक्षात उतरलेली आपण पाहतोच आहोत! मग आपल्या प्रज्ञेच्या जोरावर व्यासांनी लिहून ठेवलेल्या गोष्टी 'पुराणातली वांगी' किंवा 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' असं म्हणून टाकून कशा द्यायच्या? पण जे जुनं आहे ते टाकावू आहे. त्याकडे बघायचं सुद्धा नाही, हा पुरोगाम्यांचा आणि बुद्धिवाद्यांचा हेकटपणा समाजाला घातकच ठरत गेला. वेदव्यासांनी आणि संत तुकाराम महाराजांनी सांगितलेल्या चार समजुतीच्या गोष्टी महाराष्ट्राने लक्षात ठेवल्या असत्या तर निदान महाराष्ट्र तरी उत्क्रांतीच्या चळवळीतून बाहेर फेकला गेला नसता. पण पुरोगामित्वाची आणि बुद्धिवादाची पताका खांद्यावर घेऊन, संघर्षाच्या वाऱ्या करणाऱ्या तथाकथित नेत्यांनी, राज्यकर्त्यांनी मराठमोळ्या माणसाला खऱ्या सामाजिक, आर्थिक, नैतिक आणि बौद्धिक विकासापासून हजारो मैल दूर नेऊन ठेवलं! व्यास-तुकारामांनी सांगितलेली कलियुगाची लक्षणे प्रत्यक्षात आणून दाखवूच अशी प्रतिज्ञाच जणू या वैज्ञानवादी, बुद्धिवादी आणि राजकीय नेत्यांनी केली असावी.

बा मना, आपण मात्र व्यासांनी सांगितलेली कलियुगाची लक्षणं हे उत्क्रांतीच्या मार्गावरले खाचखळगे आहेत असं समजून ते टाळण्याचा प्रयत्न करू या. व्यासाचं भविष्य खोटं ठरणार नाही आणि मानवी संस्कृती दिवसेंदिवस विनाशाकडे धावतच राहणार हे जरी खरं असलं तरी तो विनाश आपल्यापुरता टाळण्याचा प्रत्य करायला काय हरकत आहे?

७०. कां रे? मन मोकळेपणानं हसत आलास? ... अरेच्या? हसू इतकं अनावर व्हायला काय झालं?

काही विचारू नकोस! आपल्या डी.आर्. बरोबर 'अंधःश्रद्धा! उखाड संघाच्या' प्रेस कॉन्सफरन्सला गेलो होतो. म्हटलं बघावं तरी काय भानगड आहे?

बऱ्यापैकी गर्दी झाली असेल पत्रकारांची?

हे काय विचारणं झालं? साडेतीन पत्रकार हजर होते. माझ्यासकट! हो! दोन पत्रकार आणि मी-दीडशहाणा!! त्या परिषदेत मी विचारलेल्या प्रश्नात मला ती पदवी बहाल करून खाली बसवण्यात आलं!

बा मना, 'अंधःश्रद्धा उखाडवाले' असंच करतात. थोडा विरोधी सूर उमटला की 'दीडशहाणे आहात, खाली बसा!' असा ओरडा करून विरोधकाला गप्प केले जाते.

मन्या, त्यांची आणखी दोन तीन आवडती तंत्रे आहेत. एकाद्याच्या कपाळावर बुवाबाजीचा शिक्का मारायचा, लाखो रूपयांची बक्षिसे जाहीर करून बुवा करत असलेल्या तथाकथित चमत्कारांना आव्हान द्यायचे, अशा आव्हानातून सध्याच्या काळांत लाखो लोकांचा पाठिंबा असलेले आणि संत या पदवीला योग्य असलेले परमेश्वराचे सेवकही सुटत नाहीत. दुसरे तंत्र म्हणजे पोलिसांच्या मदतीने बुवाच्या राहत्या जागेवर किंवा मठावर धाड टाकायची. तिसरे तंत्र म्हणजे या सगळ्या कार्यक्रमांना अफाट प्रसिद्धी द्यायची. अंधःश्रद्धा उखडून टाकण्यासाठी कंबर कसलेले आणि विज्ञानावादाचे पाईक म्हणून मिरवायला हे लोक मोकळे!! बुवाकडं जाणारा थोडाफार पैसा आपल्या संस्थेकडं वळवणं हा त्या तंत्राचा आर्थिक लाभ पदरात पडतोच!

बा मना, एकीकडं उखाड चळवळ चालू आहे पण दुसरीकडं अंधःश्रद्धा मूळ धरत आहे. असं का होतंय? या प्रश्नाचं उत्तर आहे की, सगळे प्रयत्न करून सुद्धा माणसाला आयुष्यात यश मिळत नाही आणि तो हताश होतो तेव्हाच तो दैवी उपायाकडं वळतो आणि तिथूनच अंधःश्रद्धेचा उगम होतो, पण बुद्धिवादाची आणि विज्ञानवादाची कास धरलेल्या लोकांच्या नशिबी अपयश आणि हताशा येतच नाही असं नाही! हताश झालेले बुद्धिवादी, विज्ञानवादी मग दैवी उपायांना आधुनिक विचारांचा मुलामा देऊन जप, ध्यान धारणा, योगासनं अशा उपायांचा गुपचुप् सराव करतात. म्हणजे एकीकडे अंधःश्रद्धे विरूद्ध ओरड अन् दुसरीकडे जपजाप्य! आतून कीर्तन आणि बाहेरून तमाशा अशी विचित्र अवस्था झाली आहे त्यांची.

स्वातंत्र्या नंतरच्या काळात वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी दिलेल्या अपाट आश्वासनामुळे सर्व स्तरांतल्या लोकांच्या भौतिक अपेक्षा प्रत्येक निवडणुकीच्यानंतर भूमिती श्रेणीने वाढत गेल्या. त्या प्रमाणांतच वाढत जात होतं अपेक्षा भंगाचं दुःख आणि हताशा! मिळेल तेवढ्यात समाधान मानणे हा त्यावर एक चांगला उपाय होता. पण तो उपाय कुणालाच रुचला नाही. शिवाय पारंपारिक ज्ञानाची आणि विज्ञानाची समीकरणे सामान्य माणसाच्या डोक्यावरून जाणारी ठरत होती. त्या समीकरणांनी कुणालाच सुख-शांती दिली नाही. अशा परिस्थितीत एकच उपाय होता. देवाला साकडे घालायचे, त्याच्या दारात धरणे धरायचे! पण अंधःश्रद्धा उखाड समितीची भिती मनात होतीच!!

अशा परिस्थितीत शहरातल्या आणि खेडेगावातल्या अयशस्वी आणि हताश लोकांनी लोकशाही तंत्र आत्मसात केले. आपल्या भागातल्या लोक-प्रतिनिधींच्या दारातच धरणे धरायला सुरुवात केली. काही लोकांच्या पदरात यश पडले. पण एक लोक प्रतिनिधी कुणाकुणाला मदत करणार? एक अनार, सौ बीमार! लोक प्रतिनिधीच्या पदरात जो कोणी पै-पैसा टाकील त्याचं काम होऊ लागलं. भ्रष्टाचार इतका बोकाळला की नेत्याला पै-पैसा देण्यासाठी सूटकेस वापरण्याची पाळी आली!

खरं तर श्रद्धा आणि अंधःश्रद्धा कशाला म्हणायचे त्याची व्याख्या करणे अवघड आहे. पण विज्ञानवाद्यांनी ती व्याख्या केली. विज्ञानाच्या कसोटीवर ज्या गोष्टी तपासून घेता येतील त्याच खऱ्या, बाकी सगळ्या अंधःश्रद्धा! पण याच पुस्तकाच्या परिच्छेद ४६ मधे नागसेनानं श्रद्धेची लक्षणं सांगितल्याचं नमूद केलं आहे. श्रद्धा ही चित्तात-मनात एकाद्या झऱ्याप्रमाणं उगम पावते. माझ्या चित्तात काय उगम पावलयं ते कुणी ठरवायचं? मीच! मग माझी श्रद्धा खरी असेल तर विज्ञानवाद्यांना त्याला अंधश्रद्धा ठरवून ती उखडून टाकण्याचा काय अधिकार? निदर्शनं करून, पोलीस आणून माझ्या श्रद्धेवर आक्रमण करून हे उखाडवाले काय साधणार आहेत? इथंही सामान्य माणसाच्या पदरात निराशा आणि हताशाच पडणार का?

बा मना, आपण निराश व्हायचे नाही. अंधःश्रद्धा, विज्ञानवाद, बुद्धिवाद या झगड्यात पण भाग घ्यायचा नाही. मनाच्या (चित्ताच्या) आंतल्या कप्प्यातून श्रद्धेचा अगदी छोटासा उमाळा फुटला तर त्याच्या काठाकाठाने चालत रहायचे. नागसेनांना जे ज्ञान महात्मा गौतम बुद्धांच्या कृपेने प्राप्त झाले त्याचा छोटासा अंश जरी आपल्याला आचरणात आणता आला तरी वेगवेगळ्या झगड्यातून, वासना पूर्ण करण्याच्या झटापटीतून आपली मुक्तता होऊ शकेल! श्रद्धा-अंधश्रद्धा हा वादही शिल्लक राहणार नाही.

७१. देव भक्तांना, उपासकांना खरंच भेटतो कां? देवाची प्राप्तो खरंच होते कां? देवानं प्रत्येक युगांत वेगवेगळे अवतार घेतले हे खरे कां? ज्या युगात देवाचा जो अवतार होऊन गेला त्याचे दर्शन पुढल्या युगातल्या माणसांना पुन्हा पूर्वीच्याच रूपात होऊ शकते का?

आपल्या धार्मिक ग्रंथात आणि लोक साहित्यात तसे दाखले आढळतात. समर्थ रामदासांना आणि गोंदवलेकर महाराजांना कोदंडधारी रामाचे प्रत्यक्ष दर्शन झाले होते. नामदेव महाराजांच्या हट्टापायी विठोबाला माणसाच्या रूपात समोर येऊन नामदेव महाराजांबरोबर जेवण घ्यावे लागले होते. तिकडे बंगालमधे, रामकृष्ण परमहंस कालिमातेची पूजा करायला बसले की माता प्रत्यक्ष रूपात प्रकट होत होती. आई-मुलामधे ज्या प्रकारचे संवाद नेहमी होतात तसे संवाद कालिमाता आणि रामकृष्ण परमहंस यांच्यामधे होत होते असे म्हटले जात होते. रामकृष्ण परमहंस हे तर अगदी अलिकडच्या काळातले. मग त्यांचा अनुभव खोटा कसा मानायचा?

प्राचीन वाङ्‌मयात सांगितल गेलंय् की देवाची प्राप्ती करून घेण्याचे प्रत्येक युगातले मार्ग वेगळे असतात. कृत युगात ध्यानाने, त्रेता युगात हवनाने, द्वापार युगात पुजापाठाने आणि कलियुगात फक्त नामस्मरणाने ईश्वर प्राप्ती होते. गोंदवलेकर महाराजांनी त्यांच्या एका प्रवचनात सांगितले आहे की कलियुगात देवाचा 'नाम' हाच अवतार राहणार आहे. म्हणून श्रद्धाळू माणसांनी अखंड नामस्मरण करावं.

बा मना, तथाकथित बुद्धिवादी, विज्ञानवादी कोणत्याच पुराणमतांवर विश्वास ठेवत नाहीत. उलट देवाची, अवतारांची, अवतार कार्यांची टिंगल-टवाळी, धिःकारच करतात. लोकशाहो व्यवस्थेत प्रत्येकाला मतस्वातंत्र्य आहे. अवताराची कल्पना त्यांना खुशाल नाकारू दे. आपण आपल्या काळाला योग्य आणि जीवनाला पूरक असे व्यवहार करतां करतां जमेल तेवढे नामस्मरण करत राहूया!

७२. मोठी माणसे आणि लहान मुले यांच्यातला मुख्य फरक म्हणजे लहान मुलं एकमेकाशी चटकन् मैत्री करतात. उलट मोठी माणसे अपरिचित माणसांशी दोन शब्द बोलत सुद्धा नाहीत. कुणीतरी ओळख करून दिल्याशिवाय नमस्कार, हस्तांदोलनही करणार नाहीत. एक ते सहा वर्षाची मुले मात्र एकमेकाला बघतील, हसतील, जवळ जातील, एकमेकांना ओरबाडतील, खेळतील, भांडतील, रडतील, पुन्हा हातात हात घालून खेळायला जातील. याचे मुख्य कारण असं सांगता येईल की, त्या वयातल्या मुलांचा देहाभिमान-अहंकार (Ego) तयार झालेला नसतो.

कार्ल युंग या मानसशास्त्रज्ञाने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी गेल्या काही वर्षात अशा संस्काराची माहिती एकत्र केली आहे की ज्यामुळे, वरच्या परिच्छेदात वर्णन केलेला लहान मुलांच्या मनातला 'सर्व समभाव' टाकून दिला जातो आणि मुलांना त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव होते. कार्ल युंग म्हणतो 'मुलांचे वय जसजसे वाढत जाते तसतसा तो देहाभिमानी अहंकार (Ego) पक्का होत जातो. पण त्या अहकारानं पुन्हापुन्हा 'स्व'कडे परत आले पाहिजे. त्याशिवाय व्यक्तीला मानसिक स्वास्थ्य प्राप्त होत नाही.'

'अशाप्रकारे काही प्रमाणात स्वायत्तता प्राप्त केल्याशिवाय व्यक्ती तिच्या भोवतालच्या प्रौढ वातावरणाशी संबंध प्रस्थापित करू शकत नाही. समाजात वावरताना व्यक्तिच्या वेगळेपणाची जाणोव जपता जपता माणसाने 'स्व'चा आणि देहाभिमानी अहंकाराचा अर्थपूर्ण विकास कसा साधायचा हा प्रश्न शिल्लक राहतोच. आणखी एक महत्वाचा मुद्दा, बाल्यावस्थेतल्या पूर्णत्वाच्या कल्पनेवर आणि सर्वसमभावावर आघात किंवा जखम केल्याशिवाय मुलामधे स्वत्वाची आणि वेगळेपणाची जाणीव निर्माणच होत नाही.'

कार्ल युंगचा अनुयायी आणि मानसशास्त्रज्ञ जोसेफ हॅंडरसन याने 'प्राचीन मिथक आणि आधुनिक मानव' या लेखात वरील विचार मांडलेले आहेत. (Man and his symbols-Edited by Carl Jung) त्या लेखाचे शिर्षक आहे- 'संस्कारांचे अस्सल नमुने' (The Archetype of Initiation) हे नमुने सादर करताना हॅंडरसननं वेगवेगळ्या जाती-जमाती, धर्म, संस्कृती इत्यादी मधे रूढ असलेल्या संस्कारांची त्रोटक माहिती दिली आहे. हिंदू धर्मात सर्वमान्य असलेल्या सोळा संस्कारांची माहिती त्या लेखात नाही. पण अशा संस्कारामागचे मानसशास्त्रीय घटक-मुलांमधल्या सर्व समभावाचा त्याग, देहाभिमानी अहंकाराची जाणीव, अहंकाराचं स्व कडे परतणे, समभावावर आघात किंवा जखम, वगैरे लक्षात घेतले की त्या घटकांच्या आधारे आपल्याकडल्या संस्कारांचे मानसशास्त्रीय विवेचन करणे सहज शक्य आहे.

सिग्मंड फ्राईड आणि कार्ल युंग यांनी एकाच विश्लेषण पद्धतीचा उपयेग केला असला तरी त्या दोघांत मुख्य फरक असा आहे की, फ्राईड मनोरुग्णांचा अभ्यास करतो, तर युंग लहानपणापासून प्रौढत्वापर्यंत विकसित होत जाणाऱ्या व्यक्मित्वाचा अभ्यास करतो. तसंच शैशवत्वाकडून प्रौढत्वाकडे जाण्याच्या प्रवासात कोणत्या जमातीत कोणते संस्कार केले जातात त्याचे वर्णन करतो. या संस्कारांना कार्ल युंगने (Processes of Initiation) असे नांव दिले आहे. म्हणजे व्यक्तीच्या आयुष्यातल्या प्रत्येक बदलाच्या वेळी हे संस्कार केले जात होते, असे म्हणायला हरकत नाही.

आपल्याकडच्या सोळा संस्कारामुळे कोणते मानसशास्त्रीय फायदे होत होते हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. पण सहज म्हणून आपण उपनयन (मुंज) या संस्काराची छाननी करू या.

मुलांची मुंज साधारणपणे ६ ते ८ वर्षापर्यंत करावी अशी प्रथा आहे. पाच-सात वर्षापर्यंत आईवडिलांनी कौतुकाने कुरवाळलेले डोक्यावरचे केस काढून टाकणे हा बटूला पहिला मानसिक धक्का दिला जात होता. न्हाव्याच्या वस्ताऱ्याने होणाऱ्या जखमा वेगळ्याच! या पद्धतीनं, रंगीबेरंगी कपडे टाकून देऊन तीन बोटं रुंदीची लंगोटी घालायला लावणे, आईच्या जवळ बसून तिच्या पानातले पदार्थ शेवटची वेळ

म्हणून खाणे आणि त्याच वेळी मुलाला जाणीव देणे की यापुढे (इतर माणसचे तर नाहीच नाही, पण) आईवडिलांचे उष्टे सुद्धा खायचे नाही; त्यानंतर होम हवन इत्यादी धार्मिक विधी; वडिलांकडून किंवा गुरुकडून गायत्री मंत्राची आणि तिन्ही त्रिकाळ करायच्या संध्यावंदनाची दीक्षा; नंतर आप्त-मित्रांसह भोजन-तही स्वतंत्र ताटात; संध्याकाळी एक झोळी घेऊन प्रत्यक्ष आईकडून भिक्षा मागायला लावणारी भिक्षावळ!

अशा तऱ्हेनं व्रतबंध या संस्कारात मानसशास्त्रीय सर्व घटकांचे उद्दिष्ट साध्य होत होतं. व्यक्तिमत्वाची कळ नकळत जडण-घडण करणाऱ्या आणि वाढत्या वयात समाजात कसं वागावं लागतं त्याची दिशा दाखवणाऱ्या या संस्काराची योजना करणारे  आपल्याकडले ऋषी-मुनी महान विचारवंत, मानसशास्त्रज्ञ होते असे म्हणायला काय हरकत आहे?

पण आपल्याकडल्या सुशिक्षितांनी सोळा संस्कारामागचे अदृश्य मानसशास्त्रीय फायदे मोडीत काढले. आणि त्यांना कौटुंबिक, सामाजिक समारंभाचे रूप दिले. संस्कार नकोत, पण हसण्या-खिदळण्याचे, खाण्यापिण्याचे, गाठीभेटीचे समारंभ हवेत. पुरोहितांनी सुद्धा बटु आणि त्याचे नातेवाईक म्हणतील त्याप्रमाणे या संस्कारात बदल करायची तयारी दाखवली तेव्हापासून आणखीनच बट्याबोळ झाला. घेरा नको? ठीक आहे. कानाजवळचे चार केस कापा! मातृ-भोजन भिक्षावळ यात काही अर्थ नाही. आमचा मुलगा भीक मागणार आहे कां? ते काही नको? ठीक आहे. बटूला ताशा बँड वाजवत, उघड्या गाडीतून गावातून मिरवून आणा!!

संस्कार नको म्हणणाऱ्यात सुशिक्षित, स्वतःला पुरोगामी समजणारे, डाव्या विचारसरणीचे बुद्धिमान लोक होते हे विशेष! या लोकांना स्वतःची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी संस्कारहीन, संतापलेली, बंडखोर तरुण पिढी तयार करायची होती!!

बा मना, पण परिस्थिती पुन्हा बदलू लागली आहे. हळूंहळूं सुशिक्षित लोकांना आपल्याकडल्या संस्कारांचे महत्व पटू लागले आहे. संस्कृत मंत्रांचे अर्थ सांगणारे, संस्कारांचे महत्व पटवून देणारे कुणीतरी पाहिजे. आपल्या ज्ञानाच्या आवाक्यात जेवढे येईल ते आपण दुसऱ्यांना सांगू या!!

७३. आजकालच्या जागतकीकरणाच्या वातावरणात देश किंवा देशाभिमानाबद्दल बोलणे-म्हणजेच राष्ट्रवादाची चर्चा करणे-हा गुन्हा ठरण्याची शक्यता आहे. आणि ते तसंच ठरले ही आहे.

'व्हॅलेंटाइन डे'ला काही हिंदुत्ववादी संघटनांनी कॉलेज कुमार/कुमारींच्या उथळूपणाला, आणि भेट-कार्ड विकणाऱ्यांना विरोध करण्याचे ठरवले आणि प्रसार माध्यमांत आणि कांही विद्यार्थी गटात एकच खळबळ माजली, गहजब झाला!

बा मना, त्या गहजबावर विचार करण्यापूर्वी देशाभिमान किंवा राष्ट्रवाद म्हणजे नक्की काय त्याचा विचार कर.

मन्या, त्यात विचार कसला करायचा? बर्नाल्ड शॉनं देशभक्तीची/राष्ट्रवादाची सुंदर व्याख्या केली आहे. 'राष्ट्रवाद म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, तुमचा दृढ विश्वास की तुमचा देश सगळ्या बाबतीत महान आहे' (Nationalism is nothing but your conviction that your country is far superior to many other countries, in all respect) मन्या, भारताबद्दल ज्यांच्या तशा भावना नाहीत ते लोक दुसऱ्या देशांचा धर्म, तत्वज्ञान, विज्ञान, संस्कृती, आहार विहाराचे नियम, संकेत पाळू लागलेत. वॅलेंटाइन डे पाळण्याची प्रथा आपल्या देशात गेल्या चार-पांच वर्षांपासून सुरु झाली. आणि आता तरुण तरूणींनी तिचा सर्रास वापर करायला सुरुवात केलीय. त्याचे कारण बहुधा हेच असावे की तरुण वर्गात आपल्या देशातल्या उत्सवामुळे पुरेसा उत्साह किंवा सळसळ संचारत नाही

बा मना, हे मात्र खोटं हंऽ! गणपती उत्सवाच्या काळात सळसळ किंवा उत्साह ओसंडून वाहात असतो. दिवाळीच्या सुरूवातीपासूनच प टाक्यांची दाणादाण उडवली जाते.

यावरून आपण एकच अनुमान काढू शकतो की अलिकडल्या तरूणांना मन विकसित करणाऱ्या धार्मिक किंवा सांस्कृतिक गोष्टीच नको आहेत. त्यांना हवीय नुसती सळसळ, धिंगाणा, हातवारे करत नाचण्याची संधी! मग त्याचे कारण गणेशोत्सव, दिवाळी, नाताळ, व्हॅलेंटाईन डे, कॉलेजचं गॅदरिंग काहीही असो! सारांश, सगळ्या गोष्टींचे प्रदर्शन करण्याची संधी शोधत असतात ही तरूण मंडळी! कपड्यांचे प्रदर्शन करायचंय? मग फॅशन शो करा. त्या निमित्ताने अंगप्रदर्शनही होते. उत्साहाचे प्रदर्शन करायचंय? बेबंद नाच करा. त्या निमित्तानं सळसळीचेही प्रदर्शन होते! शक्ती-प्रदर्शन करायचंय? एकाद्या मुलीवर उघड्यावर बलात्कार करा किंवा सालस आणि देशभक्त मुलाला बेदम मारा!

मन्या, मानवी संस्कृती हळुहळु परागतीकडे-विनाशाकडे-जाणार आहे त्याबद्दलची वेदव्यासांची भविष्यवाणी तूच मला सांगितली होतीस. कलियुगात संस्कृती विरोधी कोणत्या गोष्टी होणार त्याची जंत्रीच ऐकवली होतीस मला. मग देशभक्तीबाबत इतका हळवा कां झालायस? सगळीच क्षेत्रं बरबटत, कुजत चालली आहेत. त्यात तरूण वर्ग पुढं असणारच. तू मला इतके दिवस सांगत आलास त्याच शब्दात सांगतो-बा मना, ज्यांना स्वतःचं हित कशात आहे तेच कळत नाही, संस्कृती रक्षणाचा ठेका तुम्हाला कुणी दिला असा प्रश्न विचारण्यापर्यंत ज्यांनी मजल मारली आहे, स्वतःचे वाटोळ करून घेण्याचाच ज्यांनी निर्धार केला आहे, पण शेवटी सगळ्याचे खापर सरकारच्या डोक्यावर फोडून उग्र निदर्शने करण्याचीही चलाखी ज्यांनी आत्मसात केली आहे अशा तरूणांच्या नादी लागू नकोस. आपण मात्र देशभक्तीची नाळ शाबूत ठेवण्याचा आपल्यापुरता प्रयत्न करूया आणि म्हणूया की पिसाळलेल्या तरूण वर्गाचं आणि त्यांना उचकावणाऱ्या खाजगी दूरदर्शन वाहिन्यांचे चांगभलं!!

७४. वयाच्या आठव्या वर्षापासून वीस वर्षापर्यंत-म्हणजे तब्बल बारा वर्ष मुलाना गुरू-कुलात पाठवलं जायचं. कुटुंबापासून तोडण्याचा प्रकार पाशवी होता, एका विशिष्ट जातीपुरती ती व्यवस्था होती असे तू

म्हणशील. क्षणभर तुझा आरोप मी मान्य करतो. पण मुलाच्या मानसिक जडण-घडणीसाठी त्याला कुटुंबापासून, समाजापासून दूर नेणं आवश्यक होते असे नाही तुला वाटतं?

मन्या, तू म्हणतोयस ते पटायला लागलंय्. त्या काळांत एका नवरा-बायकोला आठ-दहा मुले व्हायची. शिवाय एकत्र कुटुंब पद्धती होती. उपजिविकेची साधनेही एकत्र होती. सामाजिक आणि शासकीय कुरबुरी महाभारत काळापासूनच सुरू झाल्या होत्या. अशा परिस्थितीत मुलांना वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक हेव्यादाव्यापासून दूर करून गुरूकुलात शिक्षणासाठी पाठवणे गरजेचेच होते. गुरूकुलात जे ज्ञान मिळायचे तेही शुद्ध स्वरूपाचे असायचे! कारण त्या ज्ञानावर कौटुंबिक, सामाजिक, किंवा शासकीय संस्थांचा दबाव नसायचा. माझ्या मुलाला छडी कां मारलीत असा प्रश्न गुरूकुल प्रमुखाला विचारण्याची एकाही पालकाची हिंम्मत नव्हती! त्याचा परिणाम असा व्हायचा की पिंडापासून ब्रह्मांडापर्यंत सगळ्या विषयाचे ज्ञान मिळालेला, स्वावलंबनाचे धडे गिरवलेला, हेव्यादाव्यापासून दूर राहिलेला, जबाबदार नागरिक बनून परत आलेल्या आपल्या मुलाला बघून पालकांना किती धन्य वाटत होते त्याची कल्पनाच केलेली बरी!

गुरू-कुलाला पर्याय म्हणून हल्लीच्या काळात पब्लिक स्कूल्स निघाली आहेत. पण त्या शाळांत ‘बाल वयात असतांनाच पकडा’ (Catch them young) हे तत्व प्रतिबिंबित झालेले दिसत नाही. अशा शाळातून बाहेर पडलेली मुलं कोणते गुण-दोष घेऊन बाहेर पडतात त्याचा विचार कर. का रे ? घड्याळाकडे कां बघितलंस? तुझी कामावर जायची वेळ झाली असेल. जा. आपण नंतर बोलू!

७५. का रेऽ इतका घाबरलायस कां? ये. आत ये!

मन्या, आता घबराट, छातीची धड्धड्, रागात येऊन बोलणे सगळे बंद झालंय!

अरे व्वा! याचा अर्थ तू ‘बामनाच्या’ जातीत शिरायला मोकळा झालास!

तसं म्हण वाटल्यास! पण गुरुकुल आणि पब्लिक स्कुलची तूलना कर असं तू सांगितलंस आणि माझ्या डोळ्यापुढं माझीच छबी तरळू लागली. त्यावेळी मी दहा वर्षाचा होतो. वडिलांनी मला पब्लिक

स्कूलमधे घातलं. सहा वर्षे पब्लिक स्कूलमधे काढली. मी त्या वेळच्या इंटरमिजिएटमधे असतांना वडिलांची आर्थिक स्थिती खालावली म्हणून मला पब्लिक स्कूल सोडावे लागले. मी बाहेर आलो तोच असंख्य स्वभावदोष पदरात बांधून घेऊन! तोकड्या ज्ञानाचा गर्व; पारंपारिक ज्ञानाची टिंगलटवाळी करण्याची हौस; बुद्धिवादाचा आव आणून अवतीभोवती असणाऱ्या नातेवाईकांना आणि मित्रांना हिडिस फिडिस करणे; पुरोगामित्वाची किंवा समाजवादाची झुल पांघरून स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेणे!! या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे प्रचंड हट्टीपणा. या स्वभाव दोषांना मर्यादाच राहिली नाही. त्यामुळे माझे व्हायचे तेच झाले. मी सगळ्यात असूनही एकटा राहिलो. अगदी एकटा! मन्या, तू नेहमी म्हणतोस की तू माझाच अर्धाभाग आहेस!

ते खरं आहे!

मग एवढी उलथापालथ होत असतांना आणि माझ्या स्वतःच्याच दोषांच्या आणि एकटेपणाच जाणिवेच्या फफाट्यात मी तडफडत असतांना तू मला ओढून बाहेर का नाही काढलंस?

बा मना, मनावर ज्यावेळी व्यावहारिक गोष्टींचा, माणसाला उत्क्रांतीच्या मूळ उद्देशापासून दूर नेणाऱ्या विकारांचा आणि सटरफटर आधुनिक विचारांचा पगडा असतो, त्यावेळी माणसाची विवेक शक्ती पांगळी होऊन जाते. त्यावेळी दुसरा कोणताच विचार ऐकून घण्याची मनाची तयारी नसते. खाजगी वाहिन्यांवर हल्ली चालू असलेल्या मराठी मालिकांमधे दिसणाऱ्या स्त्री पुरूष पात्रांसारखे आपल्याच विचाराच्या तुरूंगात अडकून पडल्यासारखी वागतात माणसे! अशी पात्रे सामान्य प्रेक्षकाला आकर्षित करणारा संघर्ष उभा करू शकतात फार तर. पण एकूण जीवनाला दिशा देणारे काहीही घडवू शकत नाहीत! तुझ्या बाबतीत तसंच काहीसं झाले होते. पण-जाऊ दे! तुझ्या माझ्यातला वाद संपलाय, तुला वस्तुस्थितीचं भान आलय तेव्हा.....

नाही मन्या, तुझ्या माझ्यातला वाद संपता कामा नये. तू अनेक विषय सोडून दिलेयस् असं नाही वाटत तुला?

बा मना, खरं आहे तुझं म्हणणं! पंचकोश विवेक; सरसकट मापो (आपशींीं), प्रयोगाचं किंवा प्रयत्नाचं योग्य ते मानधन आणि अनेक पुरस्कार मिळून सुद्धा शांत न होणारे कलाकार; ईशावास्य उपनिषद् आणि आधुनिक अर्थशास्त्र; देवभक्ती करणाऱ्या मूर्तिकाराच्या गोष्टीत शिरलेला भंपकपणा; अर्थशास्त्रच अर्थशास्त्राला गाडणार; पॉप हे विश्वसंगीताचं 'व्हियाग्रा' आहे; वगैरे मुद्यावर लिहायचं होते. पण ती जबाबदारी आता आपल्या नातवंडावर सोपवूया.

पूर्वा आणि शार्दूलवर?

कां आश्चर्य का वाटलं? पुढल्या पिढ्यांना तर आपण अनुभवला त्यापेक्षाही प्रचंड मानसिक संघर्षाला तोंड द्यावे लागणार आहे. आणि माझा विश्वास आहे की त्या पिढ्या त्या संकटातून नक्की मार्ग काढतील! चल!

चल कुठे? आपण इथेच डोळे मिटून बसू या आणि शांतिमंत्र म्हणूया.

ॐ शांतिः शांतिः शांतिः!!

## परिशिष्ठ

जून २००२/पुणे.

प्रिय शंभोमामास,

हे पत्र तुझ्या पुस्तकासंबंधी. मी वाचले. मला आवडले.

गेल्या कित्येक वर्षात तुझ्याजवळ येण्याची (मानसिक दृष्ट्या) संधी मिळाल्यामुळे मी हा पत्राचा प्रपंच करीत आहे. एकदा मनात विचार आला कि अभिप्राय लिहावा. पण तो कोरडा होण्याची भीति वाटली. आणि म्हणून ह्या स्वरूपात.

जसा तुला तुझ्या आजोळचा अभिमान आहे, तसाच मला आहे. त्यामुळे गणपुले श्रीमंत आणि कोल्हटकर बुद्धीवान अशी जी तुलना आहे ती खटकली. माझे आजोबा उच्चशिक्षित वकील होते. माझे सर्व मामा आणि मावश्या त्यांच्या मर्यादित वर्तुळामुळे कदाचित ज्ञानार्जनाच्या क्षेत्रात चमकले नसतीलही. पण ती मर्यादा सर्वांनाच आहे. पिढ्यानपिढ्या श्रीमंत असलेली बरीच घराणी असतील पण पिढ्यानपिढ्या फक्त ज्ञानाची उपासना करणारी घराणी कमीच. त्यालाही कारण आहे. आंग्ल भाषेत एक म्हण आहे- उच्चासनावर नेहमीच जागा असते. ज्ञानाची उपासना म्हणजे सत्याचा शोध. ही उपासना करण्याची तळमळ वारसाहक्काने चालून येतच नाही. टाटा-बिर्लांची घराणी झाली. पण महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर, वीर सावरकर ह्यांची घराणी झाली नाहीत. मला काय म्हणायचे आहे, ते तुला कळले असेलच.

'किती समजावू सांग तुला'- पुस्तकाचे नांव सार्थ आहे. हा आपल्या मनाशी घातलेला वाद किंवा केलेला संवाद खरच वाचनीय आहे. तसेच त्यात विषयांची सलगता हा हेतू नसल्यामुळे आणखीन मजा येते. पण त्याचवेळी आधीच्या मुद्यांची कडी तुटल्यामुळे वाचायला वेळ लागतो. (तुमचे विचार लायनीने का येत नाहीत?)

एक खटकलेली गोष्ट विचारतो- बऱ्याच ठिकाणी आंग्ल शब्द आवश्यक आहेत कां? इंग्रजी वाक्य आवश्यक आहे कां? हल्ली माझं काय झालय कि जसा मराठी भाषा, मराठी संस्कृती असा विचार करतो तसा मनात विषाद निर्माण होतो. ह्या आमच्या मातृभाषेचा संतवाणीचा गळा आम्हीच घोटतो आहोत असे वाटते. असो. विषयांतर नको.

हे पुस्तक वाचून मला खूप आनंद झाला. गुरुदर्शनच ! अशासाठी माझ्या मनातल्या अशा खटकलेल्या गोष्टीवरुन मी कित्येक लोकांशी वाद घातले आहेत. अगदी कानपाट्या नाव पडेतोपर्यंत. उदा. ना.सि.पडक्यांच्या एका पुस्तकात 'ग्राम्य' हा शब्द 'शिवी' ह्या अर्थाने किंवा उपहासाने वापरला होता. तो मला खटकला. त्यावरून मी एकाशी वाद घातला. माझा मुद्दा होता कि हा विचारांचा भोंगळपणा आहे. कारण मग 'आदिवासी' ही त्यापेक्षा घाणेरडी शिवी होईल पण ते होत नाही.

आणखीन एक-निरनिराळ्या मानवगटांची प्रगती कशी होते ? एक न सुटणारे कोडे आहे. ज्ञानेश्वरांच्या काळापासून ते आजतागायत खालच्या वर्गात विचारांची क्रांती का होत नाही? 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' ह्याला प्रखर विरोध का होत नाही? आमची मानसिक गुलामी का जात नाही? प्रश्न अनेक पण मती कुंठीत. पण आता त्यावर चांगला उपाय सापडला. तुझ्याकडून स्फूर्ती घेऊन मी एक वही घातली. माझेच उलटसुलट फक्त माझ्यासाठी त्यात लिहीणार. एखाद्या विषयावर काही लिहीले कि नंतर त्याकडे त्रयस्थ दृष्टीने पाहता येते. आणि विचार पक्का करता येतो.

तुझ्या विचारावर रा.स्व.संघाची छाप दिसून येते. अर्थात तुझा इतर तत्त्वज्ञानांचा अभ्यास आहे हे वादातीत. माझ्यावर माझ्या वडिलांच्या पुरोगामी, समाजवादी विचारसरणीचा जबरदस्त पगडा आहे. त्यात गंमतीची गोष्ट म्हणजे गेली १० वर्षे गुणवत्ता पद्धति व त्याच्या अनुषंगाने येणारे व्यवस्थापकीय तत्त्वज्ञान ह्यांचाही अभ्यास करतो आहे. त्यामुळे तुझ्या पुस्तकातील बऱ्याच मुद्यावर मतभेद आहेत (पण ते फक्त

आहेत.)  पण त्यांचा उल्लेख करणारच नाही. कारण हे पत्र अभिप्रायार्थ लिहीलेलं आहे. त्यावर समिक्षा लिहीणे हे माझ्यासारख्या सामान्य वाचकाचे काम नाही.

पुस्तक लवकरात लवकर छापून यावे हीच इच्छा.

तुझा,

जयंत

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे

जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

## संदर्भ सूची


| | | परिच्छेद क्र. |
|---|---|---|
| 1) | Rene Descartes-Classical Physicist as quoted in 'Tao of Physics' by Dr Fritjof Capra, Flamingo Edition, Fontana Paperback 1976. | 17 |
| 2) | संपादकीय, टाइम्स ऑफ इंडिया, दि.१७ जानेवारी १९९६ | 21 |
| 3) | Human Destiny-by Lecomte Du Nouy | 23 |
| | मराठी अनुवाद-मानवाचे भवितव्य-डॉ.चिं.श्री कर्वे, पर्ल पब्लिकेशन, पहिली आवृत्ती-1958. | 57 |
| 4) | अ ब क ड ई - दिवाळी अंक, १९९३ | 25 |
| 5) | पंचदशी-श्री विधारण्यमुनी- इंग्रजी भाषांतर कर्ते श्रो.ज्ञानानंद भारती स्वामी, प्रकाशक-ज्ञानानंद ग्रंथ प्रकाश समिती-१९७० | 27 |
| 6) | मानवाचे भवितव्य- डॉ.चिं.श्री कर्वे, पर्ल पब्लिकेशन, | 31 |
| 7) | संपादकीय, टाइम्स ऑफ इंडिया, दि.२३ जून १९९३ (ब्रिटीश लेखक रिचर्ड होगार्ड यानं १९५७ साली प्रकाश माध्यमावर नोंदवलेलं मत) | 36 |
| 8) | ताओ ऑफ फिजिक्स,डॉ.फिजोफ काप्रा-वेर्नेर हायसेनबर्ग यांचा विचार पृष्ठ ३० व ६२ | 37 |
| 9) | पातंजल योगदर्शन अथवा सार्थ आणि सविवरण | 38 |
| | भारतीय मानसशास्त्र-ले.श्री.कृ.के.कोल्हटकर, ढवळे प्रकाशन | |
| 10) | मनुस्मृति, संपादन-पं हरगोविंद शास्त्री, मणिप्रभा हिंदी टीकेसह, प्रकाशक-चौखम्बा संस्कृत सीरीज, वाराणसी | 39 |
| 11) | ढहश ढहळीव थर्रींश-लू अर्श्रींळप ढेषषश्रशी | 40,66 |

12) फंच राज्य क्रांती- ले. साहित्य सम्राट न.चिं.केळकर, 43,44

वरदा बुक्स, तिसरी आवृत्ती, १९८१ 45

13) राजा मिलिंदाचे प्रश्न, - मराठी भाषांतर- श्री.बी.सी.कांबळे-१९६१ 46,48

14) The Tao of Physics, by Dr. Fritjof Capra, 51

Flamingo Publication, 1976 Pages-321, 337, 340

15) Shambhala : Oasis of Light by Andrew Tomas, Sphere Books, 1977 52,54

16) Tao Te Ching-by Lao Tzu-English translation by Ch'u Ta-kao, Mandala, Unwin Paperback-1985. 61

आणि ताओ उपनिषदावरची भगवान ओशो यांची प्रवचनं.

17) The dance of Shiva by A.K. Coomara Swami, Noonday Press, 1969 as quoted in The Tao of Physics. 62

18) आर्थिक गुलामीतून भारताला वाचवण्याच समर्थ पर्याय-स्वदेशी ले.एस्.गुरुमूर्ति, भारतीय मजदर् संघाचं प्रकाशन.

19) Fuzzy Thinking by Bart Kosko, Flamingo, 1994 67,68

20) श्रीमत् भागवत- अर्थात सुरव सागर, दिव्य रसानुवाद हिंदी- ले.कवि 'मुकुंद'-रामायण प्रेस, मुंबई १९९४. 69

21) संत तुकारामाची गाथा, संपादन-विष्णुबुआ जोग महाराज,आवृत्ती ८, १९९३ 69

22) Man and his symbols, Edited by Carl G. Jung, Published by Picador, Pan Books Ltd., 1978 72